# “सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु॥) आणि आंबेगाव (बु॥) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास”

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील तात्विक व सामाजिक शाखेअंतर्गत,**
**एम. फिल. (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र) अभ्यासक्रम**
**संशोधन प्रकल्प**


**संशोधक**
श्री. रामचंद्र मल्हारी माळी

**मार्गदर्शक**
डॉ. सुनिता बर्वे
सिनीयर टेक्निकल ऑफीसर,
राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा,
पुणे - ४११००८.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग,**
**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे - ३७.**


**एप्रिल २०१५**

# “सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास”

## एम फिल (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र)

### अभ्यासकाचे प्रमाणपत्र

मी रामचंद्र मल्हारी माळी कायम नोंदणी क्रमांक : १०४१२००१८१० टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. या विद्यापीठात एम फिल (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र) या अभ्यासक्रमासाठी “सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास” या विषयावर २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षात सदर प्रकल्प सादर केला आहे. हा प्रकल्प मी स्वत: तयार केलेला असून त्यातील सर्व संशोधन माझे स्वत:चे आहे. या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले नाही याची मी खात्री देत आहे.

दिनांक :

संशोधक सही

ठिकाण : पुणे

श्री. रामचंद्र मल्हारी माळी

## “सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास”

### एम फिल (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र)

### मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

श्री. रामचंद्र मल्हारी माळी कायम नोंदणी क्रमांक : १०४१२००१८१० यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे. या विद्यापीठात एम फिल (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र) या अभ्यासक्रमासाठी “सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास” या विषयावर २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षात सादर केलेला संशोधन प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

दिनांक :

ठिकाण : पुणे

मार्गदर्शक सही

डॉ. सुनिता बर्वे

सिनिअर टेक्निकल ऑफिसर,

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा

पुणे - ४११००८.

# ऋणनिर्देश

मी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाअंतर्गत "सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज" या विषयावर संशोधन प्रकल्प सादर करीत आहे.

सदर प्रकल्पासाठी डॉ. सुनिता बर्वे सिनीयर टेक्निकल ऑफीसर, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे. यांच्यासारख्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील तज्ञ मार्गदर्शक म्हणून लाभल्या. त्यांनी जे बहुमुल्य मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यामुळेच मी सदर प्रकल्प व्यवस्थितीतरित्या सादर करू शकलो त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, या विद्यापीठात एम.फिल (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र) या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाला याबद्दल मी विद्यापीठाचे आभार मानतो. तसेच विद्यापीठातील मार्गदर्शकतज्ञ, ग्रंथपाल आणि ग्रंथालय कर्मचारी यांचे बहुमुल्य असे मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सिंहगड शैक्षणिक संस्थेतील ११ महाविद्यालयाच्या ग्रंथपालांनी आणि ११0 विद्यार्थ्यांनी वेळेत प्रश्नावली भरून दिल्या त्यामुळे मी सदर प्रकल्पावर काम करू शकलो. त्याबद्दल मी त्यासर्वांचे आभार मानतो.

माझ्या कुटूंबातील सर्वांनी मला हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय सदर संशोधन प्रकल्पासाठी अनेक व्यक्तींचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सहकार्य लाभले अशा प्रत्येक व्यक्तीचा मी आभारी आहे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण | तपशील | पान नं. |
|---|---|---|
| | अभ्यासकाचे प्रमाणपत्र | I |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| | ऋणनिर्देश | III |
| | ग्रंथपाल प्रश्नावलीतील तक्ता सूची | IV |
| | ग्रंथपाल प्रश्नावलीतील चार्ट सूची | VII |
| | वाचक प्रश्नावलीतील तक्ता सूची | VIII |
| | वाचक प्रश्नावलीतील चार्ट सूची | X |
| **प्रकरण १ ले** | **संशोधन पध्दती** | |
| १.१ | प्रस्तावना | १ |
| १.२ | संशोधन विषय | २ |
| १.३ | संशोधनाची गरज किंवा आवश्यकता | २ |
| १.४ | संशोधनाची उद्दिष्टये | ३ |
| १.५ | गृहितके | ४ |
| १.६ | व्याप्ती आणि मर्यादा | ४ |
| १.७ | संशोधनासाठी वापरलेली वर्णनात्मक संशोधन पध्दती | ६ |
| १.८ | माहिती संकलन साधने आणि तंत्रे | ८ |
| **१.९** | **पूर्वसाहित्य अभ्यास** | १६ |
| १.१0 | स्वागत नव्या पुस्तकांचे | २३ |
| १.११ | पुस्तकपरिचय | २६ |
| १.१२ | स्वागत दिवाळी अंकांचे | २८ |
| १.१३ | प्रेरणात्मक लेख | ३१ |
| **प्रकरण २ रे** | **अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती** | |
| २.१ | प्रस्तावना | ३३ |
| २.२ | ग्रंथालय : अध्यात्म, तत्वज्ञान आणि मनोरंजन | ३४ |
| २.३ | ग्रंथालय महाविद्यालयाची आधारशीला | ३५ |
| २.४ | अवांतर वाचनसाहित्य म्हणजे काय? | ३६ |
| २.५ | अवांतर वाचन साहित्य प्रकार | ३७ |

| | | |
|---|---|---|
| २.६ | महाविद्यालयीन ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आवश्यक | ३७ |
| २.७ | अवांतर वाचनसाहित्यासाठी आंतर महाविद्यालयीन ग्रंथालयांचा वापर करावा. | ३८ |
| २.८ | आम्हालाही साहित्यविश्वात रस... | ३९ |
| २.९ | अवांतर वाचनसाहित्य अभ्यासक्रमाचा भाग झाले तरच नवी पिढी वाचेल | ४० |
| २.१० | उद्याचे वाचक घडविण्यासाठी... अमेरिकेतील प्रयत्न | ४१ |
| २.११ | पुस्तकांशी मैत्री तुटत चालली आहे. | ४४ |
| २.१२ | स्पर्धा परीक्षांचे स्वरूप आणि अवांतर वाचनसाहित्य | ४५ |
| २.१३ | वर्तमानपत्रांव्दारे मुलांचा भाषा विकास | ४५ |
| २.१४ | ई-बुक्स आणि पुस्तके | ४६ |
| २.१५ | लाभले भाग्य आम्हा, वाचतो मराठी | ४७ |
| २.१६ | वाचन आणि वाचन संस्कृती | ४८ |
| २.१७ | विश्व पुस्तकांचे | ४९ |
| २.१७.१ | पुस्तकांच्या जवळ जाता आले पाहिजे. | ५० |
| २.१७.२ | प्रकाशकांची उदासिनता | ५० |
| २.१८ | पुस्तके आणि विद्यार्थी यांचा संबंध | ५२ |
| २.१९ | वाचन एक फायदेशीर छंद | ५३ |
| २.१९.१ | पुस्तक वाचनातून सुसंस्कार | ५३ |
| २.२० | अवांतर वाचनसाहित्याचा प्रसार होण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम | ५५ |
| २.२०.१ | कपडेखरेदीवर पुस्तकांची भेट | ५५ |
| २.२०.२ | आनंदाचा व्यापार | ५५ |
| २.२०.३ | वाचनानंदांसाठी बुक कॅफे | ५६ |
| २.२१ | वाचन विद्यालय | ५७ |
| २.२२ | शालेय शिक्षणात ग्रंथालयाचा वापर | ५८ |
| २.२३ | ग्रंथवाचन : एक विशेष उपदेश | ५९ |
| २.२४ | महाविद्यालयातील मराठी | ६० |
| **प्रकरण ३ रे** | **सिंहगड शैक्षणिक संस्था आणि ग्रंथालयांची माहिती** | |
| ३.१ | सिंहगड शैक्षणिक संस्थेविषयी माहिती | ६२ |

| | | |
|---|---|---|
| ३ . २ | सिंहगड शैक्षणिक संस्थेतील ग्रंथालयांची माहिती | ६३ |
| **प्रकरण ४ थे** | **संकलित माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण** | |
| ४ . १ | ग्रंथपाल प्रश्नावलीचे विश्लेषण आणि सादरीकरण | ७0 |
| ४ . २ | विद्यार्थी प्रश्नावलीचे विश्लेषण आणि सादरीकरण | १४६ |
| ४ . ३ | वाचकांच्या प्रतिक्रिया | १६९ |
| **प्रकरण ५ वे** | **निष्कर्ष आणि शिफारशी** | |
| ५ . १ | ग्रंथपाल प्रश्नावलीतील निष्कर्ष | १७0 |
| ५ . २ | ग्रंथपाल प्रश्नावलीतील शिफारशी | १७५ |
| ५ . ३ | वाचक प्रश्नावलीतील निष्कर्ष | १७७ |
| ५ . ४ | वाचक प्रश्नावलीतील शिफारशी | १८0 |
| ५ . ५ | **महत्वाचे निष्कर्ष आणि शिफारशी** | १८१ |
| **परीशिष्ट - १** | ग्रंथपाल प्रश्नावली | |
| **परीशिष्ट - २** | वाचक प्रश्नावली | |
| | संदर्भसूची | |

## ग्रंथपाल प्रश्नावलीतील तक्ता सूची


| तक्ता क्र. | तपशिल | पृष्ट क्र. |
| --- | --- | --- |
| तक्ता क्र. १ | ग्रंथालयाची सर्वसाधारण माहिती | ७० |
| तक्ता क्र. २ | एकुण ग्रंथसंख्या, वार्षीक अंदाजे ग्रंथवाढ आणि अवांतर वाचनसाहित्य संख्या | ७२ |
| तक्ता क्र. ३ | अवांतर वाचनसाहित्य आहे काय | ७३ |
| तक्ता क्र. ४ | अवांतर वाचनसाहित्य असावे | ७४ |
| तक्ता क्र. ५ | ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य प्रकार | ७५ |
| तक्ता क्र. ६ | अवांतर वाचनसाहित्याची भाषा | ७८ |
| तक्ता क्र. ७ | अवांतर वाचनसाहित्याची संख्या | ८० |
| तक्ता क्र. ८ | भाषेतील साहित्य वाचण्याचे प्रमाण | ८१ |
| तक्ता क्र. ९ | प्रकाशनांचे साहित्य वाचण्याचे प्रमाण | ८३ |
| तक्ता क्र. १० | अवांतर वाचनसाहित्याची आवड | ८४ |
| तक्ता क्र. ११ | वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह | ८५ |
| तक्ता क्र. १२ | कोणत्या प्रकारचे साहित्य जास्त आवडते | ८६ |
| तक्ता क्र. १३ | तीन महिन्यात अवांतर पुस्तके वाचल्याची संख्या | ८९ |
| तक्ता क्र. १४ | आठवडयातील अवांतर वाचनासाठीचे दिवस | ९० |
| तक्ता क्र. १५ | नवीन पुस्तकांची माहिती मिळविण्याचे माध्यम | ९१ |
| तक्ता क्र. १६ | पुस्तकांचे आवडणारे माध्यम | ९३ |
| तक्ता क्र. १७ | प्रवासवर्णन वाचनसाहित्याचा वापर | ९४ |
| तक्ता क्र. १८ | संशोधनावरील वाचनसाहित्याचा वापर | ९६ |
| तक्ता क्र. १९ | स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील साहित्य आवड | ९८ |
| तक्ता क्र. २० | काव्यसंग्रहाचे वाचन | ९९ |
| तक्ता क्र. २१ | आध्यात्मिक साहित्याचे वाचन | १०० |
| तक्ता क्र. २२ | कोणत्या प्रकारचे ग्रंथ खरेदी केले जातात | १०२ |
| तक्ता क्र. २३ | नवीन ग्रंथाची यादी सुचना फलकावर चिटकविली जाते | १०३ |
| तक्ता क्र. २४ | अवांतर वाचनसाहित्य खरेदीविषयी समिती किंवा व्यवस्थापनाची सुचना | १०४ |
| तक्ता क्र. २५ | अवांतर वाचनसाहित्य संकलन पध्दत | १०६ |

| | | |
|---|---|---|
| तक्ता क्र. २६ | अवांतर वाचनसाहित्याच्या किती प्रती घेतल्या जातात | १०८ |
| तक्ता क्र. २७ | २०१२ ते २०१४ अवांतर वाचनसाहित्य खरेदीचा तपशिल | १०९ |
| तक्ता क्र. २८ | दिवाळी अंकांची खरेदी | १११ |
| तक्ता क्र. २९ | भविष्यात अवांतर वाचनसाहित्य खरेदी | ११२ |
| तक्ता क्र. ३० | भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे | ११३ |
| तक्ता क्र. ३१ | भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट दिले | ११४ |
| तक्ता क्र. ३२ | मुलांना अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती | ११६ |
| तक्ता क्र. ३३ | चांगले वाचक, साहित्यिक, लेखक यासाठी प्रोत्साहन | ११७ |
| तक्ता क्र. ३४ | लेखन किंवा काव्य प्रकाशन | ११८ |
| तक्ता क्र. ३५ | ग्रंथप्रदर्शनाविषयी | १२० |
| तक्ता क्र. ३६ | ग्रंथपेढीची सुविधा | १२१ |
| तक्ता क्र. ३७ | आंतरग्रंथालय देवघेव सेवा | १२२ |
| तक्ता क्र. ३८ | ग्रंथालयामार्फत उपक्रम | १२४ |
| तक्ता क्र. ३९ | सांघिक पुस्तक वाचन उपक्रम | १२६ |
| तक्ता क्र. ४० | नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहिती साठवणूक | १२७ |
| तक्ता क्र. ४१ | नवीन पुस्तकांबद्दल माहिती साठवणूक स्वरूप | १२८ |
| तक्ता क्र. ४२ | पुस्तक संख्या आणि मुदत | १२९ |
| तक्ता क्र. ४३ | विलंब शुल्क आकारणी | १३० |
| तक्ता क्र. ४४ | ग्रंथसंग्रहात प्रवेश | १३१ |
| तक्ता क्र. ४५ | अवांतर आणि अध्ययन साहित्याची माहिती | १३२ |
| तक्ता क्र. ४६ | अवांतर वाचनसाहित्याची मागणी | १३४ |
| तक्ता क्र. ४७ | ठराविक वाचनसाहित्याची शिफारस | १३५ |
| तक्ता क्र. ४८ | अवांतर वाचनसाहित्यासाठी निधी | १३६ |
| तक्ता क्र. ४९ | इंटरनेट सेवा | १३७ |
| तक्ता क्र. ५० | वाय-फाय सेवा | १३८ |
| तक्ता क्र. ५१ | इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य | १३९ |
| तक्ता क्र. ५२ | इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्याची देवघेव | १४० |
| तक्ता क्र. ५३ | ग्रंथालयाचे संकेतस्थळ | १४१ |
| तक्ता क्र. ५४ | संकेतस्थळावरून अवांतर वाचनसाहित्याची माहिती | १४२ |
| तक्ता क्र. ५५ | संकेतस्थळावरून वाचनसाहित्याचा शोध | १४३ |

| | | |
|---|---|---|
| तक्ता क्र. ५६ | ग्रंथालयाचा कॅटलॉग | १४३ |
| तक्ता क्र. ५७ | सोशल मिडियाचा वापर | १४४ |

## ग्रंथपाल प्रश्नावलीतील चार्ट सूची


| चार्ट क्र. | तपशिल | पृष्ट क्र. |
|---|---|---|
| चार्ट क्र. १ | कर्मचारी संख्या | ७१ |
| चार्ट क्र. २ | ग्रंथालयातील अवांतर वाचन साहित्य प्रकार | ७७ |
| चार्ट क्र. ३ | अवांतर वाचनसाहित्याची भाषा | ७९ |
| चार्ट क्र. ४ | भाषेतील साहित्य वाचण्याचे प्रमाण | ८२ |
| चार्ट क्र. ५ | आवडता साहित्य प्रकार | ८८ |
| चार्ट क्र. ६ | प्रत्यक्ष वाचन आणि आवश्यक वाचन | ९१ |
| चार्ट क्र. ७ | नवीन पुस्तकांविषयी माहिती मिळविण्याचे माध्यम | ९२ |
| चार्ट क्र. ८ | पुस्तकाचे माध्यम | ९४ |
| चार्ट क्र. ९ | प्रवासवर्णन साहित्याचा वापर | ९५ |
| चार्ट क्र. १० | संशोधनपर साहित्याचा वापर | ९७ |
| चार्ट क्र. ११ | काव्य संग्रहाचे वाचन | १०० |
| चार्ट क्र. १२ | आध्यात्मिक साहित्याचे वाचन | १०१ |
| चार्ट क्र. १३ | कोणत्या प्रकारची ग्रंथखरेदी | १०३ |
| चार्ट क्र. १४ | अवांतर वाचनसाहित्य खरेदी समिती व व्यवस्थापन सुचविते | १०५ |
| चार्ट क्र. १५ | अवांतर वाचनसाहित्य संकलन पध्दत | १०७ |
| चार्ट क्र. १६ | अवांतर वाचनसाहित्याच्या किती प्रती घेतल्या जातात | १०९ |
| चार्ट क्र. १७ | २०१२ ते २०१४ अवांतर वाचनसाहित्य खरेदी | ११० |
| चार्ट क्र. १८ | अवांतर वाचनसाहित्य खरेदीचा मानस | ११३ |
| चार्ट क्र. १९ | भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे आणि प्रत्यक्ष कृती | ११५ |
| चार्ट क्र. २० | लेखन किंवा काव्य प्रकाशन | ११९ |
| चार्ट क्र. २१ | ग्रंथप्रदर्शन | १२१ |
| चार्ट क्र. २२ | आंतरग्रंथालय देवघेव सेवा आणि ग्रंथपेढी सुविधा | १२३ |
| चार्ट क्र. २३ | ग्रंथालयामार्फत उपक्रम | १२५ |
| चार्ट क्र. २४ | अवांतर आणि अध्ययन साहित्याची माहिती | १३३ |

## वाचक प्रश्नावलीतील तक्ता सूची


| तक्ता क्र. | तपशिल | पृष्ट क्र. |
|---|---|---|
| तक्ता क्र. १ | अवांतर वाचनसाहित्याची आवड | १४६ |
| तक्ता क्र. २ | वैयक्तिक अवांतर साहित्य संग्रह | १४७ |
| तक्ता क्र. ३ | ग्रंथालयात अवांतर साहित्य आहे का | १४८ |
| तक्ता क्र. ४ | ग्रंथालयात अवांतर साहित्य असावे | १४९ |
| तक्ता क्र. ५ | हवे असलेले साहित्य मिळते | १५० |
| तक्ता क्र. ६ | भाषेतील साहित्य वाचण्यास आवडते | १५१ |
| तक्ता क्र. ७ | कोणते वाचनसाहित्य जास्त आवडते | १५२ |
| तक्ता क्र. ८ | चरित्रे / आत्मचरित्रे वाचली | १५३ |
| तक्ता क्र. ९ | संशोधनपर साहित्याचा वापर | १५४ |
| तक्ता क्र. १० | स्पर्धात्मक किंवा चालू घडामोडीवरील साहित्याची आवड | १५४ |
| तक्ता क्र. ११ | काव्यसंग्रहाचे वाचन | १५५ |
| तक्ता क्र. १२ | आध्यात्मिक साहित्य वाचन | १५५ |
| तक्ता क्र. १३ | वाचनसाहित्य खरेदी करून/ग्रंथालयातून घेऊन वाचता | १५६ |
| तक्ता क्र. १४ | भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट | १५७ |
| तक्ता क्र. १५ | अवांतर वाचनसाहित्याची माहिती कशी मिळविता | १५८ |
| तक्ता क्र. १६ | वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे असे वाटते | १५९ |
| तक्ता क्र. १७ | लेख किंवा काव्य प्रकाशित | १५९ |
| तक्ता क्र. १८ | अवांतर वाचनसाहित्य घरी वाचनासाठी मिळते का | १६० |
| तक्ता क्र. १९ | विलंबशुल्क आकारले जाते का | १६० |
| तक्ता क्र. २० | ग्रंथसंग्रहात प्रवेश | १६१ |
| तक्ता क्र. २१ | अवांतर किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती | १६१ |
| तक्ता क्र. २२ | ठराविक वाचनसाहित्याची शिफारस | १६३ |
| तक्ता क्र. २३ | आंतरग्रंथालय देवघेव सेवेचा वापर | १६३ |
| तक्ता क्र. २४ | वृत्तपत्रांमधील पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहितीचे जतन | १६४ |
| तक्ता क्र. २५ | लेखांचे किंवा काव्यसंग्रहांचे जतन | १६४ |
| तक्ता क्र. २६ | इंटरनेट सेवा | १६५ |

| | | |
|---|---|---|
| तक्ता क्र. २७ | Wi- Fi सुविधा | १६५ |
| तक्ता क्र. २८ | सोशल मिडियाचा वापर | १६६ |
| तक्ता क्र. २९ | मागील तीन महिन्यात किती अवांतर पुस्तके वाचली | १६६ |
| तक्ता क्र. ३0 | आठवडयातील किती दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवता | १६७ |
| तक्ता क्र. ३१ | ऑनलाईन ई-बुक्सचा वापर | १६८ |

# वाचक प्रश्नावलीतील चार्ट सूची


| चार्ट क्र. | तपशिल | पृष्ट क्र. |
|---|---|---|
| चार्ट क्र. १ | अवांतर वाचनसाहित्याची आवड | १४७ |
| चार्ट क्र. २ | ग्रंथालयात अवांतर साहित्य | १४९ |
| चार्ट क्र. ३ | हवे असलेले साहित्य मिळते | १५० |
| चार्ट क्र. ४ | भाषेतील साहित्य वाचण्यास आवडते | १५१ |
| चार्ट क्र. ५ | जास्त आवडणारा साहित्य प्रकार | १५३ |
| चार्ट क्र. ६ | वाचनसाहित्य खरेदी करून/ग्रंथालयातून घेऊन वाचता | १५७ |
| चार्ट क्र. ७ | अवांतर वाचनसाहित्याची माहिती कशी मिळविता | १५८ |
| चार्ट क्र. ८ | अवांतर किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती | १६२ |
| चार्ट क्र. ९ | मागील तीन महिन्यात किती अवांतर पुस्तके वाचली | १६७ |

# प्रकरण १ ले

# संशोधन पध्दती

## १.१ प्रस्तावना :

मनुष्य "शिक्षण आणि सामान्य ज्ञान" हे औपचारिक तसेच अनौपचारिक पध्दतीने प्राप्त करीत असतो. वाचन हे माणसाच्या व्यक्तिगत ज्ञानात आणि वाचकांच्या सामान्य ज्ञानात भर घालत असते. माणसाच्या बौध्दिक विकासाला वाचनाव्दारे गती मिळते. ऐतिहासिक, भौगोलिक, वाङमयीन, मनोरंजनात्मक, वाणिज्य आणि शास्त्रीय इत्यादी वाचनसाहित्याचे भांडार ग्रंथालयाच्या रूपाने उपलब्ध झाले आहे. वाचकामध्ये निर्माण होणारी वाचनाची गोडी आणि त्यांच्या आवडीनिवडी यावर वाचनाचा छंद जोपासला जातो.

शैक्षणिक अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून नामवंत लेखकांच्या कथा, कादंब-यांचा समावेश केला जावा, असे अनेक तज्ञांचे मत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाबरोबरच अवांतर वाचनसाहित्याबद्दल गोडी निर्माण होईल. त्याचबरोबर अवांतर वाचनसाहित्य हे मनोरंजनाचे उत्तम साधन आहे असाही दृष्टीकोन निर्माण होईल.

ग्रंथांमध्ये लेखकाने मांडलेल्या विचारामुळे लेखकाला प्रत्यक्ष न भेटता त्यांनी पुस्तकात मांडलेले विचार वाचून वाचकांच्या ज्ञानात भर पडते. थोर पुरूषांची चरित्रे व आत्मचरित्रे मानवाच्या व्यक्तीमत्व विकासाला पोषक अशी परिस्थिती निर्माण करतात. आयुष्यातील आव्हाने पेलण्यासाठी अवांतर वाचन हीच शिदोरी आहे.[१] म्हणून प्रत्येक ग्रंथालयात, मग ते कोणत्या प्रकारचे ग्रंथालय असो! अवांतर वाचनसाहित्याचा काही साठा असायलाच पाहिजे.

सध्याचे युग हे संगणकाचे आणि माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. ग्रंथालयाकडून दिल्या जाणा-या विविध सेवांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा पर्यायाने संगणकाचा वापर वाढला आहे, तसेच अनेक सुविधा वाचकाला ग्रंथालयात न येता घरबसल्या मिळविता येतात. असे असले तरी पुस्तकांचे तसेच ग्रंथालयाचे महत्व कमी होत नाही आणि होणारही नाही.

---

१. अवांतर वाचनसाहित्य हिच शिदोरी. (०२ ऑगस्ट २००८). **Retrieved from In http://www.manatala.wordpress.com (accessed on 13.07.2014)**

## १.२ संशोधन विषय :

"सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव बु|| आणि आंबेगाव बु|| शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास"

## १.३ संशोधनाची गरज किंवा आवश्यकता :

सर्वसाधारणपणे महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये विद्यापीठाने ठरवलेल्या अभ्यासक्रमाचेच ग्रंथ, संदर्भ ग्रंथ आणि इतर ग्रंथेत्तर वाचनसाहित्य घेण्याकडे महाविद्यालयांचा कल असतो. याशिवाय थोडयाफार प्रमाणात देणगीदाखल मिळालेले अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयात उपलब्ध असते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास ग्रंथालयांमध्ये असलेल्या ऐतिहासिक, भौगोलिक, वाङमयीन, वार्षीक माहितीपुस्तके, शब्दाकोश, ज्ञानकोश, इत्यादी अशा वाचनसाहित्यातून देशाच्या संस्कृतीची ओळख होते.

वाणिज्य आणि शास्त्रीय तसेच स्पर्धा परीक्षांविषयीची पुस्तके, दै. वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंक, इत्यादी वाचनसाहित्य विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून उपलब्ध झाल्यास दैनंदिन घडामोडीबरोबरच अभ्यासाबाहेरील विश्वाची ओळख होते. विद्यार्थ्यांच्या शब्दकोशाची क्षमता वाढते. वाचन आणि लेखन कौशल्यात भर पडते. थोर लोकांची चरित्रे, आत्मचरित्रे ही तर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोतच ठरत असतात.

प्रत्येक महाविद्यालयात मनोंरजनात्मक कार्यक्रमाचे, स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यांच्या आयोजनासाठी विद्यार्थ्यांना विविध लेखकांचे, कथाकारांचे, नाटककारांचे, कवींचे साहित्य हाताळावे लागते. त्यामुळे त्यांच्या कल्पनाशक्तीमध्ये वाढ होते. त्याचबरोबर अभ्यासातील ताण-तणाव घालवण्यासाठी किंवा फावल्या वेळात मनोरंजनाचे साधन म्हणून अवांतर वाचनसाहित्याचा उपयोग केला जाऊ शकतो.

तरूणाईने विद्यार्थीदशेपासूनच वाचनाची आवड जोपासावी यासाठी "नॅशनल बुक ट्रस्टने" केलेल्या "राष्ट्रीय युवक वाचक सर्वेक्षणाव्दारे" १)शाळा, महाविद्यालयांमध्ये अवांतर

वाचनांसाठी ठराविक सुट्टी मिळावी २) ग्रंथालयांशी संपर्क सुलभ व्हावा ३) जेष्ठांकडून प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळावे, असे संवेदनशील पर्याय पुढे आले आहेत.[२]

थोडक्यात वाचन संस्कारातून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास करण्याची आणि त्यांच्या भवितव्यास योग्य वळण देण्याची जबाबदारी महाविद्यालयावर तसेच पर्यायाने ग्रंथालयावर असते. म्हणून महाविद्यालयीन ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्याची गरज आहे. त्यामुळेच सदर विषयावर संशोधन होणे आवश्यक आहे असे वाटते. म्हणून संशोधकाने सदर विषय संशोधनासाठी घेतलेला आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याच्या उपलब्धते विषयी आढावा घेणे.

२. महाविद्यालयीन ग्रंथालयांतील अवांतर साहित्याच्या विकासाचा आढावा घेणे.

३. महाविद्यालयीन वाचकवर्गाचे अवांतर वाचन साहित्याविषयीचे आवड जाणून घेणे.

४. अवांतर वाचन साहित्याची उपलब्धता वाढविण्यासाठी उपक्रम सुचविणे.

---

२. तरूणाई करतेय वाचनाचा सगजतेने विचार. (२१ जानेवारी २०११). **Retrieved from In http://epaper.esakal.com/esakal (accessed on 12.07.2014)**

### १.५ गृहितके :

१. सिंहगड शैक्षणिक संस्थेतील संशोधनाकरिता निवडलेल्या ग्रंथालयामध्ये अवांतर वाचनसाहित्याची उपलब्धता सर्वसाधारण आहे.

२. महाविद्यालयातील ग्रंथालयात असलेल्या अवांतर वाचनसाहित्याचा संग्रह वाढविणे गरजेचे आहे.

### १.६ व्याप्ती आणि मर्यादा :

सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या पुणे, मुंबई, लोणावळा, सोलापूर, सांगोला, इत्यादी ठिकाणी अनेक शाखा आहेत. त्या शाखांमध्येसुध्दा विविध विषयावरील अभ्यासक्रमाची महाविद्यालये आहेत. सदर संशोधन विषयावर इतर शाखांमधील महाविद्यालयीन ग्रंथालयांचा समावेश करता येण्यासारखे आहे.

परंतु एम.फिल या अभ्यासक्रमाचा कालावधी आणि भौगोलिक व्याप्ती या गोष्टींचा विचार करता, सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या इतर शाखांमधील महाविद्यालयीन ग्रंथालयांचा समावेश न करता फक्त पुणे येथील वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमधील खालील ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांचा यामध्ये समावेश केला आहे.

1. Sou. Venutai Chavan Polytechnic.
2. Sinhgad Institute of Management.
3. Sinhgad College of Engineering.
4. Sinhgad College of Architecture.
5. Sinhgad College of Pharmacy.
6. Smt. Kashibai Navale College of Engineering.
7. Sinhgad Junior College of Art’s, Science & Commerce.

8. Sinhgad Law College.

9. Singhad Dental College & Hospital.

10. SKN Sinhgad School of Business Management.

11. NBN Sinhgad School of Engineering & Management Studies.

**सदर संशोधनासाठी निवड केलेल्या महाविद्यालयांचा लक्षपूर्वक विचार केल्यास असे दिसून येईल की, संशोधकाने सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखेमध्ये चालविल्या जाणा-या विविध विषयावरील (क्षेत्रातील) महाविद्यालयीन ग्रंथालयांची संशोधनासाठी निवड केलेली आहे. त्यामध्ये तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कला, वाणिज्य आणि विज्ञान, वास्तुस्थापत्यशास्त्र, औधषनिर्माणशास्त्र, कायदा, दंत महाविद्यालय आणि चिकित्सा इत्यादी अशा विविध विषयावरील (क्षेत्रातील) अभ्यासक्रमातील महाविद्यालयीन ग्रंथालयांचा समावेश केला आहे.**

प्रस्तुत संशोधन सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या पुणे येथील वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमधील वरील ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांपुरतेच **मर्यादीत** राहणार आहे.

## १.७ संशोधनासाठी वापरलेली वर्णनात्मक संशोधन पध्दती :

**प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्याचबरोबर प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती मिळविली आहे.**

वर्णनात्मक संशोधन पध्दती ही सर्व संशोधन पध्दतीमध्ये अत्यंत लोकप्रिय पध्दती असून या पध्दतीचा मोठया प्रमाणावर उपयोग केलेला दिसून येतो. या पध्दतीचा वापर करून जास्तीत जास्त ग्रंथालयीन संशोधन समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

वर्णनात्मक संशोधनात कोणत्याही घटनेच्या, समाजाच्या, सामाजिक संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्य:स्थितीचा सर्वकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते. वर्णनात्मक संशोधन पध्दती वर्तमान आधारित असते. प्राथमिकपणे ही अस्तित्वात असणा-या संबंधाशी, मतांशी, चालू प्रक्रियांशी, घटनेशी किंवा विकसीत होत असणा-या प्रवाहांशी संबंधीत असणारी संशोधन पध्दती आहे. या पध्दतीच्या उपयोजनेव्दारे संशोधक एखादी सामाजिक घटना, कार्य, उपक्रम किंवा योजना यांची सांप्रत स्थिती काय आहे याचा सखोल अभ्यास करून त्यातील गुणदोषांची वस्तुनिष्ठपणे चिकित्सा करतो. सत्य परिस्थितीचा चिकित्सकपणे शोध घेतल्यावर आणि योजनेतील गुणदोषांची चर्चा केल्यावर संशोधक परिस्थिती सुधारण्यासाठी मार्गदर्शक सुचना करू शकतो.

अशा प्रकारे या संशोधनाव्दारे कार्यकर्ते, योजनाकार, व्यवस्थापक, सामाजिक आणि राजकीय संस्था यांना योग्य ते मार्गदर्शन प्राप्त होते. अशा त-हेच्या अभ्यासाला संशोधन म्हणण्याचे कारण त्यामध्ये खालील गुणांचे अस्तित्व जाणवते.

१. वस्तुनिष्ठ गोळा केलेली माहिती

२. गोळा केलेल्या माहितीचे तंत्रशुध्द विश्लेषण

३. चिकित्सा

४. चिकित्सेला लाभलेली चिंतनाची पार्श्वभुमी

या पध्दतीच्या आधारे केवळ समस्या सोडविणे एवढेच उद्दिष्ट न ठेवता मुलभूत सिध्दांतासाठी माहिती मिळविणे, मुलभूत तत्व शोधणे ही देखील उद्दिष्टे ठेवली जातात. वर्ण नात्मक संशोधनात सद्य:स्थिती काय आहे याचे वर्णन व अर्थनिर्वचन करतात. कोणती स्थिती किंवा संबंध अस्तित्वात आहेत, कोणती मते आहेत, कोणत्या प्रक्रिया चालू आहेत, कोणते परिणाम दिसून येतात, कोणत्या प्रवृत्ती दिसून येतात या बाबींशी या संशोधनाचा संबंध असतो. या संशोधनाचा मुलत: वर्तमानकाळाशी संबंध आहे. याच संबंधात संशोधकाला परीक्षण व मूल्यमापन या प्रकारांची माहिती असणे आवश्यक आहे.

वर्णनात्मक संशोधनात घटकांच्या संबंधात जशी संख्यात्मक माहिती गोळा केली जाते तशी गुणात्मक माहितीही गोळा केली जाते. माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, कसोटया, निरीक्षण वगैरे अनेक साधनांचा उपयोग करता येतो. माहिती कोणत्या प्रकारची हवी आहे व प्रतिसादकाचा दर्जा कसा आहे, यावर कोणते साधन वापरायचे हे ठरवावे लागते.[३]

३. रिसवाडकर, म. रा., (२००९). संशोधन व्याख्या आणि पध्दती. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १-३.

## १.८ माहिती संकलन साधने आणि तंत्रे :

संशोधन करण्यासाठी निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची या तंत्राचा आणि साधनांचा वापर केला जातो.

### अ) निरीक्षण :

संशोधकाने अध्ययनक्षेत्रात प्रत्यक्ष जाऊन निरीक्षण करणे ही तथ्य संकलनाची पहिली आवश्यक अट असून तो संशोधनाचा पाया आहे. पण निरीक्षण म्हणजे केवळ पाहणे नव्हे तर अभ्यासविषयाच्या दृष्टीने नेमके जे महत्वाचे आहे त्याचेच निरीक्षण करणे महत्वाचे असते. निरीक्षण ही तथ्य संकलनाची जितकी जुनी पध्दती आहे तितकीच ती आधुनिक संशोधनाचीही पध्दती आहे. संशोधक स्वत: जोपर्यंत प्रत्यक्षात घटनांचे निरीक्षण करीत नाही तोपर्यंत त्यातील तथ्यांचा तो स्वीकार करीत नाही. सत्याच्या जवळ पोहोचण्याचे निरीक्षण हे एक माध्यम आहे.

एखाद्या घटनेचा कार्यकारनभाव अथवा पारस्परिक संबंध जाणून घेण्याच्या दृिष्टीने केलेले सुक्ष्म अवलोकन म्हणजेच निरीक्षण होय. प्रायोगिकदृष्टया प्रयोगातील प्रयोज्य हे विविध परिस्थितीत कोणती कृती करतात याची पाहणी करणे म्हणजेच निरीक्षण होय. प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींचीच संशोधक नोंद करीत असल्यामुळे या निरीक्षणाव्दारे मिळणारे तथ्य हे सत्यता या निकषावर उतरणारे असते.

### आ) मुलाखत :

मुलाखतीव्दारे मुलाखत घेणारा उत्तरदात्यांच्या मनात डोकावून पाहतो. एकप्रकारे आंतरदृष्टी देणारा एक प्रभावी संवाद मुलाखतीमध्ये घडत असतो. तेव्हा अभ्यासविषयासंबंधात विचारांचे दोघांमध्ये आदान-प्रदान होत असते. मुलाखतीमुळे मुलाखत देणा-या व्यक्तीच्या भावना, विचार, हेतू, कळण्यास मदत होते.

### इ) प्रश्नावली :

सामाजिक संशोधनासाठी निवडलेल्या अभ्यासविषयक संदर्भात आवश्यक माहिती अभ्यास घटकांच्या प्रतिनिधींकडून त्यांच्यावर आपला कोणताही प्रभाव न पाडता मिळविण्याचे एक महत्वाचे तंत्र म्हणून प्रश्नावलीचा विचार केला जातो. ज्या वेळी अभ्यासविषयक पाहणीसाठी निवडलेला लक्ष्यसमुह भौगोलिकदृष्टया दूरवर पसरलेला असतो तेव्हा प्रश्नावलीव्दारेच माहिती जमा केली जाते. प्रश्नावली ही पध्दत साधारणत: वर्णनात्मक संशोधन पध्दती आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयावरील संशोधनात प्रामुख्याने वापरली जाते.

अभ्यासविषयासंबंधीत आवश्यक असणा-या माहितीसंदर्भात प्रश्नांची यादी तयार करून ती पोष्टाव्दारे किंवा अभ्यासकाच्या प्रतिनिधीव्दारे अभ्यास घटकाच्या प्रतिनिधीकडे पाठविली जाते. ही प्रश्नांची यादी प्रतिनिधी स्वत: वाचून व समजून घेऊन त्यातील प्रश्नांविषयीची आपली मते लिहून टपालाव्दारे किंवा अभ्यासकाच्या प्रतिनिधीव्दारे अभ्यासकापर्यंत पोहोचवत असतात. भौगोलिकदृष्टया दूरवर पसरलेल्या लक्ष्यसमुहाकडून कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली ही पध्दत सोयीस्कर आहे.

प्रश्नावली परिणामकारक होण्यासाठी संशोधकाला प्रश्नावलीची रचना विचारपूर्वक करावी लागते. **टायरस हिल्वे** यांनी प्रश्नावली परिणामकारक होण्यासाठी **आठ निकष** सुचविले आहेत.

१. प्रश्नावली फार लांबलचक नसावी.

२. जी माहिती आधीच उपलब्ध आहे त्या माहितीबद्दल अकारण विचारणा करू नये.

३. प्रश्नावलीतील प्रश्न हे विषयाच्या संदर्भातील महत्वाच्या गोष्टीसंबंधीच असावेत.

४ . प्रश्न असे तयार करावेत की, त्यांना देण्यात येणा-या उत्तरातून वस्तुस्थिती स्पष्ट होईल . केवळ मते व्यक्त होणार नाहीत .

५ . प्रश्नावलीमध्ये उत्तरदात्यांना माहित असलेल्या संज्ञांचाच वापर करावा .

६ . मुद्यानुरूप प्रश्नावलीची वेगवेगळया भागात विभागणी करावी .

७ . प्रश्नावली तयार करताना प्रश्नकर्त्याने उत्तरदात्याच्या वेळेचे भान ठेवणे जरूरीचे आहे .

८ . उत्तरे कशा प्रकारे नोंदवावीत याबद्दल योग्य त्या सुचना प्रश्नावलीत दिलेल्या असाव्यात .[४]

संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती गोळा करण्यासाठी विविध साधने आणि तंत्राचा उपयोग केला जातो . भौगोलिक दृष्टया तसेच समुहाचा विचार करता प्रश्नावली हे साधन माहिती गोळा करण्याच्या दृष्टीने सोयीस्कर ठरते . सदर संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती गोळा करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली साधनाचा वापर केला आहे .

---

४ . रिसवाडकर, म . रा ., (२००९) . माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण . नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन . पृ . ५ .

## संशोधन म्हणजे काय ?

संशोधनाच्या प्रक्रियेत संशोधन पध्दतीला असाधारण महत्व आहे. विषयांतर्गत वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी केलेला व्यापक शोध म्हणजे संशोधन होय. संशोधनाची प्रक्रिया वस्तुनिष्ठ असावी लागते, तरच संशोधक स्थायी निष्कर्षापर्यंत पोहोचू शकतो.

संशोधन हा केवळ एक शैक्षणिक उपक्रम नाही तर ही एक बौध्दिक प्रक्रिया आहे. त्यातून काहीतरी नवीन शोधून काढण्याचा एक संकल्प आहे. त्यातून जुन्या ज्ञानातील उणिवा दूर करून ज्ञानात सतत नवीन भर घातल्या जातात. एखाद्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर शोधण्यासाठी केलेल्या संशोधनातून अनेक दुसऱ्या अनपेक्षित समस्या निर्माण होतात आणि त्यासाठी पुन्हा पुन्हा संशोधन करावे लागते. म्हणजेच संशोधन कार्य ही कधीच न संपणारी प्रक्रिया आहे. संशोधन हा सतत नव्याचा शोध घेण्याचा एक व्यवस्थित व संघटित असा प्रयत्न आहे.

सत्य शोधून काढणे हा संशोधनाचा उद्देश आहे. व्यवहारातील व सृष्टीतील विविध समस्या सोडविण्यासाठी सातत्याने संशोधन करणे आवश्यक असते. कोणतेही संशोधन हे कोणते तरी प्रश्न, समस्या, घटना, प्रवृत्ती अथवा व्यवहारांना घेऊन प्रारंभ केले जाते. त्यात संशोधनकर्ता हे जाणण्याचे प्रयत्न करतो की, संबंधीत घटना अथवा समस्या का? केव्हा? कशी? निर्माण झाली किंवा कोणी निर्माण केली? यावरून सामाजिक विषयाचे आनुषंगिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, नैतिक असे विविध प्रकारचे पैलू लक्षात येतात. संशोधनाचा संबंध प्रामुख्याने **अधिक सामान्य, अमुर्त आणि कल्पित** समस्यांशी असतो. त्यात संशोधन करून सिध्दांताची मांडणी केली जाते आणि सामान्य नियम प्रतिपादन केले जातात. अर्थात ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नविन तथ्यांचा, विचारांचा, अवधारणांचा आणि सिध्दांतांच्या निर्मितीसाठी किंवा शोधासाठी कार्यान्वित केलेली क्रमबध्द प्रक्रिया म्हणजेच **संशोधन** होय.[५]

---

५. आगलावे, प्रदिप. (२०००). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन. पृ. १७.

**संशोधन व्याख्या :**

**चार्ल्स बुशा आणि स्टिफन हार्टर -**

"संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध होय." [६]

**एम.एच.गोपाल -**

"संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीरपणे घेतलेला सत्याचा किंवा अज्ञाताचा शोध होय."[७]

**क्लिफर्ड मूडी -**

"सत्य शोधनाची पध्दती म्हणजेच संशोधन होय."[८]

**वेस्टरच्या शब्दकोषानुसार -**

"संशोधन म्हणजे तथ्ये वा तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परिक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशीर केलेले परिक्षण होय."[९]

"विषयांतर्गत वैशिष्टये जाणून घेण्यासाठी केलेला व्यापक शोध म्हणजे संशोधन होय."

"वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी एखाद्या विषयाचा बारकाईने केलेला समीक्षक अभ्यास किंवा वैज्ञानिक चिकित्सा म्हणजे संशोधन होय."

---

६,७,८. रिसवाडकर, म. रा., (२००९). संशोधन व्याख्या आणि पध्दती. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १-३.

९. क-हाडे, बी.एस. (२०११). शास्त्रीय संशोधन पध्दती. नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स. पृ. १२.

## संशोधन पध्दती :

वैज्ञानिक युग अस्तित्वात येण्यापूर्वी समाजव्यवस्थेच्या प्रारंभकाळापासून संशोधनासाठी ज्या अभ्यासपध्दती किंवा संशोधन पध्दतीचा उपयोग नवीन ज्ञाननिर्मितीसाठी केला जात होता आणि आजही वैज्ञानिक पध्दतीच्या मर्यादित प्रवृत्तीमुळे ज्या संशोधन पध्दतीचा नवीन ज्ञाननिर्मितीसाठी उपयोग केला जात आहे त्या पध्दतींना संशोधनाच्या **परंपरागत संशोधन पध्दती किंवा भौतिक विज्ञानेत्तर संशोधन पध्दती** असे म्हणतात. सामाजिक शास्त्रांच्या प्रारंभकाळापासून ते आजच्या काळापर्यंत विविध विषयांच्या संशोधनात परंपरागत पध्दतींचा उपयोग विविध शास्त्रात केला जात आहे.

एखाद्या विषयाचे अध्ययन करताना म्हणजेच प्रत्यक्ष संशोधन करताना कोणत्याही एखाद्या परंपरागत पध्दतीचा उपयोग करावयाचा किंवा एकापेक्षा जास्त पध्दतींचा उपयोग करावयाचा याचा निर्णय संशोधक स्वत:च घेत असतो.

१) ऐतिहासीक संशोधन पध्दती

२) वर्णनात्मक संशोधन पध्दती

३) प्रायोगिक संशोधन पध्दती

## १) ऐतिहासिक संशोधन पध्दती :

प्रत्येक गोष्टीला इतिहास असतोच त्याचबरोबर ती गोष्ट विकसित होत असते किंवा त्या गोष्टीचा -हास होत असतो. याचा अर्थ असा होतो की, वर्तमान परिस्थितीचा भूतकालीन परिस्थितीशी काहीतरी संबंध असतोच. वर्तमान परिस्थिती ही भूतकालीन परिस्थितीची परिणती असते. त्यामुळे या दोहोंमध्ये कार्यकारणसंबंध आहे. या कार्यकारण संबंधाचाच शोध ऐतिहासिक संशोधन पध्दतीमध्ये घेण्यात येतो. ऐतिहासिक संशोधनाचे उद्दिष्ट वर्तमान घटनांचा अर्थ लावण्याच्या दृष्टीने संदर्भ म्हणून भूतकाळातील घटनांचा मागोवा घेणे हे आहे. ऐतिहासिक संशोधन पध्दतीमध्ये माहितीची आधारभूत साधने, पुरातनवस्तु संशोधन शास्त्रातील साधने, खोदकाम केलेली साधने, दप्तरखान्यातील साधने, याशिवाय वाङ्मयीन, मौखिक व पारंपरिक साधनांवर अधिष्टित असतात.

## २) वर्णनात्मक संशोधन पध्दती :

वर्णनात्मक संशोधनात कोणत्याही घटनेच्या, समाजाच्या, सामाजिक संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्य:स्थितीचा सर्वकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते. वर्णनात्मक संशोधन पध्दती वर्तमान आधारित असते. प्राथमिकपणे ही अस्तित्वात असणा-या संबंधाशी, मतांशी, चालू प्रक्रियांशी, घटनेशी किंवा विकसीत होत असणा-या प्रवाहांशी संबंधीत असणारी संशोधन पध्दती आहे. या पध्दतीच्या उपयोजनेव्दारे संशोधक एखादी सामाजिक घटना, कार्य, उपक्रम किंवा योजना यांची सांप्रत स्थिती काय आहे याचा सखोल अभ्यास करून त्यातील गुणदोषांची वस्तुनिष्ठपणे चिकित्सा करतो. सत्य परिस्थितीचा चिकित्सकपणे शोध घेतल्यावर आणि योजनेतील गुणदोषांची चर्चा केल्यावर संशोधक परिस्थिती सुधारण्यासाठी मार्गदर्शक सुचना करू शकतो. अशा प्रकारे या संशोधनाव्दारे कार्यकर्ते, योजनाकार, व्यवस्थापक, सामाजिक आणि राजकीय संस्था यांना योग्य ते मार्गदर्शन प्राप्त होते.

या पध्दतीच्या आधारे केवळ समस्या सोडविणे एवढेच उद्दिष्ट न ठेवता मुलभूत सिध्दांतासाठी माहिती मिळविणे, मुलभूत तत्व शोधणे ही देखील उद्दिष्टे ठेवली जातात. वर्ण नात्मक संशोधनात सद्य:स्थिती काय आहे याचे वर्णन व अर्थनिर्वचन करतात. कोणती स्थिती किंवा संबंध अस्तित्वात आहेत, कोणती मते आहेत, कोणत्या प्रक्रिया चालू आहेत, कोणते परिणाम दिसून येतात, कोणत्या प्रवृत्ती दिसून येतात या बाबींशी या संशोधनाचा संबंध असतो. या संशोधनाचा मुलत: वर्तमानकाळाशी संबंध आहे. याच संबंधात संशोधकाला परीक्षण व मूल्यमापन या प्रकारांची माहिती असणे आवश्यक आहे.

## ३) प्रायोगिक संशोधन पध्दती :

काही नवीन पण वेगळया गोष्टी करण्यासाठी प्रयोग आवश्यक असतो. कारण प्रायोगिक तत्वावर नवीन परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे संशोधकाला संशोधनाची नवीन पार्श्वभूमी तयार करावी लागते आणि त्यामुळे त्याच्या अभ्यासाला गती मिळते. साधारणपणे भौतिक विज्ञान शाखांमध्ये कारण, परिणाम या घटकांचा संबंध शोधण्यासाठी आणि निष्कर्ष पडताळण्यासाठी प्रायोगिक संशोधन पध्दतीचा उपयोग केला जातो. प्रायोगिक संशोधन हे

भविष्यकाळाशी संबंधित असून परिस्थितीत केलेल्या विशिष्ट बदलांचा परिणाम तपासून दोन चलांतील कार्यकारण संबंध शोधणे व त्या आधारावर भविष्यकथन करणे हा प्रायोगिक संशोधनाचा उद्देश असतो.

**व्हिट्नी** यांच्या मते, प्रत्येक संशोधन कार्यात जेव्हा प्राथमिक अनुमानाच्या सत्यासत्यतेची चाचणी घेण्याची वेळ येते तेव्हा प्रायोगिक संशोधन पध्दतीच्या उपयोजनाला सुरूवात होते. एखाद्या समस्येवर सर्वकष विचार करून तिच्या निरसनाचा मार्ग किंवा उपाय संशोधकाला सुचतो. हा सुचलेला मार्ग अर्थात त्याचा प्राथमिक अंदाज असतो. मग तो बरोबर किंवा योग्य आहे का हे पडताळून पाहिले जाते. तो बरोबर ठरल्यास त्यामध्ये इच्छित सुधारणा घडून येते. संशोधनाच्या प्रक्रियेत संशोधकाला त्याने सुरूवातीला केलेल्या अंदाजात योग्य ते फेरबदलही करावे लागतात. या एकूण प्रक्रियेला **प्रायोगिक संशोधन** असे म्हणतात.

**डी.जे.अर्कहर्ट** यांच्या म्हणण्यानुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे प्रायोगिक शास्त्र आहे. म्हणून त्यामध्ये प्रयोगशिलतेला खूपच वाव आहे. ग्रंथालयातील परिस्थितीत समाधानकारक सुधारणा करण्याची निकड भासल्यानंतर आणि नेमकी काय समस्या आहे याचा शोध घेतल्यानंतर ती समस्या दूर करण्याच्या मार्गाचा विचार करावा लागतो. असे अनेक मार्ग असू शकतात. या मार्गांचा क्रमाक्रमाने अवलंब करून इच्छित परिणाम दिसू लागेपर्यंत ही प्रक्रिया चालू ठेवावी लागते. अशा प्रकारे ज्या मार्गाने तो इच्छित परिणाम घडून आला तो मार्ग आणि त्याचा परिणाम या दोन घटकांमध्ये कार्यकारणसंबंध निश्चित होतो. सामाजिकशास्त्र संशोधनात प्रायोगिकता ही शेवटची पायरी आहे. [१०]

१०. रिसवाडकर, म. रा., (२००९). संशोधन व्याख्या आणि पध्दती. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. ४८.

## १.९ पुर्वसाहित्य अभ्यास :

कोणत्याही विषयाचे संशोधन करावयाचे असेल तर त्या विषयाचे संशोधन झाले आहे का? हे संशोधकाला आधी पडताळून पाहणे गरजेचे आहे. कोणकोणत्या विषयाचे संशोधन झाले आहे हे त्या विषयाच्या पूर्व साहित्याचा अभ्यास केल्यामुळे लक्षात येते.

सदर संशोधन प्रकल्प पूर्ण करीत असताना अगोदर कोणी "सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचन साहित्याची गरज : एक अभ्यास" या विषयावर अगोदर कोणीही संशोधन केलेले नाही याची खात्री करूनच सदर संशोधन करण्यास प्रारंभ केला आहे.

**१. भविष्यातील वाचक, लेखक, साहित्यिक घडविण्यासाठी प्रयत्न केले जावेत.**

आपल्या मुलांनी चांगले वाचक, लेखक, साहित्यिक व्हावे, त्यांनी स्वतंत्र विचार करावा, त्यांची कल्पनाशक्ती बहरावी, त्यांना ज्ञानाचे नवनवे मार्ग कसे शोधावेत ते कळावे, यासाठी आपल्याला विचारपूर्वक काही गोष्टी कराव्या लागतील. उदा. १) मुलांना भाषा व्यवस्थित शिकवायची आहे हे लक्षात घेऊन आणि त्याचवेळी त्यांच्या बौध्दिक व भावनिक गरजा लक्षात घेऊन पुस्तकांची निर्मिती करणे. २) मुलांसाठी तयार झालेली पुस्तके सर्व स्तरांतील मुलांपर्यंत पोहोचवणे. ३) मुलांना वाचायला प्रवृत्त व प्रोत्साहित करणे. ४) मुलांना वाचनाची विशिष्ट दृष्टी देणे.[११]

---

**११. कणेकर, प्रतिभा. (रविवार १४ सप्टेंबर २०१४). उद्याचे वाचक घडविण्यासाठी अमेरिकेतील प्रयत्न. लोकमत. लोकरंग. पृ. २.**

## २. अवांतर वाचनसाहित्य हिच शिदोरी :

ग्रंथांमध्ये लेखकाने मांडलेल्या विचारामुळे लेखकाला प्रत्यक्ष न भेटता त्यांनी पुस्तकात मांडलेले विचार वाचून वाचकांच्या ज्ञानात भर पडते. थोर पुरूषांची चरित्रे व आत्मचरित्रे मानवाच्या व्यक्तीमत्व विकासाला पोषक अशी परिस्थिती निर्माण करतात. आयुष्यातील आव्हाने पेलण्यासाठी अवांतर वाचन हीच शिदोरी आहे. म्हणून प्रत्येक ग्रंथालयात, मग ते कोणत्या प्रकारचे ग्रंथालय असो! अवांतर वाचनसाहित्याचा काही साठा असायलाच पाहिजे.[१२]

## ३. वाचन विद्यालय :

शालेय शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये 'ग्रंथालय वाचन' असा विषय अनिवार्यच असायला हवा. वाचावे कसे आणि काय वाचावे हे शिकवावेच लागते. पाश्चिमात्य देशांत ग्रंथालयाचा विषय अभ्यासक्रमात सामावूनच घेतलेला असतो. तसा भाग आपल्याकडे केव्हा येईल कोण जाणे!

किमानपक्षी 'संगीत विद्यालय' 'क्रिकेट कोचिंग' प्रमाणे एक तरी 'वाचन विद्यालय' निर्माण व्हायला हवे. असे विद्यालय मुलांना वाचन कसे करावे का करावे ते तरी शिकवील. आपल्या देशातील ग्रंथपालांनी असा प्रयोग करायला काय हरकत आहे.[१३]

---

१२. अवांतर वाचनसाहित्य हिच शिदोरी. (०२ ऑगस्ट २००८). **Retrieved from In http://www.manatala.wordpress.com (accessed on 13.07.2014)**

१३. चिपळुणकर, विष्णुशास्त्री. (डिसेंबर २००४ ते फेब्रुवारी २००५). वाचन विद्यालय : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९.

## ४. साहित्य आणि समाज एकमेकांशिवाय अपूर्ण :

"साहित्य आणि समाज यांच्यात प्रेमाचे नाते आहे. ते एकमेकांशिवाय अपूर्ण आहे. समाज नसेल तर साहित्यही जगू शकणार नाही. त्यामुळे जेवढा लेखक महत्वाचा तेवढेच वाचकही महत्वाचे आहेत. साहित्याची क्षमता खूप मोठी असते. कथा आणि कविता हे साहित्यप्रकार जुळे आहेत. कवितेत थेट आत्माविष्कार असतो तर कथेत साक्षात नसला तरी प्रतीकात्मक आत्माविष्कार असतो. एका ठिकाणी लेखकाचा प्रत्यक्ष तर दुसरीकडे अप्रत्यक्ष आत्माविष्कार असतो. कविता म्हणजे अर्थाने तुडुंब भरलेली भाषा असते." दिनकर शिलेदार लिखित 'तृणांकर' काव्यसंग्रह आणि 'दुर्वांकुर' कथासंग्रह या पुस्तकांच्या पुणे येथे दि.७.१0.१४ रोजी झालेल्या प्रकाशन सोहळयात जेष्ठ साहित्यिक डॉ.द.भि.कुलकर्णी यांनी आपले मत व्यक्त केले.[१४]

## ५. तरूणाई करतेय वाचनाचा सगजतेने विचार :

तरूणाईने विद्यार्थीदशेपासूनच वाचनाची आवड जोपासावी यासाठी "नॅशनल बुक ट्रस्टने" केलेल्या "राष्ट्रीय युवक वाचक सर्वेक्षणाव्दारे" १)शाळा, महाविद्यालयांमध्ये अवांतर वाचनांसाठी ठराविक सुट्टी मिळावी २) ग्रंथालयांशी संपर्क सुलभ व्हावा ३) जेष्ठांकडून प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळावे, असे संवेदनशील पर्याय पुढे आले आहेत.[१५]

---

१४. साहित्य आणि समाज एकमेकाशिवाय अपुर्ण. (मंगळवार, ७ आक्टोबर २०१४). दै. लोकमत, हॅलो पुणे, पृ. ३.

१५. तरूणाई करतेय वाचनाचा सगजतेने विचार. (२१ जानेवारी २०११). **Retrieved from In http://epaper.esakal.com/esakal (accessed on 12.07.2014)**

### ६. विविध महाविद्यालयातील ग्रंथपालांची निरीक्षणे :

दै.महाराष्ट्र टाईम्सने साहित्यसंस्कृतीचा वेध घेतला. त्यावेळी विद्यार्थी वाचनसवयींचा आढावा घेताना आबासाहेब गरवारे कॉलेजच्या ग्रंथपाल डॉ. वंदना शेलार म्हणाल्या की, विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परीक्षांसाठीच्या पुस्तकांना आणि त्या विषयीच्या संदर्भांना मोठी मागणी आहे. मोठे कथासंग्रह किंवा कादंब-या वाचण्यापेक्षा विद्यार्थी छोटे कथासंग्रह वाचने पसंत करताना दिसतात. अभ्यासाला असलेले काव्यसंग्रह वाचतात. नेट-सेट, बँकिंग, क्लिरिकल परीक्षेची तयारी करण्यासाठी आवश्यक पुस्तकांनाही विद्यार्थ्यांकडून मागणी आहे. त्या खालोखाल व्यक्तिमत्व विकासावर आधारित पुस्तके वाचली जातात. आत्मचरित्रांचे वाचनही विद्यार्थी करतात. नव्या साहित्यिकांच्या साहित्याचा आढावा घेण्यात विद्यार्थी मागेच असल्याचे डॉ. शेलार यांनी नमुद केले.

गणेशखिंड मॉर्डन कॉलेजच्या ग्रंथपाल डॉ.संगीता ढमढेरे यांनीही या परिस्थितीला दुजोरा दिला. विद्यार्थ्यांसाठी कॉलेजमध्ये विविध विषयांची संदर्भपुस्तके आणि अवांतर वाचनासाठी नानाविध प्रकारचे साहित्य उपलब्ध करून दिले जाते. त्याचा लाभ घेण्याची मानसिकताच विद्यार्थ्यांमध्ये दिसत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्राध्यापकांच्या सल्ल्यानुसार विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन असल्याचा निष्कर्षही डॉ. ढमढेरे यांनी मांडला.

विद्यार्थ्यांकडून 'ययाती', 'महानायक', 'श्रीमान योगी', 'स्वामी', 'येस माय डेअर', 'मृत्यंजय' यासारख्या कथासंग्रहांना विशेष मागणी असते. सिनेमा आणि मालिकांचा पाया असलेल्या पुस्तकांना त्या त्या काळात मागणी जास्त असते. पु.ल.देशपांडे, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम, अच्युत गोडबोले, चेतन भगत, सुहास शिरवळकर, लक्ष्मण माने इत्यादी लेखकांची पुस्तके आवडतात असे दिसून आले.

विविध स्पर्धांची तयारी करणारे विद्यार्थी सोडले तर अवांतर वाचनासाठी साहित्याकडे तुलनेने कमीच वळतात. स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांकडे विद्यार्थ्यांचा ब-यापैकी कल आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी 'बुक अवर' सारखे उपक्रम महत्वाचे ठरणार असल्याचे एसपी कॉलेजच्या ग्रंथपाल प्रतिभा साखरे यांनी नमुद केले.

नव्या आणि तरूण साहित्यिकांविषयी तितकीशी जाणीवही नाही आणि त्यांच्या साहित्याचे वाचनही नाही. विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकडून डिजिटल बुक्संना पसंती दिली जाते. इतरांना छापील पुस्तकेच प्रिय वाटतात. विविध माध्यमांमधून मिळणा-या माहितीपेक्षा शिक्षक-प्राध्यापकांकडून मिळणा-या माहितीच्या आधारावरच पुस्तकांचे वाचन केले जाते.[१६]

**७. जगातील बुक कॅफे :**

१. द ग्राउंड्स अॅलेक्सांड्रिया, ऑस्ट्रेलिया

२. द व्हिंटेज एंपोरियम, लंडन

३. हॉटेल सेंट्रल अँड कॅफे, कोपनहेगन

४. बालझॅक टोरांटो

५. लोसिव्हा थी, पॅरिस

६. ला डिस्ट्रिब्युटाइस, मॉँट्रियल

७. लिटल नॅप कॉफी स्टँड, टोकियो

८. स्निककार बॅकेन ७ स्टॉकहोम

९. कॅफे कॉच्युम, पॅरिस

१०. लीली व्हॅनिली, लंडन [१७]

---

१६. बोराटे, योगेश. विविध महाविद्यालयातील ग्रंथपालांची निरिक्षणे. (३० सप्टेंबर २०१३). पुणे, दै. महाराष्ट्र टाइम्स **Retrieved from http://maharashtratimes.indiatimes.com (accessed on 13.07.2014)**

१७. जगातील बुक कॅफे. (शनिवार, ४ आक्टोबर २०१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

## ८. ग्रंथवाचन : एक विशेष उपदेश :

'मन बिघडणे हा कादंब-या वाचनापासून होणारा एक अनर्थ आहे. दुसरा अनर्थ मनाचे दौर्बल्य.' कादंब-याच वाचनाची ज्यास एकदा चटक लागते त्यास मग दुसरे काहीच वाचावेसे वाटत नाही. कादंब-या भराभर वाचावयाच्या त्यात समजण्यासही काही कठीण नसते. यास्तव विद्या काय ती ही असे वाचणारास वाटू लागून त्याहून वरचढ जे शास्त्रीय वगैरे ग्रंथ आहेत त्यांचा त्यास त्रासच होऊ लागतो. त्यात शिकणाराने आपली मति शिरकवावी लागते कारण ते कठीण व गहन विषय असतात पण ते यांच्याने होत नाही. अशी एकदा सवय पडून गेली म्हणजे मग ती कधीही मोडता येत नाही. याप्रमाणे वाजवीपेक्षा जास्त असा हा कादंब-यांचा नाद लागला असता तो मनास अपाय करतो. ते अगदी नि:सत्व होऊन कोणतेही श्रमाचे काम त्यास झेपेनासे होते.[१८]

## ९. पुस्तकातून उभारणार समाजासाठी निधी!

राजहंस प्रकाशनाच्यावतीन प्रसिध्द झालेल्या मृणालिनी चितळे यांच्या 'मेळघाटावरील मोहर' या पुस्तकानं डॉ.रवींद्र आणि डॉ.स्मिता कोल्हे या दाम्पत्याच्या सेवाकार्याबद्दल मराठी वाचकांना ख-या अर्थानं ओळख झाली. अनेकांनी केवळ त्यांचं नाव ऐकल होतं पण या पुस्तकानं ते मेळघाटात विशेषत: बैरागडला काय करतात त्याचीही सगळयांना कल्पना आली. हे दोघंही तेथील आदिवासींवर किती कमी पैशात उपचार करतात, तेथील आदिवासींच्या अडचणी सोडवण्यासाठी पैशांची किती गरज आहे हे देखील अनेकांना जाणवलं. कोल्हे दाम्पत्य ज्या तडफेनं तिथं काम करत आहे त्यांच्या समाजसेवेच्या प्रकल्पांना समाजाचा हातभार लागावा या हेतून राजहंस प्रकाशनांन एक योजना आखली आहे. या पुस्तकाची पहिली आवृती संपली.

---

१८. संपादकीय. (२००५). ग्रंथवाचन एक उपदेश : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. **Retrieved from http://www.ycmou.com** मार्च-एप्रिल-मे पृ. ४.

आता नव्या आवृतीची विक्री करताना त्यांनी पुढील योजना आखली आहे. या योजनेनुसार १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २00१४ या कालावधीत विक्री होणा-या मेळघटावरील मोहर या पुस्तकाच्या प्रत्येक प्रतीमागे ५0 रू. या अभियानासाठी वेगळे काढले जातील. अशाप्रकारे जमा होणा-या निधीत लेखक आणि प्रकाशक आपल्या स्वत:च्या निधीची भर घालतील. हा एकत्रित निधी मेळघाटातील कामासाठी वापरला जाईल. या अभियानातून मोठा निधी उभारला जाईल असा प्रकाशकांना विश्वास आहे. एखादं पुस्तक समाजकार्यासाठी अशा प्रकारे निधी उभारू शकतं हे या अभियानातून स्पष्ट होईल.[१९]

---

१९. पुस्तकांतून उभारणार समाजासाठी निधी. (रविवार, ५ ऑक्टोबर २०१४). दै. सकाळ, सप्तरंग, पृ. २२.

## १.१० स्वागत नव्या पुस्तकांचे :

**दै.सकाळ 'सप्तरंग'** आणि **दै.महाराष्ट्र टाइम्स 'संवाद'** या रविवारच्या पुरविण्यांमध्ये बाजारात नवीन आलेल्या तसेच काही जुन्या पुस्तकांची माहिती प्रकाशित केली जाते. या माहितीचा उपयोग पुस्तकांविषयी माहिती मिळविण्यासाठी होतोच. तसेच ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य खरेदी करण्यासाठी ही माहिती उपयोगी पडू शकते. पुस्तक कोणत्या विषयावर आधारित आहे त्याचा लेखक, पृष्ठसंख्या, प्रकाशक, किमंत यांचीही माहिती दिलेली असते. अशा काही पुस्तकांविषयी **स्वागत नव्या पुस्तकांचे** आणि **पुस्तकपरिचय** या सदरामध्ये ओळख करून दिलेली आहे.

### १. पुण्यातील गणेश विसर्जन :

**श्री मंदार लवाटे** यांनी **गणेश विसर्जन मिरवणुकीचा इतिहास** यात कथन केला आहे. १८९३ ते २०१३ पर्यंत पुण्यात निघालेल्या गणेश विसर्जन मिरवणुकीतील ठळक घडामोडी, मिरवणुकीत काळानुरूप झालेले बदल तसेच त्यांना लागणारा वेळ आदी बाबींची माहिती मिळते. ब्रिटिशांच्या राजवटीत उत्सवातील त्या महत्वाच्या बाबींवरही कशी बंधन आली होती ते लवाटे यांनी सांगितले आहे. मिरवणुकीची जुण्या काळातील छायाचित्रंही इथं पाहायला मिळतात. प्रकाशक : सकाळ प्रकाशन पुणे, पृष्ठ : १६०, मूल्य : ३०० रूपये.

### २. अस्वस्थ क्षणांचे पाश :

माणसाला माणूस म्हणून मान्यता देणा-या मूल्यांसाठी जागल्याची भूमिका घेणा-या **कवितांचा हा संग्रह** आहे. नाशिक येथील **समाधान महाजन** यांच्या या संग्रहातल्या कविता जशा हळूवार आहेत. तशा त्या व्यवस्थेवर डंख मारणा-याही आहेत. त्या वेदनेशी नातं सांगतात आणि प्रतिभेचे पंख घेऊन भाव-भावनांचा विचार-विकारांचा तळही शोधतात. या काव्यसंग्रहाला माजी संमेलनाध्यक्ष उत्तम कांबळे यांनी अभिप्राय दिला आहे. मुखपृष्ठ धनंजय गोवर्धन यांचं आहे. प्रकाशक : शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, पृष्ठ : ७२, मूल्य : १२० रूपये.

**३. सुगम भागवत कथामृत :**

व्यासरचित श्रीमद्‌भागवत या ग्रंथाची ओळख करून देणारं पुस्तक **विठ्ठल बांदल** यांनी लिहिल आहे. भागवतामधील ९८ कथा निवडून त्यांनी मराठीत त्याचं संक्षिप्त रूप केलं आहे. भागवत पुराणांमध्ये १२ स्कंध मिळून ३३५ अध्याय आहेत. हा ग्रंथ पूर्णपणे मराठीत आणणं अवघड आहे. बांदल यांनी मूळ ग्रंथ वाचायची उत्सुकता निर्माण व्हावी अशा पध्दतीनं या कथांबरोबरच भागवत ग्रंथाची ओळखही थोडक्यात इथ करून दिली आहे. प्रकाशक : सनय प्रकाशन पुणे, पृष्ठ : ३१२, मूल्य : ३00 रूपये.

**४. रिबॉन अॅट ५४ :**

कॉस्ट अकाउंटंट **अशोक नवाल** यांना एक **अपघात** होऊन बरेच दिवस रूग्णालयात काढावे लागले. व्यवसाय सुरू असताना झालेल्या या जीवघेण्या अपघातानं त्यांच्यावर मोठं संकटच कोसळलं होतं. या अपघातातून ते बाहेर आले आणि पुन्हा काम सुरू करू लागले ते केवळ इच्छाशक्तीच्या बळावरच. विलक्षण कसोटी पाहणारा हा रूग्णालयातील कालखंड आणि त्या काळात ते कसे सावरले त्यांचं काम ते कसं करत होते याचा तपशील या पुस्तकात त्यांनी दिला आहे. अपघाताआधीची वाटचाल आणि त्यानंतरची पुनर्जन्माचीच ही कथा त्यांनी नेमकेपणानं सांगितली आहे. प्रकाशक : आनंदयात्री प्रकाशन जळगाव, पृष्ठ : १६४, मूल्य : १५0 रूपये.

**५. तरंग... :**

**निशा भोरस्कर** यांचा हा पहिलाच **कथासंग्रह** आहे. यात १३ कथा असून त्यात त्यांनी वेगवेगळे विषय हाताळले आहेत. लग्नाचं वय उलटून गेलेली प्रौढा, एका चिमुकल्या मुलीवर नातेवाइकांकडून झालेला आत्याचार, घरात नकोशी झालेली सासू असे विविध विषय कथांमधून समोर येतात. भोपाळ दुर्घटनेचा बळी ठरलेल्या कुटुंबांचीही कथा यात आहे. प्रकाशक : वसंत भोरस्कर इंदूर, पृष्ठ : ११0, मूल्य : १00 रूपये.

**६. शैक्षणिक क्रांतीचं तत्त्वज्ञान :**

घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र दिला. शिक्षणाचं महत्व त्यांनी नेमकेपणाने ओळखलं होतं. शिक्षणातूनच क्रांती होईल असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या या क्रांतीमागचं **तत्त्वज्ञान** काय होतं याचा वेध या पुस्तकात घेण्यात आला आहे. १२ लेखकांनी हे तत्त्वज्ञान सोप्या शब्दात समजावून सांगितलं आहे. डॉ.बबन जोगदंड यांनी संपादन केलं आहे. प्रकाशक : यशोदिप प्रकाशन पुणे, पृष्ठ : १६०, मूल्य : २५० रूपये.

**७. रागपरिचय :**

**शास्त्रीय संगीताच्या** कानसेनांना प्रत्येक रागाची परिपूर्ण माहिती असतेच असं नाही. ही माहिती देण्याचं काम हे छोटेखानी पुस्तक करतं. संगीतविशारद **अपर्णा सोमण** यांनी निवडक ४७ रागांची माहिती दिलेली आहे. त्याचं स्वरूप आणि तो दिवसाच्या कोणत्या वेळी गातात, त्या रागात बांधण्यात आलेल्या काही गाण्यांची सुरवातीची ओळ अशी माहिती यात आहे. थाटाचे प्रकार आणि ताल व स्वरलेखनपध्दती याचीही ओळख त्यांनी करून दिलेली आहे. प्रकाशक : विद्याधर सोमण पुणे, पृष्ठ : ६४, मूल्य : ५० रूपये.[२०]

२०. स्वागत नव्या पुस्तकांचे. (रविवार, ५ ऑक्टोबर २०१४). दै. सकाळ, सप्तरंग, पृ. २०.

## १.११ पुस्तकपरिचय :

विविध वृत्तपत्रांमध्ये पुस्तकपरिचय या सदराखाली बाजारात आलेल्या नवीन तसेच काही जुन्या पुस्तकांची माहिती प्रसिध्द केली जाते. अशी माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ग्रंथालयांनी केला पाहिजे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाविषयी गोडी निर्माण होईल. तसेच त्यापैकी काही पुस्तकांची ग्रंथालयांनी खरेदी केली पाहिजे जेणेकरून विद्यार्थ्यांना सहजरित्या अशा पुस्तकांचे वाचन करणे सोयीचे होईल. अशाच काही पुस्तकांचा खाली परिचय करून दिलेला आहे.

### १. ऑफ बीट भटकंती :

अनेकांसाठी पर्यटन म्हणजे केवळ अनुभव नाही, तर त्यांच्या जगण्याचा तो श्वास असतो. नवनवीन देश ठिकाणं पाहण्याची, शिकण्याची, जाणून घेण्याची उर्जा त्यांना आपोआपच मिळत असते. या उर्जेतूनच मग प्रचंड महाकाय अशा माहितीचा साठा त्यांच्या नकळत तयार होत असतो. **जयप्रकाश प्रधान** यांनी **'ऑफबीट भटकंती'** या पुस्तकातून असाच पर्यटनाचा खजिना खुला करून दिला आहे. पाच खंडांमधील विविध देशांतील त्यांची ही दिलखुलास मुशाफिरी आपल्यालाही भ्रमंतीचा आनंद देऊन जाते.

लेखकाने प्रवासवर्णन करत असतानाच अनेक छोटया छोटया टीपही दिल्या आहेत. याशिवाय ठिकाणाचं वर्णन वाचल की तेथे कस जायचं, कधी जायचं, लोकसंख्या, चलन, भाषा आणि मुख्य म्हणजे सुरक्षितता याची सगळी माहिती देण्यात आली आहे. काही मजेशीर उल्लेखनीय प्रसंगही मांडण्यात आले आहेत. लेखकाच्या नजरेतून जसजशी या ऑफबीट स्थळांची, तिथल्या माणसांची ओळख होत जाते, तसतसं हा अनुभव किंबहुना नशा आपणही अनुभवायला हवी अशी इच्छा होते. प्रर्यटनप्रेमींसाठी तर ही भटकंती प्रेरणादायी अशीच आहे. प्रकाशक : रोहन प्रकाशन, मुखपृष्ठ : राजू देशपांडे, शेखर गोडबोले पृष्ठ : २३५, मूल्य : २४0 रूपये.

२. **पर्यटन एक संजीवनी :**

**डॉ.लिली जोशी** यांचं **'पर्यटन एक संजीवनी'** हे प्रकाशित झालेले पुस्तक पर्य टकांसाठी खरच संजीवनी ठरत आहे. या पुस्तकात वेगळया पध्दतीची भन्नाट प्रवासवर्णन वाचायला मिळतात. डॉ.लिली यांनी भेट दिलेल्या ठिकाणांची केवळ माहितीच नाही, तर त्याचे विविध कंगोरे उलगडवून दाखवले आहेत.

लेखिका या पुस्तकातून ग्रीक, स्कॉटलंड, अलास्का, केनिया अशी भटकंती सांगत असतानाच विदेशी संस्कृतीचे पैलूही उलगडवून दाखवते. यामध्ये हार्वर्ड बिझनेस स्कुल आणि गूगलची कार्यसंस्कृती याचा विशेष उल्लेख करावा लागेल. हा अनुभव खरोखरच चकित करून जातो. दक्षिण अफ्रिकेतील टोकाचा लिंगभेद, पुरूष अस्मिता जपणा-या तिथल्या जाहिराती, तिथली स्त्री, तिची मानसिकता हे सारं लहान लहान प्रसंगांतून पुढे येतं. एकुणच हे पुस्तक केवळ प्रवासवर्णन नाही, तर भेट दिलेल्या स्थळांचा खोलपर्यंत घेतलेला शोध आहे. हा शोध अस्सल पर्यटनप्रेमींना संजीवनी देणारा नक्कीच ठरेल. प्रकाशक : रोहन प्रकाशन, मुखपृष्ठ : रोहन चंपानेरकर, रेश्मा वाळुंज पृष्ठ : २२३, मूल्य : २00 रूपये. [२१]

---

२१. पुस्तक परिचय. (रविवार, १९ ऑक्टोबर २०१४). दै. महाराष्ट्र टाइम्स, संवाद, पृ. ७.

## १.१२ स्वागत दिवाळी अंकांचे :

साधारणपणे दिवाळी जवळ आल्यावर दिवाळी अंकांची आतुरतेने वाट पाहिली जाते. दै. लोकमतमध्ये प्रकाशित झालेल्या तसेच आगामी दिवाळी अंकांची माहिती 'स्वागत दिवाळी अंकांचे' या सदरामध्ये प्रकाशित केली जाते. या सदरामध्ये वेगवेगळया प्रकाशकांचे, दैनिकांचे, नियतकालिकांचे दिवाळी अंक प्रकाशित होत असतात. यामध्ये दिवाळी अंकांच्या अंतरंगाचा थोडक्यात परिचय दिलेला असतो. ग्रंथालयात दिवाळी अंकांची खरेदीच्या दृष्टीने ही माहिती उपयुक्त ठरू शकते. अशा काही दिवाळी अंकांचा खाली परिचय करून दिलेला आहे.

### १. दुर्गाच्या देशातून...

किल्ले हेच प्रेरणास्थान मानून गेल्या तीन वर्षापासून 'दुर्ग दिवाळी विशेषांक' काढला जात आहे. दुर्गाविषयी सर्व काही हेच या अंकाचे वैशिष्ट्य आहे. सह्याद्रीचा अनुभव एकदा तरी प्रत्येकाने घ्यावा यावर अजय ढमढेरे यांनी आपले अनुभव व्यक्त केले आहेत. दर्यासारंग आंग्रे आणि मराठयांचा आरमारी इतिहास यावर रघुजीराजे आंग्रे यांनी लेखन केले आहे. वनदुर्ग भीमगड, बा रायगडा, सोलापूरचे दुर्गविभव, नाणेघाटाचा परिसरात, मांजरसुंभा, किल्ले उद्‌गीर आदी लेख उत्तम माहिती देणारे ठरले आहेत. एकुणच दुर्गा विषयी प्रेम असणा-यांना व ट्रेकिंग करणा-यांना हा अंक म्हणजे एक खास पर्वणीच ठरणारा आहे. आंबोली, सुधागड, रोहिडा यांविषयी व गिरिकन्यावरील लेख वाचकांना वेगळी अनुभूती देतात. **संपादक : संदीप तापकीर, गणेश खंडाळे**

### २. अक्षरदान :

अक्षर हाच ध्यास असणा-यांनी एकत्र येऊन पहिल्यांदाच 'अक्षरदान' दिवाळी अंक काढला आहे. याचे वेगळेपण म्हणजे सर्व तरूणांनी हा अंक पेलला आहे. यामध्ये प्रा. इंद्रजित भालेराव यांनी दीर्घ कवितेमागची प्रेरणा निर्मिती आणि पडलेला प्रभाव याच विवेचन जन्म कुळंबिणींच्या कहाणींचा या लेखात केला आहे. जेष्ठ साहित्यिक समीक्षक डॉ.श्रीपाल सबनीस यांनी महाराष्ट्रातील काही समीक्षकांनी जातीच्या भिंतीत नामदेवांना कसे उपेक्षित

ठेवले याचा ऊहापोह 'संत साहित्य समीक्षतेतील जात वास्तव' या लेखात केला आहे. प्रा. रामनाथ चव्हाण यांनी भटक्या विमुक्तांचे लोकजीवन कसे असते त्यावर लेख लिहिला आहे. एकुणच चांगलं लेखन करणा-यांचे 'अक्षर' एकत्र करून हा पहिलाच अक्षरदान वेगळी छाप पाडतो. **संपादक : मोतीराम पौळ**

३. **अपेक्षा :**

कथा, कविता, वैचारिक, काव्यमैफल, व्यंगचित्रे, वात्रटिका आदी भरगच्च वाचनीय मजकूराने हा अंक नटलेला आहे. यंदा 'आभाळ मनाची माणस' या विशेष विभागात शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, डॉ.प्रकाश बाबा आमटे, गोपीनाथ मुंडे, डॉ.रामचंद्र देखणे आदी उत्तुंग कार्य करणा-यांचे आयुष्य उलगणारे लेख दिले आहेत. त्यामधून वाचकांना नक्कीच जगण्यासाठी काहीतरी घेता येण्यासारखे आहे. वैचारिक विभागात सुखाचा शोध, मन, जरा विसावू : विकास वळणावर, देवराई : दुवा साधणारी परंपरा ठरावी, संस्कार महती, मुलांना कसे घडवाल आदी लेख आहेत. वाचकांसाठी दिवाळीतील शब्दांचा खजिनाच या अंकातून वाचावयास मिळणार आहे. गुन्हेगारीमुक्त समाजासाठी भावी पिढीच्या सुरक्षेसाठी हा उदय जगताप यांचा लेख तर प्रत्येकाला विचार करावयास लावणार आहे. **संपादक : दत्तात्रय उभे**

४. **विशाखा :**

'विशाखा' हा यंदाचा अंक सबकुछ भालचंद्र नेमाडे असा आहे. त्यांच्यावरील विशेष पुरवणी ही या अंकाची खासियत. नेमाडे यांच्या साहित्याचे समीक्षण विविध साहित्यिकांनी केले आहे. संजय भास्कर कुलकर्णी, रवी प्रकाश कुलकर्णी यांचे लेख नेमाडे यांचे वेगळे पैलू दर्श विणारे आहेत. कथा विभागात मधू मंगेश कर्णिक, रविंद्र शोभणे, ह.मो.मराठे यांच्या कथा विविध विषयांना स्पर्श करणा-या आहेत. शिवराय गोर्ले यांचा विनोदी लेख आहे. सुप्रसिध्द कादंबरीकार बाबा कदम यांचे चिरंजीव उमेश कदम यांच्या साहित्याचा परिचय अनंत मनोहर यांनी करून दिला आहे. विविध लेखकांच्या कविता आहेत. **संपादक : ह.ल.निपुणगे**

### ५. साहित्य चपराक :

साहित्य, विनोदी, वैचारिक व त्याचवेळी रंजक अशा साहित्याने नटलेला हा दिवाळी अंक वाचनीय झाला आहे. संजय एलवाड यांचा 'छापता छापता' हा लेख बातमीदार आणि उपसंपादकाच्या गमतीदार चुका दाखवताना 'ध' चा 'मा' होऊ नये याची काळजी किती आवश्यक आहे ते सांगून जातो. भटक्या विमुक्ताच्या शैक्षणिक समस्या प्रा.रामनाथ चव्हाण यांनी मांडल्या आहेत. तर शेषराव मोरे यांचा इस्लामची मूलतत्वे सांगणारा लेख या धर्माचा लेखाजोखा मांडणारा ठरावा. मराठी कादंबरीनं सामान्य वाचकांना काय दिलं तिचं जागतिक व भारतीय साहित्यात स्थान काय याचा आढावा उमेश सणस यांनी घेतला आहे. नव्या, जुन्या दमाच्या कवितांनी काव्यपुष्प सजले आहे. **संपादक : घनश्याम पाटील** [२२]

---

२२. स्वागत दिवाळी अंकांचे. (गुरूवार, २३ ऑक्टोबर २०१४). दै. लोकमत, हॅलो पुणे, पृ. ८.

**१.१३ प्रेरणात्मक लेख :**

सर्वसामान्य माणुस एखाद्या व्यक्तिला आदर्श मानतो आणि त्याच्या कार्याची प्रेरणा घेऊन आपले जीवन जगत असतो. डॉ.पी.जे.सुधारकर यांनी शिक्षणाची आवड जोपासण्यासाठी घेतलेले कष्ठ आणि मिळविलेल्या पदव्या, तसेच समाजासाठी केलेले कार्य या गोष्टींचा आदर्श डोळयासमोर ठेवून शिक्षणाची आवड असलेल्या व्यक्तिनी आपल्या जीवनात वाटचाल करावी असे संशोधकास वाटते.

**१. शंभर पदव्या ; डझनभर पीएच.डी.**

मनात ठरवले तर आकाशही ठेगणे होते. त्यासाठी हवी असते जिद्द, कष्टाची तयारी आणि संयम. परिस्थितीही बदलते सगळे अवाक होतात आणि तुमच्या कर्तृत्वाला सलाम करतात. असेच कर्तृत्व आंध्रातील विशाखापट्टणम जिल्ह्यातील रेडागडी गावातील **डॉ.पी.जे.सुधाकर** यांचे आहे. शिक्षणाची आवड असल्याने **शतकवीर पदवीधर** होण्याचा अवघड टप्पाही पार केला. वेगवेगळया विषयांत **१२ पीएच.डी.** करून २९ पुस्तके त्यांनी लिहिली. २२ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. **१०२ पदवी आणि ४ भाषा पदवी** त्यांनी केल्या आहेत. त्यांना २९ पारितोषिके मिळालेली आहेत.

"शिक्षण घेण्याचीच आमची ऐपत नव्हती. परंतु काम करत करत शिक्षण घ्यावं हे मनाशी ठरवलं. त्यामुळे पडेल ते काम करीत शिकलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून प्रेरणा घेऊन जिद्दीनं एवढं शिक्षण घेतलं." असे त्यांनी सांगीतले.

त्यांनी राष्ट्रीय मनोरूग्ण आरोग्य अभियानाची स्थापना केली असून ही संस्था १०० मानसोपचार तज्ज्ञांच्या सहाय्याने एड्स रूग्णांचे समुपदेशन करत आहे. आगामी काळात एक विद्यापीठ स्थापन करायचे आहे. देशात युवकांची राष्ट्रीय चळवळ उभारायची आहे अशी स्वप्ने डॉ.सुधाकर पाहात आहेत. [२३]

---

२३. शंभर पदव्या, डझनभर पीएच.डी. (सोमवार, १५ जून २०१३). दै. सकाळ. पृ. ७.

## २. शिक्षण नववीपर्यंतचे; लेखन तीन विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात !

लौकिकार्थाने शालेय शिक्षण नववीपर्यंतच झालेले. पण **विमल मोरे** यांचे 'तीन दगडांची चूल' हे पुस्तक **मुंबई, गुलबर्गा आणि गोंडवाना** या तीन विद्यापीठांच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. भटक्या जमातीमध्ये असल्याने वारंवार फिरस्ता, त्यामुळे जेमतेम नववीपर्यंत शिक्षण झाले. कुडमुडे जोशी समाजातील 'गबाळ'कार दादासाहेब मोरे यांच्याशी विवाह झाला. त्यांच्यामुळे वाचनाची आवड निर्माण झाली. आपलंही जगणं शब्दबध्द करावं या भूमिकेतून 'तीन दगडांची चूल' हे आत्मकथन लिहिले. या पुस्तकातील काही भाग डॉ.शर्मिला रेगे यांनी इंग्रजीमध्ये अनुवादित केला असून हे लेखन आता हिंदीमध्येही अनुवादित होत आहे. [२४]

२४. शिक्षण नववीपर्यंतचे; लेखन तीन विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात. (मंगळवार, २१ मार्च २०१३). दै. **लोकसत्ता,** पृ. ५.

**संदर्भ सूची :**

१. अवांतर वाचनसाहित्य हिच शिदोरी. (0२ ऑगस्ट २00८). Retrieved from In http://www.manatala.wordpress.com (accessed on 13.07.2014)

२. तरूणाई करतेय वाचनाचा सगजतेने विचार. (२१ जानेवारी २0११). Retrieved from In http://epaper.esakal.com/esakal (accessed on 12.07.2014)

३. रिसवाडकर, म. रा., (२00९). संशोधन व्याख्या आणि पध्दती. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १-३. ४८.

४. रिसवाडकर, म. रा., (२00९). माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. ५.

५. आगलावे, प्रदिप. (२000). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन. पृ. १७.

६. क-हाडे, बी.एस. (२0११). शास्त्रीय संशोधन पध्दती. नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स. पृ. १२.

७. कणेकर, प्रतिभा. (रविवार १४ सप्टेंबर २0१४). उद्याचे वाचक घडविण्यासाठी अमेरिकेतील प्रयत्न. लोकमत. लोकरंग. पृ. २.

८. चिपळुणकर, विष्णुशास्त्री. (डिसेंबर २००४ ते फेब्रुवारी २००५). वाचन विद्यालय : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९.

९. साहित्य आणि समाज एकमेकाशिवाय अपुर्ण. (मंगळवार, ७ आक्टोबर २०१४). दै. लोकमत, हॅलो पुणे, पृ. ३.

१०. बोराटे, योगेश. विविध महाविद्यालयातील ग्रंथपालांची निरिक्षणे. (३० सप्टेंबर २०१३). पुणे, दै. महाराष्ट्र टाइम्स Retrieved from http://maharashtratimes.indiatimes.com (accessed on 13.07.2014)

११. जगातील बुक कॅफे. (शनिवार, ४ आक्टोबर २०१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

१२. संपादकीय. (२००५). ग्रंथवाचन एक उपदेश : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. Retrieved from http://www.ycmou.com मार्च-एप्रिल-मे पृ. ४.

१३. पुस्तकांतून उभारणार समाजासाठी निधी. (रविवार, ५ ऑक्टोबर २०१४). दै. सकाळ, सप्तरंग, पृ. २२.

१४. स्वागत नव्या पुस्तकांचे. (रविवार, ५ ऑक्टोबर २०१४). दै. सकाळ, सप्तरंग, पृ. २०.

१५. पुस्तक परिचय. (रविवार, १९ ऑक्टोबर २०१४). दै. महाराष्ट्र टाइम्स, संवाद, पृ. ७.

१६. स्वागत दिवाळी अंकांचे. (गुरूवार, २३ ऑक्टोबर २०१४). दै. लोकमत, हॅलो पुणे, पृ. ८.

१७. शंभर पदव्या, डझनभर पीएच.डी. (सोमवार, १५ जून २०१३). दै. सकाळ. पृ. ७.

१८. शिक्षण नववीपर्यंतचे; लेखन तीन विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात. (मंगळवार, २१ मार्च २०१३). दै. लोकसत्ता, पृ. ५.

# प्रकरण २ रे

## अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती

### २.१ प्रस्तावना :

शाळा कॉलेजातून शिकवले जाणारे बहुतेक सर्व विषय आपण त्यावेळी नाइलाजाने शिकतो. परीक्षेसाठी महत्वाचे तेवढेच घोकून घोकून बेजार होतो. त्यातूनही ऐनवेळी आठवले तेवढेच लिहून मोकळे होतो. इतके 'मोकळे' की त्यानंतर काही दिवसांनी जर कोणी तीच प्रश्नपत्रिका अचानक सोडवायला दिली तर आपणास काहीही आठवत नाही. कारण आता ते सर्व विषय ते संपूर्ण 'ज्ञान' पूर्णपणे विसरल्यामुळे आपलं मन निवांत झालेलं असतं. औपचारिक शिक्षणाबद्दल पूर्वी 'किती बुकं शिकलास?' असं विचारलं जाई. त्याऐवजी 'किती बुक वाचून विसरलास?' असं विचारणंच वस्तुस्थितीला धरून होईल. अवांतर वाचनाच तरी काय? आपण जे मोठं आवडीच म्हणून वाचतो त्यापैकी काय आणि किती लक्षात राहतं? लेखकाच नाव, पुस्तकाच नाव, कथा, पात्रे, प्रसंग किंवा त्यातलं तत्वज्ञान निरीक्षण, विचार यापैकी अनेक गोष्टी आपण विसरलेलोच असतो. साधारणत: अनेकांची 'विस्मरणशक्ती' जरा अधिकच असावी असे वाटते. कित्येक वेळा यापैकी अनेक गोष्टी विसरल्या जातात अन् संपूर्ण पुस्तकातून एखादच वाक्य, एखाद्या पात्राच्या व्यक्तिमत्वाचा ठसा, त्याची धारणा, एखादाच प्रसंग ऐवढचं आपल्या लक्षात राहतं बाकी सगळ पुसट झालेल असतं. आपलं हे वाचन त्या त्या वेळी मन रमवतं इतकचं. कदाचित त्यापैकी काही तपशिल काही काळ लक्षात राहतो. कालांतराने 'अमुक एक पुस्तक फार छान होतं' अशा स्वरूपाचा तपशिल लक्षात राहतो एवढचं...[१]

---

१. मीराताई,(११ सप्टेंबर २०१३). विस्मरणशक्ती. **Retrieved from http://www.misalpav.com (accessed on 13.07.2014)**

## २.२ ग्रंथालय : अध्यात्म, तत्वज्ञान आणि मनोरंजन :

पुस्तकांचे साधारणपणे तीन प्रकार पडतात. माहितीपर पुस्तके, प्रेरणादायी पुस्तके आणि मनोरंजनपर पुस्तके.

धार्मिक किंवा तत्वचिंतनपर ग्रंथांमधून शाश्वत मुल्यांचे विवेचन असते व त्यामुळे त्यांना अक्षरग्रंथ किंवा अभिजात साहित्य म्हणून संबोधले जाते. हीच प्रेरणादायी पुस्तके होत. 'भगवद्‌गीता', 'ज्ञानेश्वरी' अशा प्रकारचे ग्रंथ आहेत. असे ग्रंथ समाजातील विचारशील व्यक्तींची ज्ञानाची तहान भागवीत असतात. तात्विक गोष्टींचे विवेचन करीत असतात. या प्रकारच्या वाचनात रस असणाराही एक वाचकवर्ग समाजात असतो. त्यामुळे ग्रंथालयांमधून धार्मिक आध्यात्मिक विषयांवरील वेचक पुस्तकांचा संग्रह असणे आवश्यक आहे. अशा पुस्तकांच्या वाचनाने मनुष्याचे जीवन मुल्यात्मक दृष्टया संपन्न होते. त्याचा परिणाम म्हणून साहजिकच आचरण उदात्त होते. त्याला नैतिक अधिष्ठान लाभते.

प्रत्येक माणसाला काही वेळ रिकामा असतो. रिकामा वेळ रचनात्मक असा मनोरंजनात घालविणे इष्ट असते. तसे न झाल्यास माणूस विध्वसंक आणि नको त्या इतर गोष्टींकडे वळेल म्हणून प्रत्येकाला निकोप असे संस्कारी मनोरंजन मिळण्याची गरज आहे. हे काम ग्रंथालयातील उत्कृष्ट चरित्रवाङ्मय, ललितसाहित्य, प्रवासवर्णने, लोकप्रिय मासिके याव्दारे होत असते. म्हणून या प्रकारचे साहित्य ग्रंथालयात असणे आवश्यक आहे. [२]

२. देशपांडे, ए. व्ही., (२००९). ग्रंथालयाचा विकास आणि त्यांचे समाजातील कार्य. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.७.

## २.३ ग्रंथालय महाविद्यालयाची आधारशीला :

ग्रंथालयांना पूर्वीपासून आपल्या देशात ज्ञानाचे मंदीर म्हणून आदराचे स्थान दिले गेलेले आहे. महाविद्यालयातील ग्रंथालय हे एखाद्या दीपगृहासारखे किंवा शक्तिकेंद्रासारखे असते. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना स्वत: केलेल्या अभ्यासावरच बहुतांशी अवलंबून राहावे लागते. अशा वेळी महाविद्यालयातील ग्रंथालय त्यांना उपयोगी पडते. वर्गात शिकवलेल्या अभ्यासक्रमास पूरक अथवा सहायक अशी भूमिका ग्रंथालय बजावीत असते. अधिक वाचनासाठी पुस्तके, विविध स्थळकाळांचे अचूक संदर्भ, चालू घडामोडींचे ज्ञान इत्यादी दृष्टीकोनातून महाविद्यालयीन ग्रंथालये ही विद्यार्थीवर्गास मदत करीत असतात.

महाविद्यालयीन शिक्षण हे विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक वातावरणापेक्षा अगदी वेगळया प्रकारच्या वातावरणाचा अनुभव देत असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा आकलनाचा आवाका विस्तारलेला असतो. महाविद्यालयीन जीवनात युवकांना सामुहिक वर्त नाचे तसेच नेतृत्वगुणांचे मार्गदर्शन मिळते. विविध कार्यांत पुढाकार घेण्याची संधी मिळते. स्वत:मधील कला, कौशल्य, क्रिडापटूत्व, वाक्चातुर्य यांचा विकास करण्यास वाव मिळतो. त्या दृष्टीने नवे काही शिकण्याच्या संधी मिळतात. महाविद्यालयातील विविध अभ्यासेत्तर उपक्रमांत विद्यार्थी भाग घेऊ शकतो व त्यातून त्याला आत्मविश्वास प्राप्त होत असतो. शालेय जीवनात जे शिक्षण चार भिंतींदरम्यान व मुख्यत: शिक्षकांच्या नियंत्रणाखाली असते ते महाविद्यालयात येताच मोठया प्रमाणावर ग्रंथालयाशी केंद्रीत झाल्याची जाणीव विद्यार्थ्याला होते.

मानवाने आपल्या आदिम अवस्थेपासून आजच्या प्रगत अवस्थेपर्यंतच्या प्रदिर्घ प्रवासात जे जे महत्वाचे जतन करण्यासारखे वाटले ते ते सर्व या ना त्या स्वरूपात लिहून व जतन करून ठेवले आहे. हा वारसा अनमोल असा आहे. त्यात गद्य साहित्य तसेच काव्य, नाटय, संगीत रचना, शिल्प, नृत्य, चित्रकला यांचाही समावेश आहे. या सर्व गोष्टी मन व बुध्दीचे परिष्करण करून मानवाला एक प्रकारचे सांस्कृतिक वैभव मिळवून देणा-या आहेत. ग्रंथालयाच्या माध्यमातून या समृध्द परंपरांचे दर्शन घडावे व आनंदाचा लाभ मिळावा अशी अपेक्षा असते. ग्रंथालये या स्वरूपाच्या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करीत असतात म्हणूनच त्यांचे महत्व अबादीत आहे.

तरूण विद्यार्थीवर्गाला नवनवीन ज्ञानशाखांचा खरा परिचय महाविद्यालयात होतो. क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ, नित्यनवी माहिती देणारी नियतकालिके, विविध प्रकारची दृक-श्राव्य व तांत्रिक साधने यांच्या माध्यमांतून ग्रंथालयात एक ज्ञानमय असे वैचारिक वातावरण त्यांच्याभोवती तयार होत असते. म्हणूनच महाविद्यालयातील ग्रंथालयांना **'महाविद्यालयाची आधारशीला'** असे यथार्थपणे संबोधण्यात आले आहे. [३]

## २.४ अवांतर वाचनसाहित्य म्हणजे काय ?

"ज्या साहित्यामुळे वाचकाला वाचनाची गोडी निर्माण होऊन मनोरंजन होते तसेच विविध क्षेत्रांची व्यापक माहिती मिळते त्यास अवांतर वाचनसाहित्य असे म्हणतात."

"ज्या वाचनसाहित्याचे वाचन शैक्षणिक दृष्टीकोनाबरोबरच अधिक माहिती मिळविणे आणि मनोरंजनात्मक दृष्टीकोन ठेऊन वाचन केले जाते त्यास अवांतर वाचनसाहित्य असे म्हणतात."

वाचनाची गोडी लागावी व विविध क्षेत्रांची व्यापक माहिती मिळावी हा अवांतर वाचनसाहित्याचा मुख्य उद्देश असतो.

---

३. देशपांडे, ए. व्ही., (२००९). ग्रंथालयाचे विविध प्रकार व त्यांची कार्ये. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. ३९,६३.

## २.५ अवांतर वाचन साहित्य प्रकार :

| | |
|---|---|
| १. कथा-कांदबरी | २. काव्यसंग्रह |
| ३. आध्यात्मीक साहित्य | ४. नियतकालिके |
| ५. वृत्तपत्रे आणि वृत्तपत्रे कात्रणे | ६. स्पर्धात्मक वाचनसाहित्य |
| ७. चरित्रे आणि आत्मचरित्रे | ८. संशोधनपर वाचनसाहित्य |
| ९. प्रवासवर्णन वाचनसाहित्य | १०. शब्दकोश, विश्वकोश |
| ११. ऐतिहासिक लेख आणि पत्रे | १२. हस्तलिखिते, इत्यादी |

## २.६ महाविद्यालयीन ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आवश्यक :

कोणत्याही ग्रंथालयाची कार्यक्षमता त्या ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाची अद्ययावतता, उपयुक्तता व वैविध्य यावर अवलंबून असते. ग्रंथसंग्रहात अभ्यासोपयोगी पुस्तके असावीतच, पण या पुस्तकांबरोबरच विद्यार्थ्यांच्या अभ्यासेत्तर वाचनाच्या आवडी, गरजा, भागविणारी पुस्तकेही ग्रंथसंग्रहात असावी. आज विद्यार्थी केवळ अभ्यासोपयोगी ग्रंथाखेरीज इतर ग्रंथाचे वाचन करीत नाहीत त्याचे प्रमुख कारण त्यांना इतर ग्रंथ वाचण्याची संधीच मिळत नाही. ही संधी त्यांना प्राप्त करून देण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी त्यांना महाविद्यालय ग्रंथसंग्रहात विविध विषयांवरील चांगले ग्रंथ उपलब्ध करून द्यायला हवेत. वर्गात दिल्या जाणा-या विविध विषयांच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या ज्या वाचनाच्या गरजा निर्माण होतात त्या महाविद्यालय ग्रंथालयाला भागविता आल्या पाहिजेत. वेगवेगळया वयोगटाच्या विद्यार्थ्यांच्या आवडी, छंद जोपासण्यासाठी अवांतर वाचनाची पुस्तके ग्रंथालयात ठेवल्यास विद्यार्थी केवळ क्रमिक पुस्तकांत अडकून न पडता ते इतर पुस्तके वाचायला प्रवृत्त होतील. एकदा का विद्यार्थ्यांना असे वाङमय वाचण्याची सवय लागली की कथा, कादंब-यापेक्षा वैचारिक स्वरूपाच्या वाङमयात त्यांना अधिक रस वाटू लागतो. म्हणून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारे त्यांना विविध विषयांची ओळख करून

देणारे आणि मनोरंजन करता करता त्यांना काही शिकविणारे ग्रंथ महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहात असावयास हवेत.

आपल्या विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड आणि सवय निर्माण करून ती वाढीला लावण्याच्या कामाला महाविद्यालयांनी प्राधान्य द्यायला हवे. याचाच अर्थ असा की महाविद्यालयांतून चांगल्या प्रकारचे वाचनसाहित्य संग्रहीत करून त्याव्दारे चांगली ग्रंथालयसेवा उपलब्ध करून द्यायला हवी. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या गरजा भागविण्यासाठी अभ्यासक्रमावर आधारीत वाचनसाहित्य तसेच इतर ज्ञानवर्धक माहिती, मनोरंजन, छंद, आवड जोपासण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयात असणे अपरिहार्य आहे.[४]

### २.७ अवांतर वाचनसाहित्यासाठी आंतर महाविद्यालयीन ग्रंथालयांचा वापर करावा :

कोणतेही ग्रंथालय पूर्णत: स्वयंपूर्ण नसते. प्रत्येक महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचकांना हवे असलेले अवांतर वाचनसाहित्य त्या त्या ग्रंथालयात उपलब्ध असेलच असे नाही. त्यासाठी काही ठराविक शैक्षणिक संस्था तसेच महाविद्यालये यांनी आपसात करार करून अवांतर वाचनसाहित्याची देवघेव करावी. त्यामुळे १) वाचनसाहित्य वापरासाठीच आहे. २) प्रत्येक वाचकाला त्याचे वाचनसाहित्य मिळाले पाहिजे. ३) प्रत्येक वाचनसाहित्याला त्याचा वाचक मिळाला पाहिजे. या डॉ.रंगनाथन् यांच्या पाच सिध्दांतापैकी पहिले तीन सिध्दांत आमलात आणल्याचे समाधान ग्रंथपालांना नक्कीच मिळेल.[५]

---

४. सावे, वसंत. (२००९). शालेय ग्रंथालये. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९,४.

५. कुंभार, राजेंद्र. (२००९). वाचनसाहित्य संग्रहाचा विकास. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १४.

### २.८ आम्हालाही साहित्यविश्वात रस...

दै. महाराष्ट्र टाईम्समध्ये विविध महाविद्यालयांच्या ग्रंथपालांच्या मुलाखती प्रसिध्द झाल्या आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा आणि अवांतर वाचनाचा काहीही संबंध नाही अशी ओरड होताना दिसते. परंतु प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांनाही साहित्याची आवड आहे हे विविध कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सिध्द केले आहे. हे विद्यार्थी विविध प्रकारच्या साहित्याचे वाचन करतात आणि त्यावर चर्चाही करतात. एवढेच नव्हे तर पुणे येथील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यी सासवड येथील साहित्य संमेलनाला हजेरी लावणार आहेत असे ३ जुन २०१४ रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. महेश शिंदीकर यांनी सांगितले.

साहित्य संमेलनात विविध विषयांवरचे परिसंवाद ऐकता येतात. त्यातून विविध साहित्यिकांचे साहित्यविचार समजतात. विविध विषयांची व्याप्ती समजते. तसेच ज्यांचे लेखन आपण वाचतो अशा व्यक्तींना थेट भेटताही येते त्यामुळे आम्ही आवर्जुन संमेलनाला जातो असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

इंजिनिअरिंगसारख्या कठीण अभ्यासक्रमांचे विद्यार्थीही आपल्या व्यग्र वेळापत्रकातून खास वेळ काढून साहित्याची भूक भागवतात. विद्यार्थी विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन करतात. काही विद्यार्थी स्वत: चांगल्या कविताही करतात. वकृत्व, वादविवाद स्पर्धांचे आयोजन करतात. शहरातील विविध ठिकाणी आयोजित कविसंमेलनात सहभागी होतात. कॉलेजमध्येही अधूनमधून विद्यार्थ्यांच्या कवितांचा कार्यक्रमही केला जातो. असे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. महेश शिंदीकर म्हणाले.

सर्वच विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची आवड असते असे नाही. काही निवडक विद्यार्थी मात्र नियमित कथासंग्रह, काव्यसंग्रह आणि कादंब-यांचे वाचन करतात. त्यातील काही विद्यार्थी स्वत:ही चांगले कवी, लेखक आहेत तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातूनही त्यांचे काम सुरू असते.[६]

---

६. आम्हालाही साहित्यविश्वात रस.... (३ जून २०१४). दै. महाराष्ट्र टाइम्स, पृ. ५.

## २.९ अवांतर वाचनसाहित्य अभ्यासक्रमाचा भाग झाले तरच नवी पिढी वाचेल :

इंटरनेटच्या विश्वात वाचनाचा कल कमी झाल्याची ओरड ऐकु येते. बरेच वाचक आपला वेळ सध्या जास्तीत जास्त टीव्ही, इंटरनेट, व्हॉटस्अप, फेसबुक यावरच जास्त व्यतीत करताना दिसतात. हल्ली शहरातील तरूण पिढी ही बहुतांशी इंग्रजी माध्यमातून शिकलेली असल्यामुळे ते मराठी वाङमय अजिबात वाचत नाहीत. संगणकाला भारतीय तरूणांच्या जीवनात आवश्यकतेपेक्षा अधिक महत्व मिळू लागल्याने तरूणांचा बराच वेळ इंटरनेटवरील संकेतस्थळे पाहण्यात संगणकावर खेळ खेळण्यात व्यतीत होतो. काही तरूण इंग्रजी वाङमयाचे वाचन करताना दिसतात. सुशिक्षित किंवा शिकलेला वर्ग सुसंस्कृत असतोच असे नाही.

ज्या समाजात विविध कला अभिजात वाङमय याचा मोठया प्रमाणात अस्वाद घेतला जातो त्या समाजाला सुसंस्कृत समाज म्हणता येईल. आजचा नागरी तरूणवर्ग हा यादृष्टीने फारसा सुसंस्कृत राहिलेला नाही. ही परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे.

अलिकडच्या काळात आपण ग्रामीण भागातही इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे लोण पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यामुळे खेडेगावातील परिस्थिती काही दशकात शहरी परिस्थितीप्रमाणे होऊन जाणार आहे. यातून शिकलेला असंस्कृत समाज निर्माण होण्याची भिती आहे. तेव्हा ही परिस्थिती बदलून टाकण्याचे विचार शासनकर्ते व विचारवंतांनी करण्याची गरज आहे.

वाचनसंस्कृती वाढवायची असेल तर शाळेपासून सुरूवात करावी लागेल. त्यासाठी शाळेला चांगले ग्रंथालय हवे. एकेका पुस्तकांच्या अनेक प्रती असाव्यात जेणेकरून सर्व मुलांना त्याचा लाभ मिळेल. त्याचप्रमाणे शालेय अभ्यासक्रमात स्वाध्याय वाचन हवेच ज्यात विविध लेखकांच्या कादंब-या असाव्यात. तसेच अवांतर वाचन चांगलं करायला लावणे हाही एक वाचन वाढवण्यावरील उपाय आहे. मात्र हा अभ्यासक्रमाचा भाग झाल्याशिवाय तरूण पिढी वाचणारच नाही असे वाटते.[७]

---

७. रसाळ, सुधीर. (२८ फेब्रुवारी २०१२). अवांतर वाचनसाहित्य अभ्यासक्रमाचा भाग झाला तरच नवी पिढी वाचेल. **Retrieved from http://divyamarathi.bhaskar.com (accessed on 12.07.2014)**

खेडयातील तरूण मुलांच्या रूपाने मराठी वाङमयाला ग्रामीण भागातच वाचकवर्ग लाभत आहे. याचे कारण हा वर्ग प्रामुख्याने मराठी माध्यमातून शिकतो. गेल्या १० ते १५ वर्षात मराठी लेखक म्हणून जे पुढे आले ते प्रामुख्याने ग्रामीण विभागातीलच आहेत. ग्रामीण विभागातच वाङमयीन नियतकालिकांची निर्मिती होऊ लागली आहे. परंतु जसजशा इंग्रजी शाळा ग्रामीण भागात स्थिरावतील तसतशी ही परिस्थितीही पालटत जाईल.

## २.१० उद्याचे वाचक घडविण्यासाठी... अमेरिकेतील प्रयत्न :

दैनिक लोकमत मध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्तानुसार आजकाल मुले वाचतच नाहीत... ही सार्वत्रिक तक्रार ऐकू येते. परंतु खरा प्रश्न आहे तो मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी आपण काय प्रयत्न करतो? काही शाळा, पालक किंवा शिक्षक जाणीवपूर्वक याकरता प्रयत्न करतातही; पण ते पुरेसे नाहीत. महापालिकेच्या शाळेत शिकणारी तसेच ग्रामीण भागातील मुलांपर्यंत अभ्यासक्रमातील पुस्तकांखेरीज इतर पुस्तके किती प्रमाणात पोहोचतात? वाचक म्हणून मुलांचा विकास व्हावा यासाठी काही धोरण आपल्याकडे आहेत का? असल्यास ते योग्य प्रकारे राबविले जाते का? यावर जाणीवपूर्वक विचार केला जातो का याकडे लक्ष दिले गेले पाहिजे.

अमेरिकेत बालवाचक घडविण्याच्या दृष्टीने अनेक उपक्रम राबविले जातात. अक्षरओळख झाल्यापासून मुलं चांगले वाचायला लागेपर्यंतच्या तीन पातळया तिथे कल्पिल्या जातात. पुस्तकाच्या मलपृष्ठावर बहुधा 'फॉर फर्स्ट लेव्हल' किंवा 'फॉर सेकंड लेव्हल' असे नोंदलेले असते. पहिल्या पातळीवरील पुस्तके अर्थातच अधिक रंजक असतात. पक्षी, प्राणी, निसर्ग आणि मुलंमुली यांचे एकत्रित मजेशीर जग त्यात असते. दुस-या पातळीवरील पुस्तकांतून 'फिक्शनल ॲण्ड नॉनफिक्शनल' यांतला फरक अधिक ठळक होतो. कल्पनारम्य पुस्तकांतून पशू-पक्षी-मुले यांचे जग एकत्रित असले तरी आता त्यातून बालमनावर काही मुल्ये ठसविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होताना दिसतो.

सार्वजनिक ग्रंथालयांतील बालवाङमयाचा विभाग खूपच मोठा असतो. दोन ते चार वयोगटातील मुलांसाठीची पुस्तके व्हिडीओ-सीडीसह असतात. नुकतीच अक्षरओळख होऊ

लागलेल्या मुलांपासून किशोरवयीन वाचकांपर्यंत त्यांच्या वयोगटानुसार पुस्तकांचे विभाग असतात. मुलांना शाळांतून दिले जाणारे प्रकल्प तयार करायला ही ग्रंथालये त्यांना खूपच मदत करतात. ग्रंथालयांचा आणखी एक उपक्रम मुलांना वाचनास प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे. उन्हाळयाच्या सुट्टीत हा उपक्रम राबवला जातो. नुकतच वाचायला शिकलेल्या मुलांनी २० पुस्तके वाचली की त्यांचे पालक त्याचा तपशील ग्रंथालयास सादर करतात. मग त्या मुलाला ग्रंथालयातर्फे चषक आणि प्रमाणपत्र मिळते. त्या प्रमाणपत्रावर ग्रंथालयाच्या ग्रंथपालाच्या सहीबरोबरच टेक्सासच्या गव्हर्नरची सही आणि राज्य ग्रंथपालांचीही सही असते. अधिक मोठया मुलांसाठी हा चषक व प्रमाणपत्र मिळवण्यासाठी २० तास वाचनाची अट असते.

**बालवाचकांकडून बालसाहित्यिकाचा गौरव ही तर फारच भन्नाट कल्पना आहे. मुलांनी वर्षभरात प्रसिध्द झालेली जी पुस्तके वाचली असतील त्यांतील आपल्या आवडत्या पुस्तकांना १,२,३ क्रमांकाची मते द्यायची व ती ग्रंथालयात ठेवलेल्या बॉक्समध्ये टाकायची. संपूर्ण टेक्सासमधील शाळांमधून विद्यार्थी हे मतदान करतात. यातील पहिल्या क्रमांकाची मते ज्या पुस्तकाला सर्वाधिक मिळालेली असतील त्या पुस्तकाची त्यावर्षीच्या 'ब्लू बॉनेट' पुरस्कारासाठी निवड होते.**[८] म्हणजे बालवाचकाला लिंबूटिंबू समजले न जाता जबाबदार वाचक मानले जाते. तेथील पुस्तकांची दुकानेही मुलांना वाचनाची गोडी लावण्यात हातभार लावतात.

शाळेच्या ग्रंथालयांसाठी प्रारंभी अमेरिकेत शिक्षण विभागाकडून भरघोस रक्कम दिली जाते. नंतर ग्रंथालय वाढवण्याची जबाबदारी मात्र शाळांची असते. वाचन कसे करायचे याचा वस्तुपाठ मुलांना लहान वयात करून दिला जातो. विद्यार्थ्यांची आकलनक्षमता अजिबात कमी लेखली जात नाही आणि ती अधिकाधिक कशी वाढेल यासाठी प्रयत्न केले जातात. प्रत्येक वर्गासाठी आठवडयातून एकदा पुस्तक बदलून देण्याचा वार असणे एवढयापुरतेच शाळेच्या ग्रंथालयांचे काम सीमीत नाही.

मुलांनी वाचावे त्यांच्यातून एक चोखंदळ वाचक घडावा म्हणून आपण काय प्रयत्न करतो? सधन घरांतून तरी किती मुलांच्या हातावर खाऊ म्हणून पुस्तक दिले जाते? किती मुले मोकळया वेळेत आपले आई-बाबा एकाग्र होऊन एखादे पुस्तक वाचताना बघतात?

आणि पुस्तकांची भूक असलेल्या किती मुलांपर्यंत छान रंगीबेरंगी पुस्तके पोहोचतात? या गोष्टींचा विचार व्हायला हवा.

### २.१०.१ भविष्यातील वाचक, लेखक, साहित्यिक, संपादक घडविण्यासाठी प्रयत्न केले जावेत.

आपल्या मुलांनी चांगले वाचक, लेखक, साहित्यिक, संपादक व्हावे, त्यांनी स्वतंत्र विचार करावा, त्यांची कल्पनाशक्ती बहरावी, त्यांना ज्ञानाचे नवनवे मार्ग कसे शोधावेत ते कळावे, यासाठी आपल्याला विचारपूर्वक काही गोष्टी कराव्या लागतील. उदा. १) मुलांना भाषा व्यवस्थित शिकवायची आहे हे लक्षात घेऊन आणि त्याचवेळी त्यांच्या बौध्दिक व भावनिक गरजा लक्षात घेऊन पुस्तकांची निर्मिती करणे. २) मुलांसाठी तयार झालेली पुस्तके सर्व स्तरांतील मुलांपर्यंत पोहोचवणे. ३) मुलांना वाचायला प्रवृत्त व प्रोत्साहित करणे. ४) मुलांना वाचनाची विशिष्ट दृष्टी देणे.

ही जबाबदारी आपली आहे हे पालकांबरोबरच शाळांची ग्रंथालये आणि मुख्य म्हणजे ग्रामपंचायतींपासूनच्या सर्व ग्रंथालयांनी ओळखणे व ती स्विकारणे महत्वाचे आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे बालवाचकाला लिंबूटिंबू समजून कमी न लेखणे. या व अशा गोष्टींचा गांभीर्याने विचार करायला हवा. परंतु हे अमेरिकेत शक्य आहे आपल्याकडे नाही असे म्हणण्यापैक्षा आपल्या देशात असे प्रयत्न होणे गरजेचे आहे.

---

८. कणेकर, प्रतिभा. (रविवार १४ सप्टेंबर २०१४). उद्याचे वाचक घडविण्यासाठी अमेरिकेतील प्रयत्न. लोकमत. लोकरंग. पृ. २.

## २.११ पुस्तकांशी मैत्री तुटत चालली आहे :

पूर्वी "ज्या घरात नसेल पुस्तकांचे कपाट ते घर सपाट" "ग्रंथासारखे गुरू नाही" अशी पुस्तकांची महती पटवून दिली जायची. पण काळ बदलला आता संगणकीय साक्षरता वाढली पण अक्षर निरक्षरता निर्माण झाली. लोकांनी आता पुस्तकांकडे पाठ फिरविली पुस्तकांऐवजी संगणक, इंटरनेट, व्हॉटस्अप ही संस्कृती वाढली. त्यामुळे वाचकांची पुस्तकाशी मैत्री तुटत चालली आहे. घरातून आता पुस्तकाची कपाटे हद्दपार होत आहेत आणि त्याजागी इंटरनेट घरात शिरत आहे हे विशेष.[९]

शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी आता पाठयपुस्तकही खरेदी करत नाहीत. ते थेट गाईड खरेदी करतात. अवांतर वाचन व ग्रंथ खरेदी या दोन्हीही गोष्टी आता कालबाह्य झाल्या आहेत. ग्रंथालये आहेत, ग्रंथ आहेत पण वाचक उदासीन असेल तर ग्रंथाना सुरक्षित जागा म्हणजे कपाटचं असं चिन्ह दिसून येत आहेत.

महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग करोडो रूपयाचे अनुदान ग्रंथ खरेदीसाठी उपलब्ध करून देते. महाविद्यालये ग्रंथ खरेदीही करतात पण ग्रंथांची घडीच मोडली जात नाही. कादंब-याचं बाड तर आता कुणी हाताळतही नाही. पण करियर घडविण्यासाठी आवश्यक असणारे प्रेरणादायी वाचनसाहित्य मात्र आजही खरेदी केले जाते. स्पर्धा परीक्षेच्या अनुषंगाने देखील सहाय्यक ठरतील अशी पुस्तके वाचण्याकडे लोकांचा कल वाढतोय. त्यामुळे मोठया कादंब-या महाकाव्य वाचन कमी झाले. अब्दुल कलाम यांचे 'अग्नीपंख', विणा गव्हाणकर यांचे 'एक होता कार्व्हर' तसेच सुधा मुर्ती यांची पुस्तक आजही वाचकांना आवडतात वाचली जातात. याशिवाय आरोग्यविषयक सजगता वाढल्याने ऋतुजा दिवेकर यांचे 'लुज युवर वेट बट डोन्टलुज युवर माईन्ड' किंवा शिवा खेरा यांचे करिअर गाईडन्स अशी सकारात्मक उर्जा आणि प्रेरणा देणारी अनेक प्रकारची पुस्तक बाजारात उपलब्ध आहेत. रोबीन शर्मा यांचे 'मेक हू सोल्ड हिज फेरारी' 'अलकेमिस्ट' 'सेव्हन सिक्रेट' ही मनाची शक्ती वाढवणारी पुस्तके लोक खरेदी करतात. अशा पुस्तकांचा वाचकवर्ग वाढला आहे.

---

९. पुस्तकांशी मैत्री तुटतेय.... (२३ एप्रिल २०१४). **Retrieved from In http://marathi.yahoo.com (accessed on 12.07.2014)**

## २.१२ स्पर्धा परीक्षांचे स्वरूप आणि अवांतर वाचनसाहित्य :

स्पर्धा परीक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर मोठा तणाव निर्माण होतो असा प्रचार केला जातो पण असा कोणताही तणाव निर्माण होत असल्याचे आतापर्यंत निदर्शनास आलेले नाही. उलट विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. अशा परीक्षांमुळे विद्यार्थ्याला विविध प्रश्नपध्दतींची ओळख होते. तो स्वयंअध्ययन करू शकतो. प्रश्नांची उत्तर शोधताना तो सारासार विचार करायला शिकतो. अनेक कुल्प्त्यांचा वापर करायला शिकतो. त्याचा व्यवहारात उपयोग करायला शिकतो. त्याचे अवांतर वाचन वाढते. परंतु पुस्तके उघडून अखंड वाचत समाधी लावणारे दिवस गेलेत. हलकंफुलकं वाचन, विनोदी किस्से, नियतकालिके वाचनाकडे कल वाढतोय. कथा-कादंबरीच्या भावविश्वात न वावरता व्यवहारात यश संपादन करून देण्याचा मार्ग दाखविणा-या पुस्तकांचा वाचकवर्ग वाढला आहे. पाठयपुस्तकांतील वाचनापेक्षा अवांतर वाचन असेल तर परीक्षा देताना कोणतीही अडचण येत नाही. स्पर्धा परीक्षा देण्याकरीता अभ्यासाचा पाया भक्कम असणे आणि चालू घडामोडीचे ज्ञान असणे महत्वाचे आहे. असे गुरूकुल बहुउद्देशीय संस्था जळगाव चे संस्थापक सुभाष महाजन यांचे म्हणणे आहे.[१०]

## २.१३ वर्तमानपत्रांव्दारे मुलांचा भाषा विकास :

मुलांना शाळेतील पुस्तकांच्या वाचनाबरोबर अवांतर वाचन देखील खूप आवडत असते. मुलांमध्ये वाचनाचे कौशल्य विकसीत करण्यासाठी अवांतर वाचनाची सवय ही वर्त मानपत्रांच्या वाचनातून विकसीत करणे ही फायदेशीर गोष्ट ठरू शकते.

वर्तमानपत्रातील सांगा पाहू? ओळखा पाहू? जरा डोके चालवा? अशा कोडयांच्या वापराने मुलांचे सामान्यज्ञान वाढते. तर आरोग्य या सदराचा उपयोग शारीरिक शिक्षण आरोग्य आहार यासाठी खुप चांगल्या प्रकारे होतो. दिनविशेष हे सदर वर्षभरातील थोर पुरूषांची जयंती-पुण्यतीथी यासारखे कार्यक्रम साजरे करण्यासाठी खुप उपयोगी पडते. विज्ञान संस्कार थोरांचे बोल याचा देखील चांगला फायदा होतो.

---

१०. स्पर्धा परीक्षा आणि चालू घडामोडी.... (१ जून २०१३). **Retrieved from In http://marathi.yahoo.com (accessed on 12.07.2014)**

शिष्यवृत्तीच्या परीक्षांना बसलेल्या विद्यार्थ्यांना या उपक्रमांचा लाभ चांगल्या प्रकारे होतो. शब्दकोडी सोडवल्याने शब्दसंपत्ती व सामान्यज्ञानात भर पडते. अशा प्रकारे वर्तमानपत्राव्दारे मुलांचा हसतखेळत भाषिक विकास सहज सुलभ साधता येतो.[११]

## २.१४ ई-बुक्स आणि पुस्तके :

इंटरनेटच्या कृपेमुळे बहूतांशी लेखकांचे लिखाण ई-बुक्स स्वरूपात उपलब्ध झालेले आहे. पण खरे तर अशा ई-बुक्सचे वाचन फारसे भावत नाही. **पुस्तक हातात घेऊन वाचन करणे ही महत्वाची गोष्ट आहे.** पुस्तकवाचन हे एक प्रकारचे लेखकाच्या हातात नसलेले आणि वाचकाने केलेले लेखनोत्तर संस्करणच असते. कदाचित यामुळेच वाचनाचा आस्वाद स्वत: वाचल्याशिवाय पूर्ण झाला असे वाटत नाही. एखाद्या पारंपरिक अर्थाने दुर्बोध अथवा कठोर लेखन वाचताना पहिल्यांदा स्वत:च्या ‘कम्फर्ट झोन’ला विस्तारित करावे लागते. त्यामुळेच पुस्तके ही केवळ लेखकाची निर्मिती न राहता त्यात आपल्या भाव-भावनादेखील मिसळल्या जातात. ही व्यामिश्र प्रक्रिया हातात पुस्तके घेऊन वाचताना जास्त परिपूर्ण वाटते.[१२]

आवडीच्या पुस्तकाचे पुर्नवाचन करीत असताना जाणिवा प्रगल्भ झाल्यानंतर पुस्तकाचे मुखपृष्ठ, प्रकाशक, प्रस्तावनेतून हलकेच दिसणारा लेखकाचा चेहरा याचा आस्वाद घेता येतो. पुस्तक वाचन हा स्वत:शीच साजरा केला जाणारा सोहळा असू शकतो. या सर्व कारणांनीच आजही प्रकाशित मुद्रित पुस्तकाचे मोल ई-बुक्स पेक्षाही कितीतरी अधिक वाटते.

---

११. राक्षे, भूषण. वर्तमानपत्रांव्दारे मुलांचा भाषा विकास. **Retrieved from http://pune.thebeehive.org (accessed on 12.07.2014)**

१२. अमेय, ई-बुक्स आणि पुस्तके. (१५ फेब्रुवारी २०१३) **Retrieved from http://www.maayboli.com (accessed on 12.07.2014)**

**ई-बुक्स काळाची गरज आहेत हे मान्य पण त्यांना या हाताळता येण्याजोग्या पुस्तकांची सर नाही.** परंतु एक समस्या आहे की हवी आणि हवी तेवढी मराठी पुस्तके वाचायला मिळत नाहीत. त्याचबरोबर प्रत्येक ग्रंथालयाच्याही काही मर्यादा असतात. अर्थ सहाय्या अभावी ग्रंथालयामध्ये अनेक विषयांवर ग्रंथ संग्रहीत करणे शक्य होत नाही. पुस्तक हाताळणं हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. त्या कागदाचा रंग, पोत, पुस्तकाची बांधणी, त्याचा एक प्रकारचा वास या सगळयाशिवाय वाचन अपूर्ण राहिल्यासारख वाटतं.

**२.१५ लाभले भाग्य आम्हा, वाचतो मराठी :**

भारतातील सर्वात समृध्द भाषा म्हणून मराठीकडं पाहिलं जात. २१ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मातृभाषा दिवस' आणि त्यानंतर येणारा २७ फेब्रुवारी हा 'मराठी राजभाषा दिवस' म्हणून आपण सर्वजण साजरा करतो. या कालावधीला 'मराठी भाषा आठवडा' असंही आपल्याकडे म्हटलं जातं.

वाचनसंस्कृती लोप पावतेय... आजचे तरूण वाचतच नाहीत... अवांतर पुस्तकांसाठी ते ग्रंथालयाचा उंबरठा ओलांडत नाहीत... अशी विविध प्रकारे टिका आजच्या तरूणांवर होते. परंतु **दै. सकाळ च्या सर्वेक्षणातून** असे समोर आले आहे की, आजच्या तरूणाईला अवांतर वाचनाचे प्रचंड आकर्षण आहे. आजच्या जमान्यातही तरूणाईला जुन्या काळातील लेखकांची पुस्तके आवडतात. तसेच काही तरूणांच्या मते संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, विवेकानंद, महात्मा गांधी, वि. दा. सावरकर, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, साने गुरूजी यांच्या पुस्तकांतून त्यांना नवं बळ आणि उर्जा मिळते.

सध्याच्या युगात तरूणाईच्या वेळापत्रकावर नजर टाकली असता असे दिसून येते की, त्यांचे जीवन हे प्रचंड धावपळीचे आहे. सकाळी क्लास नंतर महाविद्यालय, वेगवेगळया परीक्षांचे ओझे त्यात सोशल नेटवर्किंगवर असलेले प्रेम या कारणामुळे नवी पिढी अवांतर वाचनापासून दुर गेली आहे असे दिसून येते.[१३]

---

१३. लाभले भाग्य आम्हा वाचतो मराठी. (१६ फेब्रुवारी २०१४). **Retrieved from http://www.esakal.com (accessed on 12.07.2014)**

## २.१६ वाचन आणि वाचन संस्कृती :

एका सर्वसाधारण माणसाला वाचन काय देतं? खूप काही देतं... आपण मोजमाप करू शकणार नाही एवढं देतं! ज्ञान विज्ञानाच्या जगातही वाचनाचं महत्व आहेच. दररोज होणा-या ज्ञानाच्या स्फोटाला सामोरं जायच असेल तर वाचनाला पर्याय नाही. ही वाचनाची सवय लहान वयात लावून घेण्यात सगळयांचचं हित आहे. ललितवाचनानं हे सहज होऊ शकतं. अनुभवातून आलेल्या शहाणपणाला पर्याय नाही असे म्हणतात आणि ते खरंही आहे. पण एका जीवनात तुम्ही जास्तीत जास्त किती अनुभव घेऊ शकाल? वाचनातून पुढे आलेल्या अनुभवामुळे किमान आपल्या अनुभवाच्या कक्षा रूंदावायला मदत होते. एकेका जीवनाच्या तपश्चर्येच फलित एक ग्रंथ देऊ शकतो. नेहमी पुस्तक तुम्हाला रेडिमेड उत्तर देतं असंही नाही. अनेकदा ते तुम्हाला विचार करायला लावतं तुमच्या काही चुकीच्या पण घट्ट बसलेल्या कल्पनांना सुरूंग लावून तुम्हाला हादरवून टाकतं. तुमच्या जीवनविचारांवर तुम्हालाच पुर्नविचार करायला लावतं तुम्हाला सतत 'जिंवत' ठेवतं. वाचनाचा हा फायदा आयुष्यभर पुरणारा वाटतो.

कोणत्याही समाजाची उंची त्या समाजातल्या शिक्षकांच्या उंचीपेक्षा जास्त असू शकत नाही असं नेहमी म्हटलं जातं. शिक्षकाची वैचारिक-कृतीशील उंची वाढविण्याकरीता वाचन संस्कृती एवढी उत्तम संस्कृती दुसरी कोणती असू शकेल?

चांगले आत्मचरित्र तसेच चिंतनात्मक माहितीपर अनेक पुस्तके, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, भौगोलिक, तत्वज्ञानात्मक अनेक पुस्तके निवडून वाचता येतील. वि.दा. सावरकर, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, डॉ.अब्दुल कलाम, नारायणमुर्ती इत्यादी ज्यांनी कृतीतून आदर्श निर्माण केले अशा राष्ट्रीय पुरूषांची चरित्रे तसेच त्यांचे साहित्य वाचल्यास प्रेरणा आणि विचार दोन्हीही मिळू शकतील. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाच्या गोडीकरीता केवळ उपदेशात्मक बौध्दिक पुस्तके महत्वाची नाहीत तर रंजनात्मक, क्रियात्मक पुस्तके निवडून वाचायला देता येतील.[१४]

---

१४. गायकवाड, नानासाहेब. (२१ एप्रिल २०१३). वाचन संस्कृती. **Retrieved from http://www.palakneeti.org (accessed on 12.07.2014)**

मुख्य म्हणजे मुलांना वाचनाची गोडी लावायला शिक्षकालाही वाचनाची गोडी असायला हवी. शिक्षकाच्या हातात जाता-येता चांगली पुस्तके मुलांच्या नजरेस पडली पाहिजेत. शिकवताना आपल्या वाचनाचे उत्कृष्ट संदर्भ-दाखले देता आले पाहिजेत. वृत्तपत्राशिवाय काही वाचन असतं याचं भानही शिक्षकांना असायला पाहिजे. शिक्षकाने काय वाचावं हे ही ठरविणे महत्वाचे आहे.

## २.१७ विश्व पुस्तकांचे :

पुस्तकांचे विश्व मोठे अजब असते. मन मोहून टाकणारे आणि जीवन बदलून टाकणारे असते. ज्यांचा शाळा-महाविद्यालयातील अभ्यासाशिवाय इतर पुस्तकांशी संपर्क आला नाही त्यांना पुस्तकांच्या या गुणवैशिष्टयांचा परिचय असण्याचे काहीच कारण नाही. खरे सांगायचे तर अशा मंडळींचीच संख्या जगात जास्त दिसते. परंतु पुस्तकांवर प्रेम करणा-या पुस्तकप्रेमींची संख्याही कमी नाही.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ज्ञान, माहिती आणि मनोरंजन माध्यमांमध्ये प्रचंड बदल होत गेले आहेत. या नव्या बदलांनी माणसातील माणूसपण बदलत गेले; पण पुस्तकातील पुस्तकपण अद्याप शाबूत आहे हे सुदैव. सामान्यातल्या सामान्य व्यक्तीला ज्ञानाच्या आयुधांमुळे जगण्याचे बळ लाभते हे वारंवार सिध्द झाले आहे.

स्वातंज्यपूर्वकाळात ब्रिटिशांच्या प्रभावामुळे तथाकथित मराठी सारस्वतावर खूप आधीपासून इंग्रजी ज्ञानविचारांचे अंधानुकरण करणा-या नवमतवादी विचारांचा पगडा बसला आणि आजही तो कायम आहे. याला कारण म्हणजे भारतात एकीकडे निरक्षर आणि नवसाक्षर यांचे प्रश्न आहेत तर दुसरीकडे इंग्रजी शिकलेल्या लोकांची संख्याही वाढत आहे. ग्रामीण भागांमध्ये इंग्रजी शाळांचे प्रमाण प्रचंड वेगाने वाढताना दिसत आहे.

अर्थात त्याला अधूनमधून हादरे बसत असतात परंतु त्याचा पाया उखडणे शक्य झाले नाही आणि पुढेही होणार नाही. कारण आजही मराठीत निर्माण होणा-या बहुतांश साहित्याची निर्मिती आणि प्रसार याची व्याप्ती शहरी, निमशहरी भागातील मध्यमवर्गीय वाचकांपुरतीच आहे. या वाङमयात रंजकतेला प्राधान्य असल्याने देशी लोकांच्या प्रबोधनाचा विचारही केलेला दिसत नाही. परिणामी मोठया-मोठया लेखकांच्या पुस्तकांची एक आवृत्ती म्हणजे अकराशे प्रती संपायला महाराष्ट्रात वर्षानुवर्षे वाट पाहावी लागते. इतर देशात

पुस्तक लेखन करणा-या मंडळींना कोठयावधी रूपये मिळवून देणा-या या व्यवसायाला आपल्या महाराष्ट्रात मात्र आजूनही प्रकाशकाधीनच राहावे लागते.

**२.१७.१ पुस्तकांच्या जवळ जाता आले पाहिजे...**

आपल्या आयुष्यावर जवळच्या आत्पमित्रांचा जसा प्रभाव पडतो तसा पुस्तकांचाही पडतो. म्हणून हेन्री शॉटियरचे 'पेपिलॉन' किंवा गव्हेरा यांचे 'मोटर सायकल डायरीज्' वाचल्यावर मनात आत्मविश्वासाचा झरा उफाळून येतो. 'तुकारामांची गाथा' किंवा तुकडोजी महाराजांची 'ग्रामगीता' वाचल्यावर जगण्यातील अध्यात्म कळते. गो.नी.दांडेकर किंवा अमृतलाल वेगड यांच्या 'नर्मदा परिक्रमे'च्या वर्णनातून किंवा अत्रे यांच्या १९१५ साली प्रसिध्द झालेल्या 'गावगाडा' मधून ग्रामीण भारत दिसतो. वॉरियल एल्विन, गोदुताई परूळेकर, अनुताई वाघ यांच्या आदिवासीविषयक पुस्तकांमधून एक वेगळे विश्व समजते. पावलो कोएलो यांच्या 'अल्केमिस्ट'मुळे जगाचा शोध स्वत:मध्ये सुरू होतो आणि स्वत:मध्येच संपतो याचा साक्षात्कार होतो. तर रजनीश कबीर आणि जे.कृष्णमुर्ती अध्यात्माचा अर्थ सांगतात. अनेकांच्या आत्मचरित्राच्या वाचनाने प्रामाणिक आणि सरळमार्गी जगण्याचा अर्थ उमगतो.

इतक्या वर्षानंतर आजच्या ग्रंथनिर्मितीकडे पाहिल्यावर फुले यांचे विचार आजही समर्पक वाटतात. पण त्यानुसार सर्वसामान्य लोकांसाठी लोकभाषेत पुस्तके येत नाहीत, आली तर ती लोकांपर्यंत पोहोचत नाहीत ही एक मोठी खंत आहे. पुस्तक म्हणजे निर्जीव वस्तू नाही तर पुस्तक हे कोणतीही अपेक्षा न ठेवता आपले अंतरंग मोकळे करणारे, मनोरंजन करणारे, मार्ग दाखवणारे, कधी गुरू तर कधी वडीलकीच्या नात्याने सल्ले देणारे. पुस्तकांनी एवढा फायदा होऊ शकतो पण त्यासाठी आपल्याला पुस्तकांच्याजवळ जाता आले पाहिजे... त्यावेळी त्याच्या पानापानातून ज्ञान-रंजनाची अखंड सळसळ ऐकू येईल.

**२.१७.२ प्रकाशकांची उदासिनता :**

वर्षानुवर्षे स्वत:ला मराठी भाषा, संस्कृतीचे मक्तेदार म्हणवणारे मोठे प्रकाशक आणि त्यांचा कारभार हा साराच गंभीर मामला आहे. लेखकाच्या लिखाणाचे संपादन-संशोधन करण्याच्या फंदात पडण्यापेक्षा आर्थिक फायद्याचा विचार करणे हे पुढारलेल्या प्रकाशकांच्या

यशाचे गमक असते. त्यामुळे प्रकाशकाच्या 'हिशोबा'मध्ये न बसणा-या विचारांची पुस्तके छपाईच्या यादीतून आपोआप गाळली जातात. त्यातही छपाईची यादी मोठी असेल तर ज्येष्ठ आणि प्रसिध्द मंडळीच्या तुलनेत नवोदितांच्या कलाकृतीवर फुली मारली जाते, भले ते कितीही चांगले पुस्तक असो.

याचा परिणाम असा होतो की, प्रतिभावान कवी किंवा लेखक अशा प्रकाशकांचा नाद सोडतो. परिणामी समाज एका दर्जेदार वाङ्मयीन निर्मितीपासून दूर राहतो. समजा त्या लेखक किंवा कवीकडे आर्थिक पाठबळ असेल तर तो स्वत:च पुस्तक छपाईच्या क्षेत्रात उडी घेतो. येथेही त्याची उडी चुकते कारण छपाईच्या क्षेत्रातील कागदांपासून ते छपाईपर्यंतच्या कामात खर्चाचे आकडे नवख्यांसाठी वाढणारे असतात. त्याचा त्याला चांगलाच 'अनुभव' येतो आणि त्यानंतरची खरी कसोटी असते पुस्तक वितरणाची. या क्षेत्रात हा नवखा साहित्यीक मार खातो. अगदी पदरमोड करून प्रकाशित केलेली साहित्यकृती वितरण अवस्थेअभावी वाचकांपर्यंत पोहोचत नाही. पुस्तकांचे दुकानदार पुस्तकाला निम्म्या दरातही स्वीकारायला तयार नसतात. परिणामी स्वखर्चाने पुस्तकाच्या निर्मितीसाठी केलेला सगळा खर्च आणि खटाटोप साहित्यीकाच्या डोक्यावर पडतो. त्यामुळे कितीही प्रतिभावान वा धनवान लेखक पुन्हा पुस्तक प्रकाशनाच्या भानगडीत पडत नाही. परिणामी वाचक एका चांगल्या लेखकापासून दुरावतात.[१५]

थोडक्यात पुस्तक प्रकाशन आणि वितरणाच्या साखळीवर हुकूमत असणा-या मुठभर मंडळीनी मराठी सारस्वताची दशा आणि दिशा काय असावी असे ठरवल्याने मराठी वाङमयाची फारशी प्रगती झालेली नाही.

१५. म्हात्रे, महेश. (२२ एप्रिल २०१२). विश्व पुस्तकांचे. **Retrieved from http://maheshmhatre.blogspot.in (accessed on 12.07.2014)**

## २.१८ पुस्तके आणि विद्यार्थी यांचा संबंध :

विद्यार्थी आणि पुस्तके किंवा ग्रंथ म्हणजे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. एकाच्या अस्तित्वाशिवाय दुस-याचे अस्तित्व अपूर्ण आहे. अगदी प्राचीन काळातील ऋषीमुनींनी आपले ज्ञान ताडपत्रावर, भुर्जपत्रावर, धातूच्या पत्र्यावर, शिळेवर अंकित करू ठेवलेले दिसते. उद्देश हाच की ते ज्ञान किंवा कला पुढील पिढीसाठी कायम राहावे म्हणजे पर्यायाने पुढील पिढीने ते वाचावे.

मानवाच्या जीवनात कागद आला. त्याने मानवी जीवनात आणि शिक्षणाच्या प्रांतात क्रांती केली. त्यामुळे ज्ञान संग्रहीत करून शिक्षण देणा-यांसाठी आणि ते प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत सोयीचे झाले आहे. विविध शाखांचे शिक्षण ग्रंथांच्या माध्यमातून सामावून ठेवलेले दिसते. विद्यार्थ्यांना विविध शाखांचा अभ्यास गुरूंच्या मदतीने पूर्ण करावा लागतो. ग्रंथ हे देखील विद्यार्थ्यांसाठी गुरूस्थानी आहेत. म्हणून ग्रंथाबद्दलची आवड ज्याच्या ठिकाणी असेल आणि ज्याने विविध विषयावरील ग्रंथ किंवा पुस्तके वाचली असतील तर तो ख-या अर्थाने श्रीमंत मनुष्य म्हणावा लागेल. कारण ग्रंथाच्या अध्ययनातून त्याने जे ज्ञान, शिक्षण, संस्कार प्राप्त केलेले असते ते दिर्घकाळ टिकाणारे असते.

विद्याधन प्राप्त करावयाचे असेल तर ग्रंथ किंवा पुस्तकांना अनन्यभावे शरण जाऊन त्यामध्ये सामावलेले ज्ञान प्राप्त करण्याची साधना करावी लागते. ही साधना म्हणजेच शिक्षण होय. ग्रंथ विद्यार्थ्यांच्या मनातील अज्ञानाचा अधंकार दूर करून त्या ठिकाणी ज्ञानाचा प्रकाश पसरवतात. त्याचे अंतकरण ज्ञानाने उजळून निघते. चांगले-वाईट कळण्याची क्षमता त्याच्या ठिकाणी निर्माण होते. म्हणून दैनंदिन गरजा जेवढया महत्वाच्या आहेत तेवढेच पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांसाठी मोलाचे आहे.[१६]

---

१६. म्हात्रे, महेश. (२२ एप्रिल २०१२). विश्व पुस्तकांचे. **Retrieved from http://maheshmhatre.blogspot.in (accessed on 12.07.2014)**

## २.१९ वाचन एक फायदेशीर छंद :

माणसाला काही ना काही तरी छंद असतोच. या छंदाविषयी बोलताना संतकवी सांगतात की, 'जसा धरी छंद जाई तुटोनिया भवबंध' माणूस आपल्या आवडत्या छंदात बुडाला की त्याला भोवतालच्या जगाची जाणीवही राहत नाही. वाचन हा सुध्दा असाच एक छंद आहे. वाचनाचा छंद असलेला माणूस हा चिंतनशील बनतो.

ज्याला वाचनाची आवड आहे त्याला कुठेही आणि कोणत्याही वेळी कंटाळा येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कितीही लांबचा प्रवास असो हातातील पुस्तक त्या प्रवासाचा कंटाळा आणत नाही. एकांतवासही वाचनाच्या छंदामुळे सुखावह होतो. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, जयप्रकाश नारायण अशा अनेक थोर व्यक्तींना आपल्या जीवनातील बराच काळ तुरूंगात काढावा लागला. तेथे 'वाचन' या छंदाने त्यांना उत्तम साथ दिली.

वाचन या छंदाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे या छंदामुळे आपण विविधांगी ज्ञानसमृध्द होऊ शकतो. वाचनाचा छंद असणा-याला कोणत्याही क्षेत्रातील ज्ञान असाध्य नाही. या छंदामुळे वाचनवेडया व्यक्तीचे व्यक्तिमत्व समृध्द होत असते. म्हणजे ज्ञान आणि मनोंरजन या दोन्हीही गोष्टी या छंदातून साध्य होतात.

वाचनाच्या छंदातून आपण काळाची बंधने तोडू शकतो. विसाव्या शतकातून सहजगत्या बाराव्या-तेराव्या शतकात जाऊ शकतो किंवा भविष्यकाळातही फेरफटका मारू शकतो. वाचनाच्या छंदामुळे सारे जग जवळ येते. भेदाभेदाच्या भिंती गळून पडतात. मग भारतातील 'शाकुंतल' जर्मनीतही गोडीने वाचले जाते व शेक्सपियरची नाटके भारतीय रसिकालाही खुलवतात.

### २.१९.१ पुस्तक वाचनातून सुसंस्कार :

चांगल्या पुस्तकांच्या वाचनातून सुसंस्कार घडवून येऊन वाचकांच्या विचारांची बैठक अधिक प्रगल्भ होते. चांगल्या पुस्तकांच्या वाचनाने व्यक्ती, समाज व पर्यायाने राष्ट्राची उन्नत्ती होत असते. आजची समाजाची स्थिती अत्यंत खालावलेली आहे. आपल्याला सर्वत्र उत्तान, उच्छृंखल आणि विकारी अशा पुस्तकांची व नियतकालिकांची गर्दी पाहावयास

मिळते. त्यांच्या वाचनाने कुविचारांचा प्रसार होऊन त्याव्दारे मते व शरीरे पोखरली जात आहेत. त्यासाठी चांगल्या पुस्तकांचे सातत्याने वाचन होईल याकडे लक्ष दिले गेले पाहिजे.

व्यक्तीच्या जीवनात संस्कार करून विचारांना परिपक्वता देणे, जीवननिष्ठा अधिकच प्रगल्भ करणे या कामी वाचन अत्यंत प्रभावीपणे भूमिका बजावताना आढळते. पुस्तके लहानांना नवीन माहिती व ज्ञान देतात. तरूणांना योग्य ते मार्गदर्शन करतात व वृध्दांना दिलासा देतात. पुस्तके म्हणजे आत्मिक आनंद देणारा खजिनाच आहे.

एखाद्या ग्रंथातील चांगले विचार एका व्यक्तीच्या जीवनालाच नव्हे तर अनेक पिढयांना शतकानुशतके उपयुक्त ठरतात. उत्तम ग्रंथांचे वाचन हे सुसंस्कृत समाजाचे एक प्रमुख लक्षण मानले जाते. ग्रंथ वाचनामुळेच अफाट ज्ञानाचे भव्य दालन खुले होते. अनेक विद्या, शास्त्रे, कला, साहित्य इत्यादी गोष्टी ग्रंथामुळेच जगभर पसरल्या आहेत. शिक्षणाने माणुस सुशिक्षित बनतो. संभाषणाने माणुस हजरजबाबी बनतो. पण माणसाला पुर्णत्व मात्र वाचनानेच प्राप्त होते हे अनेक उदाहरणावरून सिध्द झाले आहे.[१७]

---

**१७. पिसे, अजय. (२००९-१०). सिंहगड व्यवस्थापन महाविद्यालय लोणावळा येथील विद्यार्थ्यांच्या वाचनसवयीचा अभ्यास. एम. फिल. संशोधन प्रकल्प. पुणे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.**

**२.२० अवांतर वाचनसाहित्याचा प्रसार होण्यासाठी राबविले जाणारे उपक्रम :**

**२.२०.१. कपडेखरेदीवर पुस्तकांची भेट :**

नावीन्यपूर्ण कल्पना राबविण्यांची कल्पकता ही पुणेकरांची खास ओळख आहे. **गलानी फॅशन्सने** फडतरे चौकातील शोरूमच्या उद्‌घाटनानिमित्त **दिनकर शिलेदार** यांचा 'तृणांकुर' हा कवितासंग्रह आणि 'दुर्वांकुर' हा कथासंग्रह ग्राहकांना भेट देण्याची योजना आखली होती. शिलेदार यांच्या या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन प्रकाशन सोमवारी ६ ऑक्टोबर २०१४ रोजी एस.एम.जोशी सभागृह येथे सायंकाळी सहा वाजता झाले. जेष्ठ समीक्षक डॉ.द.भि.कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले होते. तसेच जेष्ठ कथाकार भारत ससाणे आणि बांधकाम व्यावसायिक डी.एस.कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.[१८]

**२.२०.२ आनंदाचा व्यापार !**

आजकाल पुस्तकाची दुकाने पूर्वीसारखी कमी जागेत नसतात. पुस्तके चाळणे बघणे हा एक अनुभव असतो. त्याला व्यावसायिक बाजू आहे हे खरे पण लोकांच्या रिकाम्या वेळेचा फायदा घेतला नाही तर व्यावसायिक कसले. ऑक्सफर्ड बुकस्टोर, क्रॉसवर्ड स्टोरी, स्टारमार्क अशा अनेक खास ठिकाणांनी पूर्व भारतात वाचनानुभव अभिरूचीसंपन्न व आरामदायी केले आहे. वाचलेल्या पुस्तकांवर पांडित्यपूर्ण पध्दतीने चर्चा करण्याची फॅशन पहिल्यांदा **कॅफे कॉफी डे** ने आणली. एक कप कॉफीच्या बदल्यात खरे तर आपण खूप वेळ जागा अडवून बसतो पण ते इथे माफ आहे. नेहमीच्या धकाधकीच्या जीवनात जरा काही वेगळे केल्याचा आनंद यात मिळतो.[१९]

---

१८. कपडेखरेदीवर पुस्तकांची भेट. (शनिवार, ४ आक्टोबर २०१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ३.

१९. आनंदाचा व्यापार. (शनिवार, ४ आक्टोबर २०१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

### २.२०.३ वाचनानंदांसाठी बुक कॅफे :

बुक स्टोअरमध्ये लाउंजसारखा आनंद मिळावा यासाठी आता **'सिटी ऑफ जॉय'** मानल्या जाणा-या कोलकत्यात बुक कॅफे सुरू झाले आहे. तिथे आरामात बसून कॉफी पित पुस्तके वाचण्याचा आनंद मिळणार आहे. **'स्टोरी'** असे या बुक कॅफेचे नाव आहे. तिथे ग्राफिक कादंब-या, कॉमिक बुक्स उपलब्ध आहेत. पेंग्विन बुक्सचा वेगळा विभाग आहे. तसेच बोर्ड गेम्सही आहेत. लिहिण्यासाठी पॅडस् पेन्सिल ठेवलेल्या आहेत त्यामुळे तुम्ही तुम्हाला जे वाटते ते लिहून ठेवू शकता. पुस्तकप्रेमीसाठी ही मेजवानी असून पेंग्विनची तीन हजार पुस्तके तिथे आहेत. येथे येऊन लोकांनी कथा वाचाव्यात, लिहाव्यात, सांगाव्यात, चित्रात मांडाव्यात अशी अपेक्षा आहे असे या कॅफेचे प्रमुख **सिध्दार्थ पानसरी** यांचे मत आहे. 'पेंग्विन' या ठिकाणी प्रकाशित न झालेली पुस्तकेही ठेवणार आहे. काही दुर्मिळ पुस्तकेही ठेवणार आहेत. हा १५ हजार स्क्वेअर फुटांचा पुस्तकांचा मॉल असून तेथे अनेक कोपरे असे ठेवले आहेत जिथे जाऊन तुम्ही वाचू शकता, चित्र काढू शकता, कथाकथन करू शकता, चित्रपटाचे लॉंच करू शकता कोलकत्तावासीयांसाठी हा वेगळा अनुभव आहे. कोलकत्त्यात दरवर्षी पुस्तकांचे मोठे प्रदर्शनही भरते. दिल्लीतही पुस्तक प्रदर्शन भरते पण प्रत्येक वेळचा अनुभव वेगळा असतो.

काहींना पुस्तके परवडत नाहीत त्यांना पुण्यात अगदी रस्त्यावर सहजगत्या अतिशय दुर्मिळ पुस्तके नाममात्र किमतीत मिळून जातात. काही ठिकाणी तर पुस्तके भाडयाने मिळतात. पण ती बहूधा अभ्यासाची असतात. **अक्षरधारा** या पुण्याच्या बुक गॅलरीमध्ये झाडाखाली पुस्तक प्रकाशन व गप्पांचा कार्यक्रम करण्याची सोय आहे. यातून काही उद्देश साध्य होतात ते म्हणजे लेखक-वाचकांच्या भेटी होतात. नवीन कल्पनांवर चर्चा होते. काहींना निवांतपणे पुस्तके वाचता येतात.

चाय बार किंवा बुक कॅफे यांचे भारतीय महानगरांमध्ये पेव फुटले आहे. पण कोलकता ही भारताची सांस्कृतिक राजधानी मानली जाते त्यामुळे तेथील बुक कॅफेचा अनुभवही वाचकांना अभिरूची व रूची अशा दोन्ही अंगांनी संपन्न करणारा आहे.

**जगातील बुक कॅफे :**

१. द ग्राउंड्स ॲलेक्सांड्रिया, ऑस्ट्रेलिया

२. द व्हिंटेज एंपोरियम, लंडन

३. हॉटेल सेंट्रल अँड कॅफे, कोपनहेगन

४. बालझॅक टोरांटो

५. लोसिव्हा थी, पॅरिस

६. ला डिस्ट्रिब्युटाइस, मॉँट्रियल

७. लिटल नॅप कॉफी स्टँड, टोकियो

८. स्निककार बॅकेन ७ स्टॉकहोम

९. कॅफे कॉच्युम, पॅरिस

१०. लीली व्हॅनिली, लंडन[२०]

**२.२१ वाचन विद्यालय :**

शालेय शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये 'ग्रंथालय वाचन' असा विषय अनिवार्यच असायला हवा. वाचावे कसे आणि काय वाचावे हे शिकवावेच लागते. पाश्चिमात्य देशांत ग्रंथालयाचा विषय अभ्यासक्रमात सामावूनच घेतलेला असतो. तसा भाग आपल्याकडे केव्हा येईल कोण जाणे!

किमानपक्षी 'संगीत विद्यालय' 'क्रिकेट कोचिंग' प्रमाणे एक तरी 'वाचन विद्यालय' निर्माण व्हायला हवे. असे विद्यालय मुलांना वाचन कसे करावे का करावे ते तरी शिकवील. आपल्या देशातील ग्रंथपालांनी असा प्रयोग करायला काय हरकत आहे.[२१]

---

२०. वाचनानंदांसाठी बुक कॅफे. (शनिवार, ४ आक्टोबर २०१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

२१. चिपळुणकर, विष्णुशास्त्री. (डिसेंबर २००४ ते फेब्रुवारी २००५). वाचन विद्यालय : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९.

## २.२२ शालेय शिक्षणात ग्रंथालयाचा वापर :

शालेय शिक्षणाच्या गुणवत्तावाढीमध्ये शालेय ग्रंथालय फार मोठे योगदान देऊ शकते. ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या साहित्यांचा अधिकाधिक वापर करण्यास शिक्षक आणि विद्यार्थी यांना प्रवृत्त करणे आणि त्यांना आवश्यक त्या ग्रंथालय सेवा उपलब्ध करून देणे हे शालेय ग्रंथालयाचे उद्दिष्ट असते. शालेय शिक्षणात शालेय ग्रंथालयाचा अधिकाधिक वापर होणे ही आजची शैक्षणिक गरज आहे. केवळ पाठयपुस्तकांतून दिल्या जाणा-या शिक्षणातून माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टये साध्य होऊ शकत नाहीत. त्या भागविण्याचे कार्य शालेय ग्रंथालय विविध सेवांच्या आणि उपक्रमांच्या माध्यमातून पार पाडू शकतात. ग्रंथालयाने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावून त्यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून दिले आणि त्याचा वापर करण्याचे शिक्षण दिले तर विद्यार्थ्यांमध्ये स्वाभाविकच ज्ञानार्जनाची आवड निर्माण होते. म्हणून आजच्या शालेय शिक्षणात विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर करण्याची संधी प्राप्त करून देऊन त्यांची ज्ञानार्जनाची, जिज्ञासापूर्तीची नैसर्गिक भुक भागविण्याचे कार्य शालेय ग्रंथालयाने केले पाहिजे ग्रंथालयाच्या या कार्याचे यश विद्यार्थी ग्रंथालय साहित्याचा वापर किती व कसा करतात यावर अवलंबून असते. म्हणूनच विद्यार्थ्या ंना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देऊन त्याचा वापर करण्याचे शिक्षण ग्रंथालयाने विद्यार्थ्यांना द्यायला हवे. ग्रंथालयीन साधनांचा विद्यार्थ्यांना अधिकाधिक वापर करता यावा म्हणून ग्रंथालयाने विविध सेवांचे आणि उपक्रमांचे आयोजन करावयास हवे.

ग्रंथालयातील साहित्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून देऊन त्याचा दैनदिंन अभ्यासासाठी वापर कसा करावा याचे शिक्षण ग्रंथपालाने विद्यार्थ्यांना द्यावे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना त्यांचे छंद, आवडी जोपासण्यासाठी, अवांतर वाचनासाठी ग्रंथालयाचा वापर कसा करावा याचीही माहिती त्यांना द्यावी. ग्रंथालयाचा वापर करण्याचे शिक्षण ग्रंथपालाने विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे दिल्यास विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर निश्चितच अधिक करतात. आज आपल्याकडे शालेय विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या वापराचे तसेच ग्रंथालयाची सवय लावण्याचे शिक्षण दिले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर करण्याची सवय लावणे किती महत्वाचे आहे हे प्रसिध्द शिक्षणतज्ञ डॉ. ग.श्री.खैर यांनी आपल्या 'ग्रंथालय सवय' या लेखात सांगितले आहे.

विद्यार्थ्यांना पाठयपुस्तकांव्यतिरिक्त काही अवांतर वाचन करण्याच्या हेतूने शिक्षण खाते जी काही पुस्तके मंजूर करते ती शालेय ग्रंथालयाने विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावीत अशी शासनाची अपेक्षा असते. विविध पुस्तकांच्या वाचनासाठी वर्ग शिक्षकांनी तसेच विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची सवय लागते. शैक्षणिकदृष्टया ही अतिशय उपयुक्त योजना आहे. ती ग्रंथालयाने व्यवस्थित राबविली पाहिजे. [२२]

## २.२३ ग्रंथवाचन : एक विशेष उपदेश :

'मन बिघडणे हा कादंब-या वाचनापासून होणारा एक अनर्थ आहे. दुसरा अनर्थ मनाचे दौर्बल्य.' कादंब-याच वाचनाची ज्यास एकदा चटक लागते त्यास मग दुसरे काहीच वाचावेसे वाटत नाही. कादंब-या भराभर वाचावयाच्या त्यात समजण्यासही काही कठीण नसते. यास्तव विद्या काय ती ही असे वाचणारास वाटू लागून त्याहून वरचढ जे शास्त्रीय वगैरे ग्रंथ आहेत त्यांचा त्यास त्रासच होऊ लागतो. त्यात शिकणाराने आपली मति शिरकवावी लागते कारण ते कठीण व गहन विषय असतात पण ते यांच्याने होत नाही. अशी एकदा सवय पडून गेली म्हणजे मग ती कधीही मोडता येत नाही. याप्रमाणे वाजवीपेक्षा जास्त असा हा कादंब-यांचा नाद लागला असता तो मनास अपाय करतो. ते अगदी नि:सत्व होऊन कोणतेही श्रमाचे काम त्यास झेपेनासे होते. [२३]

---

२२. हेडावू, मुरलीधर. (३ जून २००९). शालेय शिक्षणात ग्रंथालयाचा वापर. **Retrieved from http://www.loksatta.com (accessed on 12.07.2014)**

२३. संपादकीय. (२००५). ग्रंथवाचन एक विशेष उपदेश : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. **Retrieved from http://www.ycmou.com** मार्च-एप्रिल-मे पृ. ४.

**२.२४ महाविद्यालयातील मराठी :**

आजची पिढी ऐकणारी आहे, पाहणारी आहे, पण वाचणारी नाही. त्यामुळे आधीच इंग्रजी माध्यमातील शिक्षण आणि पाश्चमात्य संस्कृतीचा प्रभाव यामुळे मराठी भाषेची सरमिसळ ही ओघाने होतेच. हिंदी आणि इंग्रजी मिश्रित मराठी महाविद्यालयीन विश्वात बोलले जाते. स्वच्छ आणि अस्खलित बोलणारा अपवादानेच आढळतो. पण मराठमोळे सण मोठया उत्साहात साजरे केले जातात. पण एकुणच आजुबाजूचा परिसर आणि शिकण्याचे ऐकण्याचे साधन बहूतांशी अमराठी असल्याने मराठीच बोलण्याचा आग्रह अजूनही महाविद्यालयात होताना दिसत नाही. वाचन संस्कृतीही तितकीशी खोलवर रूजलेली नाही. **अभ्यासाला नेमलेली पुस्तके आणि संदर्भाची पुस्तके सोडून अवांतर वाचणा-या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे.**

संगणकाची स्क्रिन एका क्लिकसरशी माहितीचे विश्व साकारते. म्हणून वाचनालयात बसून तासन्तास विविध पुस्तके संदर्भासाठी चाळण्यासही विद्यार्थी तयार नसतात. त्यामुळे चांगली भाषा कानावरही पडत नाही आणि वाचनातही येत नाही. म्हणूनच भाषेची सरमिसळ क्रमप्राप्त आहे. सरमिसळ मराठी भाषा उद्देशपूर्वक बोलली जात नाही. शिकण्याचे माध्यम इंग्रजी असल्याने ते शब्द आपल्या नकळत लक्षात राहतात आणि ओठावर येतात. यात मराठीची मोडतोड करण्याचा अजिबात उद्देश नसतो. असे बोलण्यात गैर काहीच नाही पण आपण बोलणा-या इंग्रजी शब्दांचे मराठी शब्द माहित असणे आवश्यक आहे. या मताचा एक तरूणवर्ग महाविद्यालयात आहे. पण अगदीच शुध्द आणि आवर्जुन मराठी बोलायला जमणारचं नाही आणि ते आजच्या जगात शक्यही नाही.

वर्षानुवर्षे मराठीच्या अभ्यासक्रमांचे एकच स्वरूप आहे. कालानुरूप त्यात बदल केला तर विद्यार्थ्यांची मराठी भाषा सुधारण्यास नक्कीच मदत होईल. भाषिक कौशल्य वाढीस लागण्यासाठी अनुरूप अभ्यासक्रम तसेच विशिष्ट पध्दतीत लिहिण्याचे तंत्र अभ्यासक्रमात समाविष्ट करावे अशी मागणी काही प्राध्यापकांनी विद्यापीठाकडे केली होती. मात्र त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

वाङमय मंडळाला मात्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळतो. केवळ मराठी विषय घेतलेलेच नव्हे तर इतर विषयांचे विद्यार्थीही या मंडळाशी संलग्न

असतात. इंग्रजी वातावरणात स्वत:ला व्यक्त करण्याचे व्यासपीठ म्हणजे मराठी वाङ्मय मंडळ अशी विद्यार्थ्यांची मानसिकता आहे.[२४]

अनेकांच्या मते अवांतर वाचनाचा अर्थ म्हणजे एखाद्या पुस्तकाचे मनोरंजनासाठी किंवा वेळ घालविण्यासाठी वाचन करणे एवढाच असतो. कारण कालांतराने 'अमुक एक पुस्तक फार छान होतं' एवढाच त्या पुस्तकाविषयी तपशिल लक्षात राहतो.

परंतु भविष्यात आपल्या मुलांनी चांगले वाचक, लेखक, साहित्यिक, संपादक व्हावे, त्यांनी स्वतंत्र विचार करावा, त्यांची कल्पनाशक्ती बहरावी, त्यांना ज्ञानाचे नवनवे मार्ग कसे शोधावेत ते कळावे, यासाठी आपल्याला विचारपूर्वक काही गोष्टी कराव्या लागतील. उदा. १) मुलांना भाषा व्यवस्थित शिकवायची आहे हे लक्षात घेऊन आणि त्याचवेळी त्यांच्या बौध्दिक व भावनिक गरजा लक्षात घेऊन पुस्तकांची निर्मिती केली पाहिजे. २) मुलांसाठी तयार झालेली पुस्तके सर्व स्तरांतील मुलांपर्यंत पोहोचविली पाहिजेत. ३) मुलांना वाचायला प्रवृत्त व प्रोत्साहित केले पाहिजे. ४) मुलांना वाचनाची विशिष्ट दृष्टी दिली पाहिजे. ५) मुलांना ग्रंथालयांकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ही जबाबदारी आपली आहे हे पालकांबरोबरच शाळां-महाविद्यालयांच्या ग्रंथालयांनी ओळखणे व ती स्विकारणे महत्वाचे आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अशा गोष्टींचा गांभीर्याने विचार करायला हवा.

परदेशातील तसेच भारतातील अनेक ग्रंथालयात नियमित येणा-या वाचकांना वेगवेगळे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. त्यामुळे वाचकांचाही ग्रंथालयात जाण्याचा कल वाढतो. वाचकांना वाचनालयात येण्यास भाग पाडण्यासाठी अनेक ग्रंथालयात वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. या गोष्टींचा विचार करून शाळां-महाविद्यालयांनीही विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयात येण्यास प्रवृत्त केले पाहिजे.

---

२४. सावंत, ऋतुजा. (२८ एप्रिल २०१०). महाविद्यालयातील मराठी. **Retrieved from http://sakalmaayboli.blogspot.in (accessed on 12.07.2014)**

**संदर्भ सूची :**


१. मीराताई,(११ सप्टेंबर २०१३). विस्मरणशक्ती. Retrieved from http://www.misalpav.com (accessed on 13.07.2014)

२. देशपांडे, ए. व्ही., (२००९). ग्रंथालयाचा विकास आणि त्यांचे समाजातील कार्य. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.७.

३. देशपांडे, ए. व्ही., (२००९). ग्रंथालयाचे विविध प्रकार व त्यांची कार्ये. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. ३९,६३.

४. सावे, वसंत. (२००९). शालेय ग्रंथालये. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९,४.

५. कुंभार, राजेंद्र. (२००९). वाचनसाहित्य संग्रहाचा विकास. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १४.

६. आम्हालाही साहित्यविश्वात रस.... (३ जून २०१४). दै. महाराष्ट्र टाइम्स, पृ. ५.

७. रसाळ, सुधीर. (२८ फेब्रुवारी २०१२). अवांतर वाचनसाहित्य अभ्यासक्रमाचा भाग झाला तरच नवी पिढी वाचेल. Retrieved from http://divyamarathi.bhaskar.com (accessed on 12.07.2014)

८. कणेकर, प्रतिभा. (रविवार १४ सप्टेंबर २०१४). उद्याचे वाचक घडविण्यासाठी अमेरिकेतील प्रयत्न. लोकमत. लोकरंग. पृ. २.

९. पुस्तकांशी मैत्री तुटतेय.... (२३ एप्रिल २०१४). Retrieved from In http://marathi.yahoo.com (accessed on 12.07.2014)

१०. स्पर्धा परीक्षा आणि चालू घडामोडी.... (१ जून २०१३). Retrieved from In http://marathi.yahoo.com (accessed on 12.07.2014)

११. राक्षे, भूषण. वर्तमानपत्रांव्दारे मुलांचा भाषा विकास. Retrieved from http://pune.thebeehive.org (accessed on 12.07.2014)

१२. अमेय, ई-बुक्स आणि पुस्तके. (१५ फेब्रुवारी २०१३) Retrieved from http://www.maayboli.com (accessed on 12.07.2014)

१३. लाभले भाग्य आम्हा वाचतो मराठी. (१६ फेब्रुवारी २०१४). Retrieved from http://www.esakal.com (accessed on 12.07.2014)

१४. गायकवाड, नानासाहेब. (२१ एप्रिल २०१३). वाचन संस्कृती. Retrieved from http://www.palakneeti.org (accessed on 12.07.2014)

१५. म्हात्रे, महेश. (२२ एप्रिल २०१२). विश्व पुस्तकांचे. Retrieved from http://maheshmhatre.blogspot.in (accessed on 12.07.2014)

१६. पिसे, अजय. (२००९-१०). सिंहगड व्यवस्थापन महाविद्यालय लोणावळा येथील विद्यार्थ्यांच्या वाचनसवयीचा अभ्यास. एम. फिल. संशोधन प्रकल्प. पुणे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.

१७. कपडेखरेदीवर पुस्तकांची भेट. (शनिवार, ४ आक्टोबर २०१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ३.

१८. आनंदाचा व्यापार. (शनिवार, ४ आक्टोबर २०१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

१९. वाचनानंदांसाठी बुक कॅफे. (शनिवार, ४ आक्टोबर २०१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

२०. चिपळुणकर, विष्णुशास्त्री. (डिसेंबर २००४ ते फेब्रुवारी २००५). वाचन विद्यालय : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९.

२१. हेडावू, मुरलीधर. (३ जून २००९). शालेय शिक्षणात ग्रंथालयाचा वापर. Retrieved from http://www.loksatta.com (accessed on 12.07.2014)

२२. संपादकीय. (२००५). ग्रंथवाचन एक विशेष उपदेश : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. Retrieved from http://www.ycmou.com मार्च-एप्रिल-मे पृ. ४.

२३. सावंत, ऋतुजा. (२८ एप्रिल २०१०). महाविद्यालयातील मराठी. Retrieved from http://sakalmaayboli.blogspot.in (accessed on 12.07.2014)

## प्रकरण ३ रे

## सिंहगड शैक्षणिक संस्था आणि ग्रंथालयांची माहिती

### ३.१ सिंहगड शैक्षणिक संस्थेविषयी माहिती :

शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात अनेक शिक्षण संस्था आहेत. त्यापैकी "सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी" वडगाव बु|| पुणे - ४१ या संस्थेचा समावेश आहे. या संस्थेची स्थापना संस्थापक प्रा. एम.एन.नवले यांनी १२ ऑगस्ट १९९३ रोजी केली. सुरवात सौ. वेणुताई चव्हाण पॉलिटेक्नीक कॉलेजने झाली. याच रोपटयाचे रूपांतर आता एका वटवृक्षामध्ये झाले आहे. या संस्थेचे ब्रीदवाक्य "तमसो मा ज्योर्तिगमय" असे आहे. ही संस्था पुणे विद्यापीठ अंतर्गत आहे. या संस्थेतून अनेक शिक्षणक्रम राबविले जातात. त्यामध्ये शालेय शिक्षणाबरोबरच अभियांत्रिकी पदवी/पदव्युत्तर, व्यवस्थापन, औषधनिर्माण, वैद्यकीय दंत, वास्तुस्थापत्य, संगणक, कायदा, कला, वाणिज्य व विज्ञान, शिक्षणशास्त्र पदवी आणि पदविका अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

आदर्श विद्यार्थी आणि त्यातूनच जबाबदार नागरिक घडवण्याचे संस्थेचे उद्दिष्ट आहे. दर्जेदार शिक्षणातून आदर्श विद्यार्थी घडवणे, त्यांचा सर्वांगीण विकास घडवणे हेच या संस्थेचे ध्येय आहे. याच ध्यासातुन आज उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. ही संस्था फक्त विद्यापीठाच्या आवश्यक त्या निकषांचीच पूर्तता करते असे नाही तर त्याच्याही पुढे जाऊन अभ्यासक्रमासाठी लागणा-या सर्व गरजा पुर्ण करत आहे.

आज सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत ११७ उपशाखा आहेत. त्या सर्व उपशाखा १२ कॅम्पसमध्ये कार्यरत आहेत. त्यामध्ये वडगाव बु, आंबेगाव बु, न-हे, कोंढवा, एरंडवणे, लोणावळा, मुंबई, सांगोला, पंढरपूर, सोलापूर, वारजे, कोंढापूरी इत्यादी या कॅम्पसचा समावेश आहे.[१]

---

१. टिळेकर, अरूण. (n. d.). पुणे शहर, पुणे शहरातील शिक्षणसंस्था. पुणे: निळूभाऊ लिमये फाऊंडेशन. पृ.२०९.

### ३.२ सिंहगड शैक्षणिक संस्थेतील ग्रंथालयांची माहिती :

सदर संशोधनासाठी संशोधकाने सिंहगड शैक्षणिक संस्थेतील ११ विविध महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा समावेश केलेला आहे. त्या ग्रंथालयांची माहिती खालीलप्रमाणे दिलेली आहे.

### ३.२.१ सौ. वेणूताई चव्हाण पॉलिटेक्निक (SVCP) :

या महाविद्यालयाची स्थापना १९९३ मध्ये झाली. हे महाविद्यालय एम.एस.बी.टी. च्या अंतर्गत चालविले जाते. या महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये ४ अशी कर्मचारी संख्या असून विद्यार्थी संख्या २२00 इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या १८३५३ असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे २५0 आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या ८१ इतकी आहे. या ग्रंथालयामध्ये सौ.नंदूताई सरवदे या सहाय्यक ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत.[२]

### ३.२.२ सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट (SIOM) :

या महाविद्यालयाची स्थापना १९९४ मध्ये झाली. व्यवस्थापनविषयक अभ्यासक्रमासाठी या महाविद्यालयाची स्थापना केली. पुणे विद्यापीठाशी संलग्न असणारे 'एम.बी.ए' आणि 'एम.सी.ए' हे अभ्यासकम चालविले जातात. या महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये ११ कर्मचारी संख्या असून विद्यार्थी संख्या २२00 इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या ४५१३९ असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे ५00 आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या १७0 इतकी आहे. या ग्रंथालयाचे ग्रंथपाल म्हणून श्री. संदीपान तादगे हे कार्यरत आहेत.[३]

या महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्तायादीत अव्वल असतात. या यशाच्या चढत्या आलेखामुळे संस्थेतील विद्यार्थ्यांना आपल्या कंपनीमध्ये सामावुन घेण्यासाठी अनेक आघाडीच्या कंपन्या दरवर्षी संस्थेला भेट देतात.

---

२. सौ. वेणूताई चव्हाण पॉलिटेक्निक **Retrieved from http://www.svcp.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)**

३. सिंहगड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट **Retrieved from http://www.siom.sinhgad.edu (accessed on 11.11.2014)**

### ३.२.३ सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (SCOE) :

या महाविद्यालयाची स्थापना १९९६ रोजी झाली. महाविद्यालयामध्ये पदवी, पदव्यत्तर आणि संशोधन हे तिन्ही अभ्यासक्रम शिकविले जातात. पदवी अभ्यासक्रमासाठी ९६०, पदव्यत्तर अभ्यासक्रमासाठी २७२, तर संशोधन अभ्यासक्रमासाठी ६४ एवढया विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश दिला जातो. महाविद्यालयाची एकुण विद्यार्थी संख्या साधारणत: ५००० इतकी आहे. ग्रंथपाल म्हणून डॉ.सौ.अमिता प्रधान या कार्यरत आहेत.

ग्रंथालयामध्ये १ ग्रंथपाल, ३ सहाय्यक ग्रंथपाल, ४ लिपीक, २ शिपाई असा एकुण १० सेवकवर्ग आहे. ग्रंथालयाचे वार्षिक अंदाजपत्रक २ लाखापेक्षा जास्त आहे. ग्रंथालयाची एकुण ग्रंथसंख्या ५५६०५ आहे. वार्षिक ग्रंथवाढ अंदाजे ७५० इतकी आहे. ग्रंथालयात ५०० संशोधन प्रकल्प जमा झाले आहेत. ग्रंथालयामध्ये एकुण २०७ नियतकालिकापैकी १४३ नियतकालिके राष्ट्रीय आणि ६४ नियतकालिके आंतरराष्ट्रीय प्रकारची आहेत. अवांतर वाचनसाहित्याची संख्या १९० इतकी आहे.

ग्रंथालयामध्ये SLIM 21 ही अज्ञावली वापरली जाते. ग्रंथालयामध्ये वाचकांना मुक्तव्दार पध्दतीने प्रवेश दिला जातो. दिवसभरातून अंदाजे २५० ग्रंथाची देवघेव होते.[४]

### ३.२.४ सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (SCOA) :

या महाविद्यालयाची स्थापना २००० साली झाली. महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर हे अभ्यासक्रम चालविले जातात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये १ ग्रंथपाल, १ ग्रंथालय लिपीक, १ शिपाई असा एकुण ३ सेवकवर्ग असून विद्यार्थी संख्या ८९० इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या ६०३४ इतकी असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे २०० आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या ६५ इतकी आहे.

ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले आहे. ग्रंथालयाचे वार्षीक बजेट २ लाख आहे. या ग्रंथालयात सौ. शोभा शेट्टी या ग्रंथपाल कार्यरत आहेत.[५]

---

४. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग **Retrieved from http://www.scoe.sinhgad.edu (accessed on 08.11.2014)**

५. सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर **Retrieved from http://www.scoa.sinhgad.edu (accessed on 07.11.2014)**

### ३.२.५ सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी (SCOP) :

या महाविद्यालयाची स्थापना २000 साली झाली. महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन हे अभ्यासक्रम चालविले जातात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये १ सहायक ग्रंथपाल, २ ग्रंथालय लिपीक, १ शिपाई असा एकुण ४ सेवकवर्ग असून विद्यार्थी संख्या ५७0 इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या ११८६२ इतकी असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे २00 आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या ९0 इतकी आहे.

ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले आहे. ग्रंथालयाचे वार्षीक बजेट १ लाखापेक्षा जास्त आहे. वाचकांना हवे असणारे ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध नसल्यास इतर ग्रंथालयातून मिळवून दिले जातात. या ग्रंथालयात सौ. पुनम भेलके या सहाय्यक ग्रंथपाल कार्यरत आहेत.[६]

### ३.२.६ श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (SKNCOE) :

या अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना २000 साली झाली. त्यावेळी श्री जोशी हे ग्रंथपाल म्हणून कार्यरत होते. प्राचार्य म्हणून प्रा. ए.व्ही.देशपांडे कार्यरत होते. त्यावेळी ग्रंथालयातील ग्रंथसंख्या २८५0 आणि नियतकालिके ६२ होती. ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ३ तर विद्यार्थी संख्या २४0 होती.

डॉ. रंगनाथन् यांच्या "ग्रंथालय ही वर्धिष्णु संस्था आहे" या पाचव्या सिध्दांताप्रमाणे या ग्रंथालयामध्ये जशी विद्यार्थी संस्था वाढली त्याचप्रमाणे ग्रंथाची आणि ग्रंथालय कर्मचारी संख्याही वाढली आहे. यावर्षी ग्रंथसंख्या २८८0३ असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे ३00 इतकी आहे. नियतकालिके १७0 आहेत. कर्मचारी संख्या ८ आहे. विद्यार्थी संख्या १४१४ इतकी आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या ६0 इतकी आहे. सध्या ग्रंथपाल म्हणून श्री चंद्रमोहन तोंडूर हे कार्यरत आहेत.

या ग्रंथालयाची वार्षीक आर्थिक तरतूद २ लाख पर्यंत आहे. तसेच या ग्रंथालयात Easy Lib.6.0 ही संगणकप्रणाली (Software) वापरली जाते.[७]

---

६. सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी **Retrieved from http://www.scop.sinhgad.edu (accessed on 08.11.2014)**

७. श्रीमती काशिबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग **Retrieved from http://www.skncoe.sinhgad.edu (accessed on 11.11.2014)**

### ३.२.७ सिंहगड ज्युनियर कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स (SCOS&C) :

या महाविद्यालयाची स्थापना २००१ साली झाली. महाविद्यालयात पदवी पदव्युत्तर हे अभ्यासक्रम चालविले जातात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये १ ग्रंथपाल, १ सहायक ग्रंथपाल, १ शिपाई असा एकुण ३ सेवकवर्ग असून विद्यार्थी संख्या ३५०० इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या ८६०७ इतकी असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे २५० आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या १८० इतकी आहे.

ग्रंथालयाचे वार्षीक बजेट ५० हजार आहे. वाचकांना हवे असणारे ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध नसल्यास इतर ग्रंथालयातून मिळवून दिले जातात. ग्रंथालयातून आंतर ग्रंथालयीन सेवा सुविधा दिल्या जातात. ग्रंथालयात कु. योगीता वाघचौरे या ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत.[८]

### ३.२.८ सिंहगड लॉ कॉलेज (SLC) :

या महाविद्यालयाची स्थापना २००३ साली झाली. महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रम चालविला जातो. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये १ ग्रंथपाल, १ शिपाई असा एकुण २ सेवकवर्ग असून विद्यार्थी संख्या ५०० इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या ४४२६ इतकी असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे ७५ आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या १० इतकी आहे.

ग्रंथालयाचे वार्षीक बजेट १ लाखापेक्षा जास्त आहे. ग्रंथालयातून आंतर ग्रंथालयीन सेवा सुविधा दिल्या जातात. ग्रंथालयात सौ. स्वाती मते या ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत.[९]

---

८. सिंहगड कॉलेज ऑफ सायन्स **Retrieved from http://www.scos.sinhgad.edu (accessed on 10.11.2014)**

९. सिंहगड लॉ कॉलेज **Retrieved from http://www.slc.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)**

### ३.२.९ सिंहगड डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल (SDC&H) :

या महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली. महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर हे अभ्यासक्रम चालविले जातात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये १ ग्रंथपाल, २ सहायक ग्रंथपाल, १ शिपाई असा एकुण ४ सेवकवर्ग असून विद्यार्थी संख्या ६५० इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या ५२०० इतकी असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे १५० आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या २५ इतकी आहे.

ग्रंथालयाचे वार्षीक बजेट ३ लाखापेक्षा जास्त आहे. वाचकांना हवे असणारे ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध नसल्यास इतर ग्रंथालयातून मिळवून दिले जातात. ग्रंथालयातून आंतर ग्रंथालयीन सेवा सुविधा दिल्या जातात. ग्रंथालयात सौ. अश्विनी आलेकरी या ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत.[१०]

### ३.२.१० श्रीमती काशीबाई नवले सिंहगड स्कुल ऑफ बिजनेस मॅनेजमेंट (SKNSSBM) :

या महाविद्यालयाची स्थापना २०१० साली झाली. महाविद्यालयात पदवी, पदव्युत्तर हे अभ्यासक्रम चालविले जातात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये १ ग्रंथपाल, २ सहायक ग्रंथपाल असा एकुण २ सेवकवर्ग असून विद्यार्थी संख्या ६०० इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या ५९४२ इतकी असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे ३०० आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या ४५ इतकी आहे.

ग्रंथालयाचे वार्षीक बजेट ५० हजार आहे. वाचकांना हवे असणारे ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध नसल्यास इतर ग्रंथालयातून मिळवून दिले जातात. ग्रंथालयातून आंतर ग्रंथालयीन सेवा सुविधा दिल्या जातात. ग्रंथालयात श्री.राहुल विश्वे हे ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत.[११]

---

१०. सिंहगड डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल **Retrieved from http://www.sdch.sinhgad.edu (accessed on 10.11.2014)**

११. श्रीमती काशीबाई नवले सिंहगड स्कुल ऑफ बिजनेस मॅनेजमेंट **Retrieved from http://www.sknssbm.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)**

### ३.२.११ निवृत्ती बाबाजी नवले सिंहगड स्कुल ऑफ इंजिनीअरिंग (NBNSSOE) :

या महाविद्यालयाची स्थापना २०११ साली झाली. महाविद्यालयात पदवी पदव्युत्तर हे अभ्यासक्रम चालविले जातात. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये १ ग्रंथपाल, ३ सहायक ग्रंथपाल, १ लिपीक, १ शिपाई असा एकुण ६ सेवकवर्ग असून विद्यार्थी संख्या ३००० इतकी आहे. ग्रंथालयामध्ये एकुण ग्रंथसंख्या १४६७० इतकी असून वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे ४०० आहे. अवांतर वाचनसाहित्याची संख्या ५५ इतकी आहे.

ग्रंथालयाचे वार्षीक बजेट १ लाख आहे. वाचकांना हवे असणारे ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध नसल्यास इतर ग्रंथालयातून मिळवून दिले जातात. ग्रंथालयातून आंतर ग्रंथालयीन सेवा सुविधा दिल्या जातात. ग्रंथालयात श्री. बबन शिंगाडे हे ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत.[१२]

सदर संशोधनासाठी वरीलप्रमाणे निवड केलेल्या महाविद्यालयांचा लक्षपूर्वक विचार केल्यास असे दिसून येईल की, संशोधकाने सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखेमध्ये चालविल्या जाणा-या विविध विषयावरील (क्षेत्रातील) महाविद्यालयीन ग्रंथालयांची संशोधनासाठी निवड केलेली आहे. त्यामध्ये तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कला, वाणिज्य आणि विज्ञान, वास्तुस्थापत्यशास्त्र, कायदा, औधषनिर्माणशास्त्र, दंत महाविद्यालय आणि चिकित्सा इत्यादी अशा विविध विषयावरील (क्षेत्रातील) अभ्यासक्रमातील महाविद्यालयीन ग्रंथालयांचा समावेश केला आहे.

---

१२. निवृत्ती बाबाजी नवले सिंहगड स्कुल ऑफ इंजिनिअरिंग **Retrieved from http://www.nbnssoe.sinhgad.edu (accessed on 07.11.2014)**

संदर्भ सूची :

१. टिळेकर, अरूण. (n. d.). पुणे शहर, पुणे शहरातील शिक्षणसंस्था. पुणे: निळूभाऊ लिमये फाऊंडेशन. पृ.२०९.

२. सौ. वेणूताई चव्हाण पॉलिटेक्निक Retrieved from http://www.svcp.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)

३. सिंहगड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट Retrieved from http://www.siom.sinhgad.edu (accessed on 11.11.2014)

४. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग Retrieved from http://www.scoe.sinhgad.edu (accessed on 08.11.2014)

५. सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर Retrieved from http://www.scoa.sinhgad.edu (accessed on 07.11.2014)

६. सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी Retrieved from http://www.scop.sinhgad.edu (accessed on 08.11.2014)

७. श्रीमती काशिबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग Retrieved from http://www.skncoe.sinhgad.edu (accessed on 11.11.2014)

८. सिंहगड कॉलेज ऑफ सायन्स Retrieved from http://www.scos.sinhgad.edu (accessed on 10.11.2014)

९. सिंहगड लॉ कॉलेज Retrieved from http://www.slc.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)

१०. सिंहगड डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल Retrieved from http://www.sdch.sinhgad.edu (accessed on 10.11.2014)

११. श्रीमती काशीबाई नवले सिंहगड स्कुल ऑफ बिजनेस मॅनेजमेंट Retrieved from http://www.sknssbm.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)

१२. निवृत्ती बाबाजी नवले सिंहगड स्कुल ऑफ इंजिनिअरिंग Retrieved from http://www.nbnssoe.sinhgad.edu (accessed on 07.11.2014)

# प्रकरण ४ थे

## संकलित माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण

**प्रस्तावना :**

कोणत्याही विषयावर संशोधन करावयाचे म्हणजे त्या विषयाशी संबंधित माहिती शास्त्रौक्त पध्दतीने गोळा करून त्या माहितीची सुसंगत मांडणी करून त्या आधारे अनुमान आणि निष्कर्ष काढले जातात.

प्रस्तुत संशोधन सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास असे असल्यामुळे विषयाला अनुसरून माहिती मिळविण्यासाठी ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर ग्रंथालयातील वाचक विद्यार्थ्यी यांचे मते जाणून घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर ग्रंथालयातुन त्यांना दिल्या जाणा-या सेवा-सुविधांची माहिती मिळविणे आवश्यक आहे. अशी माहिती जाणुन घेण्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरून ग्रंथालयाविषयी आणि वाचकांना ग्रंथालयातून दिल्या जाणा-या सेवा-सुविधांविषयी प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती मिळविली. संकलित झालेली माहिती डेटा स्वरूपात उपलब्ध झाली.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संबंधीत ११ महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची माहिती मिळविण्यासाठी ग्रंथपालांना वाटलेल्या प्रश्नावलीला १00 टक्के प्रतिसाद मिळाला. मिळालेल्या प्रतिसादाच्या आधारे माहितीचे चिकित्सक विश्लेषण करून तपशीलवार मांडणीनुसार विश्लेषण आणि सादरीकरण केले आहे. सदर प्रश्नावली परिशिष्टात जोडल्या आहेत.

## ४.१ ग्रंथपाल प्रश्नावलीचे विश्लेषण आणि सादरीकरण :

सिंहगड शैक्षणिक संस्थेतील संशोधनास असलेल्या प्रत्येक ग्रंथालयातून मिळालेली माहिती तक्त्याच्या स्वरूपात माडूंन त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे.

**प्रश्न १. ग्रंथालयाची सर्वसाधारण माहिती :**

ग्रंथालयाचे नाव, स्थापना वर्ष, कर्मचारी संख्या, विद्यार्थी संख्या, अभ्यासक्रम कोणते असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.


**तक्ता क्र. १**

ग्रंथालयाची सर्वसाधारण माहिती

| अ.न. | महाविद्यालय | स्थापना वर्ष | कर्मचारी संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | SVCP | १९९३ | ४ | २२०० |
| २ | SIOM | १९९४ | ११ | २२०० |
| ३ | SCOE | १९९६ | १० | ५००० |
| ४ | SCOA | २००० | ३ | ८९० |
| ५ | SCOP | २००० | ४ | ५७० |
| ६ | SKNCOE | २००० | ५ | ४४५० |
| ७ | SCOS | २००१ | ३ | ३५०० |
| ८ | SLC | २००३ | २ | ५०० |
| ९ | SDCH | २००४ | ४ | ६५० |
| १० | SKNSSBM | २०१० | २ | ६०० |
| ११ | NBN | २०११ | ६ | ३००० |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, प्रत्येक महाविद्यालयाच्या ग्रंथालयांची कर्मचारी संख्या ही महाविद्यालय किती वर्ष जुने आहे तसेच ग्रंथालयात असलेली ग्रंथसंख्या आणि विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात असून ती ग्रंथालय कामकाजासाठी पुरेशी आहे.

चार्ट क्र. १




एकुण ग्रंथालयांपैकी SIOM आणि SCOE या ग्रंथालयामध्ये कमचारी संख्या अनुक्रमे ११ आणि १0 अशी असून ती इतर ग्रंथालयाच्या तुलनेत सर्वात जास्त असल्याचे दिसून आले.

प्रत्येक महाविद्यालयाची प्रवेश क्षमतेनुसार विद्यार्थी संख्या आहे. शिक्षक संख्या ही विद्यार्थीसंख्येवर अवंबून असल्यामुळे आवश्यकतेप्रमाणे शिक्षक भरलेले आहेत असे दिसून आले. **१00 टक्के विद्यार्थी आणि शिक्षक हे ग्रंथालयाचे वाचक आहेत.**

सर्वच महाविद्यालयामध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविले जातात. तसेच संशोधन हा अभ्यासक्रम फक्त अभियांत्रिकी महाविद्यालयात राबविला जातो असे दिसून आले.

## २. ग्रंथालयातील ग्रंथविषयक माहिती :

ग्रंथालयात एकुण ग्रंथसंख्या, संदर्भग्रंथ संख्या, वार्षीक अंदाजे ग्रंथवाढ किती आहे असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती मिळाली.

## तक्ता क्र. २

एकुण ग्रंथसंख्या, वार्षीक अंदाजे ग्रंथवाढ आणि अवांतर वाचनसाहित्य संख्या

| अ.न. | महाविद्यालय | एकुण ग्रंथसंख्या | संदर्भग्रंथ संख्या | वार्षीक अंदाजे ग्रंथवाढ | अवांतर वाचनसाहित्य संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | SVCP | १८३५३ | १३५७ | २५० | ८१ |
| २ | SIOM | ४५१३८ | १७८९ | ५०० | १७० |
| ३ | SCOE | ५५४४० | १५००० | ७५० | १९० |
| ४ | SCOA | ६०३४ | ५१८४ | २०० | ६५ |
| ५ | SCOP | ११८६२ | १५०० | २०० | ९० |
| ६ | SKNCOE | ३३११० | ७८०१ | ३०० | ६० |
| ७ | SCOS | ८६०७ | ३५०५ | २५० | १८० |
| ८ | SLC | ४४२६ | २४३९ | ७५ | १० |
| ९ | SDCH | ५००० | २५०० | १५० | २५ |
| १० | SKNSSBM | ५९४२ | २७५० | ३०० | ४५ |
| ११ | NBN | १४६७० | ४००० | ४०० | ५५ |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, प्रत्येक महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विद्यार्थी संख्या आणि राबविले जाणारे अभ्यासक्रम यानुसार ग्रंथांची खरेदी केलेली आहे. एकुण ग्रंथालयांच्या तुलनेत SCOE या ग्रंथालयात सर्वात जास्त म्हणजे ५५४४० इतकी ग्रंथसंख्या आहे. सर्वच ग्रंथालयामध्ये प्रत्येक वर्षी ग्रंथवाढ होत असून ही बाब ग्रंथालय आणि वाचकांच्या दृष्टीने चांगली आहे. प्रत्येक ग्रंथालयाची वार्षीक अंदाजे ग्रंथवाढ २५० ते ७५० च्या दरम्यान होत आहे असे दिसून येते.

**सर्वच ग्रंथालयांमध्ये एकुण ग्रंथसंग्रहसंख्येच्या तुलनेत अवांतर वाचनसाहित्याची ग्रंथसंख्येचे प्रमाण फारच कमी आहे असे दिसून येते. अवांतर वाचनसाहित्य संग्रहामध्ये वाढ करावी असे संशोधकास वाटते.**

**३. अवांतर वाचनसाहित्याविषयी :**

३.१ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे काय असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३**

अवांतर वाचनसाहित्य आहे काय

| **अ.न.** | **महाविद्यालय** | **होय** | **नाही** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १0 | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१00%** | **00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, प्रत्येक महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध आहे. या प्रश्नाला १00% प्रतिसाद मिळाला. प्रत्येक ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध आहे ही वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

३.२ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे वाटते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४**

अवांतर वाचनसाहित्य असावे

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, प्रत्येक महाविद्यालयाच्या ग्रंथपालांना ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे वाटते. या प्रश्नाला १००% प्रतिसाद मिळाला. प्रत्येक ग्रंथपालांना ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे वाटणे ही ग्रंथालय आणि वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

प्रत्येक ग्रंथपालाला आपल्या ग्रंथालयात विविध प्रकारचे वाचनसाहित्य आहे हे सांगणे अभिमानाचे वाटते. तसेच ग्रंथालयाचा वाचकवर्ग वाढविण्याच्या दृष्टीनेही ते फायद्याचे असते.

३.३ ग्रंथालयात कोणकोणत्या प्रकारातील अवांतर वाचनसाहित्य आहे असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ५**

ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य प्रकार

| **महाविद्यालयाचे नाव** | कथासंग्रह | कादंबरी | काव्यसंग्रह | वाङ्मय | आध्यात्मिक | स्पर्धात्मक साहित्य | चरित्रे/ आत्मचरित्रे | प्रवासवर्णन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **SVCP** | √ | √ | × | × | × | √ | × | × |
| **SIOM** | × | √ | √ | × | × | √ | √ | × |
| **SCOE** | × | × | × | × | × | × | × | × |
| **SCOA** | √ | √ | × | × | × | √ | × | √ |
| **SCOP** | √ | √ | × | √ | √ | √ | × | × |
| **SKNCOE** | √ | √ | × | √ | × | × | × | × |
| **SCOS** | √ | √ | √ | × | √ | × | √ | √ |
| **SLC** | × | √ | × | × | × | √ | × | × |
| **SDCH** | √ | √ | √ | √ | √ | × | √ | × |
| **SKNSSBM** | √ | √ | × | × | × | × | √ | × |
| **NBN** | × | √ | × | × | × | √ | × | × |


| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नकाशासंग्रह | × | √ | × | √ | × | × | × | × | × | × | × |
| नियतकालिके | √ | √ | √ | √ | √ | × | √ | × | √ | × | × |
| वृत्तपत्रे | √ | √ | √ | √ | √ | × | × | √ | √ | × | √ |
| कात्रण प्रकल्प | × | √ | × | × | √ | × | × | × | √ | × | √ |
| इतर भाषांतील | × | × | × | √ | √ | √ | √ | × | × | × | × |
| शब्दकोश | √ | √ | √ | √ | × | √ | √ | √ | × | √ | √ |
| विश्वकोश | × | √ | √ | √ | √ | × | √ | × | × | √ | × |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की’ एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयापैकी कथासंग्रह हा प्रकार ७ गंथालयात आहे. कादंबरी हा प्रकार १0 ग्रंथालयात आहे. काव्यसंग्रह हा प्रकार ३ गंथालयात आहे. वाङमय हा प्रकार ३ गंथालयात आहे. आध्यात्मिक हा प्रकार ३ ग्रंथालयात आहे. स्पर्धात्मक साहित्य हा प्रकार ६ ग्रंथालयात आहे. चरित्रे/आत्मचरित्रे हा प्रकार ४ ग्रंथालयात आहे. प्रवासवर्णन हा प्रकार २ ग्रंथालयात आहे. नकाशासंग्रह हा प्रकार २ ग्रंथालयात आहे. नियतकालिके हा प्रकार ७ ग्रंथालयात आहे. वृत्तपत्रे हा प्रकार ८ ग्रंथालयात आहे. कात्रण प्रकल्प हा प्रकार ४ ग्रंथालयात आहे. इतर भाषांतील हा प्रकार ४ ग्रंथालयात आहे. शब्दकोश हा प्रकार ९ ग्रंथालयात आहे. विश्वकोश हा प्रकार ६ ग्रंथालयात आहे.

प्रत्येक ग्रंथालयात वरील साहित्य प्रकारातील सर्वच ग्रंथसाहित्य उपलब्ध आहे. परंतु त्याचे प्रमाण कमी जास्त प्रमाणात आहे. त्याची टक्केवारीतील माहिती चार्टच्या माध्यमात खालील प्रमाणे दिर्शविली आहे.

**चार्ट क्र. २**

ग्रंथालयातील अवांतर वाचन साहित्य प्रकार




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की' सर्वच महाविद्यालयांच्या ग्रंथालयापैकी कथासंग्रह हा प्रकार ६४% गंथालयात आहे. कादंबरी हा प्रकार ९१% गंथालयात आहे. काव्यसंग्रह हा प्रकार २७% गंथालयात आहे. वाङमय हा प्रकार २७% गंथालयात आहे. आध्यात्मिक हा प्रकार २७% गंथालयात आहे. स्पर्धात्मक साहित्य हा प्रकार ५५% गंथालयात आहे. चरित्रे/आत्मचरित्रे हा प्रकार ३६% गंथालयात आहे. प्रवासवर्णन हा प्रकार १८% गंथालयात आहे. नकाशासंग्रह हा प्रकार १८% गंथालयात आहे. नियतकालिके हा प्रकार ६४% गंथालयात आहे. वृत्तपत्रे हा प्रकार ७३% गंथालयात आहे. कात्रण प्रकल्प हा प्रकार ३६% गंथालयात आहे. इतर भाषांतील हा

प्रकार ३६% गंथालयात आहे. शब्दकोश हा प्रकार ८१% गंथालयात आहे. विश्वकोश हा प्रकार ५५% गंथालयात आहे.

३.४ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य कोणकोणत्या भाषेतील आहे असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ६**

अवांतर वाचनसाहित्याची भाषा

| अ.न. | महाविद्यालय | मराठी | हिंदी | इंग्रजी | इतर भाषीय |
|---|---|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × | √ | × |
| २ | SIOM | √ | × | √ | × |
| ३ | SCOE | √ | × | √ | × |
| ४ | SCOA | √ | √ | √ | × |
| ५ | SCOP | √ | √ | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × | √ | × |
| ७ | SCOS | √ | √ | √ | × |
| ८ | SLC | √ | × | √ | × |
| ९ | SDCH | √ | × | √ | × |
| १0 | SKNSSBM | √ | × | √ | × |
| ११ | NBN | √ | × | √ | × |
| | टक्केवारी | १00% | २७% | १00% | 00% |


वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयांपैकी सर्वच ग्रंथालयांमध्ये मराठी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध आहे. एकुण ग्रंथालयांपैकी फक्त ३ ग्रंथालयांमध्ये ग्रंथालयांमध्ये हिंदी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध आहे. एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयांपैकी सर्वच ग्रंथालयांमध्ये

इंग्रजी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध आहे. इतर भाषेतील अवांतर वाचनसाहित्य कोणत्याही ग्रंथालयात उपलब्ध नाही. हिंदी भाषेतील अवांतर वाचनसाहित्यामध्ये वाढ करावी असे वाटते.

प्रत्येक ग्रंथालयात विविध भाषांतील वाचनसाहित्य उपलब्ध असणे हे वाचकांसाठी विविध भाषांतील माहिती मिळविण्याच्या दृष्टीने चांगले असते. तसेच एखाद्या विषयावरील माहिती एका भाषेत उपलब्ध नसल्यास ती इतर भाषांमधून मिळविण्यास अशा वाचनसाहित्याचा उपयोग होऊ शकतो.

**चार्ट क्र. ३**

अवांतर वाचनसाहित्याची भाषा




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की' एकुण ग्रंथालयापैकी सर्वच ग्रंथालयात म्हणजे १00% ग्रंथालयात मराठी आणि इंग्रजी भाषेतील ग्रंथसाहित्य उपलब्ध आहे. परंतु हिंदी भाषेतील ग्रंथसाहित्य फक्त २७% ग्रंथालयात उपलब्ध आहे.

३.५ ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्याची संख्या किती आहे असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ७**

अवांतर वाचनसाहित्याची संख्या

| अ.न. | महाविद्यालय | मराठी | हिंदी | इंग्रजी | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | SVCP | ४८ | × | ३३ | ८१ |
| २ | SIOM | ५५ | × | ११५ | १७० |
| ३ | SCOE | ३९ | × | १५१ | १९० |
| ४ | SCOA | २५ | ५ | ३५ | ६५ |
| ५ | SCOP | ४० | १० | ४० | ९० |
| ६ | SKNCOE | २५ | × | ३५ | ६० |
| ७ | SCOS | १०० | २० | ६० | १८० |
| ८ | SLC | ०३ | × | ०७ | १० |
| ९ | SDCH | १५ | × | १० | २५ |
| १० | SKNSSBM | १५ | × | ३० | ४५ |
| ११ | NBN | १८ | × | ३७ | ५५ |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयापैकी **SCOS** या ग्रंथालयामध्ये मराठी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य संख्या सर्वात जास्त म्हणजे १०० इतकी आहे. तसेच **SLC** या ग्रंथालयामध्ये मराठी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य संख्या सर्वात कमी म्हणजे ०३ इतकी आहे.

एकुण ग्रंथालयापैकी फक्त **SCOA, SCOP, SCOS** या ग्रंथालयांमध्ये हिंदी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य संख्या अनुक्रमे ५, १०, २० इतकी आहे. इतर ग्रंथालयांमध्ये हिंदी भाषेतील अवांतर वाचनसाहित्यच उपलब्ध नाही.

एकुण ग्रंथालयापैकी **SIOM** या ग्रंथालयामध्ये इंग्रजी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य संख्या सर्वात जास्त म्हणजे ११५ इतकी आहे. तसेच **SLC** या ग्रंथालयामध्ये इंग्रजी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य संख्या सर्वात कमी म्हणजे ०७ इतकी आहे.

प्रत्येक ग्रंथालयाच्या एकुण ग्रंथसंख्येच्या तुलनेत अवांतर वाचनसाहित्य संख्येचे प्रमाण फारच कमी आहे असे दिसून येते.

३.६ कोणत्या भाषेतील साहित्य जास्त प्रमाणात वाचले जाते असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ८**


भाषेतील साहित्य वाचण्याचे प्रमाण

| अ.न. | महाविद्यालय | मराठी | हिंदी | इंग्रजी | इतर भाषीय |
|---|---|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × | √ | × |
| २ | SIOM | × | × | √ | × |
| ३ | SCOE | √ | × | √ | × |
| ४ | SCOA | √ | × | √ | × |
| ५ | SCOP | √ | × | √ | × |
| ६ | SKNCOE | × | × | √ | × |
| ७ | SCOS | √ | × | × | × |
| ८ | SLC | × | × | √ | × |
| ९ | SDCH | √ | × | √ | × |
| १0 | SKNSSBM | × | × | √ | × |
| ११ | NBN | × | × | √ | × |
| | **टक्केवारी** | **५५%** | **00%** | **९१%** | **00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयांपैकी ६ ग्रंथालयामध्ये मराठी भाषेतील वाचनसाहित्य जास्त प्रमाणात वाचले जाते. तसेच एकुण ग्रंथालयांपैकी १0 ग्रंथालयामध्ये इंग्रजी भाषेतील वाचनसाहित्य जास्त प्रमाणात वाचले जाते. एकुण ग्रंथालयांपैकी कोणत्याही ग्रंथालयामध्ये हिंदी भाषेतील वाचनसाहित्य वाचले जात नाही. तसेच इतर भाषेतील अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयात उपलब्धच नाही त्यामुळे अशा वाचनसाहित्याचे वाचन केले जात नाही.

**चार्ट क्र. ४**

भाषेतील साहित्य वाचण्याचे प्रमाण




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण ग्रंथालयांपैकी इंग्रजी भाषेतील वाचन साहित्य वाचण्याचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ९१% आहे. मराठी भाषेतील वाचन साहित्य वाचण्याचे प्रमाण ५५% आहे. तर हिंदी भाषेतील वाचन साहित्य वाचलेच जात नाही.

सध्या सर्वच क्षेत्रात इंग्रजी भाषेला प्राधान्य दिले जाते. तसेच इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याचे प्रमाणही सर्वात जास्त आहे. इंग्रजी भाषेतील वाचनसाहित्य वाचण्याकडे सर्वांचा कल दिसून येतो. त्यामुळे इंग्रजी भाषेतील वाचनसाहित्य जास्त प्रमाणात वाचले जात असावे असे संशोधकास वाटते. परंतु मराठी तसेच हिंदी भाषेतील किंवा इतर भाषेतील वाचनसाहित्य उपलब्ध करून दिल्यास कुतूहल म्हणून किंवा आवश्यकतेनुसार या साहित्याचा वापर होऊ शकतो.

३.७ कोणत्या प्रकाशनांचे वाचन साहित्य वाचक जास्त प्रमाणात वाचतात असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

### तक्ता क्र. ९

प्रकाशनांचे साहित्य वाचण्याचे प्रमाण

| अ.न. | महाविद्यालय | भारतीय | परदेशी |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | १००% | ००% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये म्हणजे १००% ग्रंथालयांमध्ये भारतीय प्रकाशनांचे साहित्य जास्त प्रमाणात वाचले जाते. एकुण ग्रंथालयांपैकी कोणत्याही ग्रंथालयामध्ये परदेशी प्रकाशनांचे साहित्य वाचले जात नाही.

परदेशी वाचनसाहित्याची भाषा समजण्यास थोडी अवघड असल्या कारणांने परदेशी भाषेतील वाचनसाहित्य वाचनाकडे वाचकांचा कल दिसून येते नाही.

### ४. ग्रंथपालांची अवांतर साहित्याच्या आवडी विषयक माहिती :

४.१ आपणास अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. १०

अवांतर वाचनसाहित्याची आवड

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथपालांना अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे.

जी व्यक्ती सुशिक्षित आहे अशा प्रत्येक व्यक्तीला वाचनाची आवड असतेच. तसेच मनोरंजन, मोकळा वेळ घालविण्यासाठी किंवा चालू घडामोडीचे ज्ञान अवगत असावे या दृष्टीकोनातून अवांतर वाचनसाहित्यचे वाचन करीत असतात.

४.२ आपला स्वत:चा वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ११**

वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १0 | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | × | √ |
|  | टक्केवारी | 0९% | ९१% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी फक्त **SKNSSBM** या महाविद्यालयाच्या ग्रंथपालांकडे वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह आहे. ९१% महाविद्यालयांच्या ग्रंथपालांकडे वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह नाही.

प्रत्येक व्यक्तीला वाचनाची आवड असतेच परंतु एखादे पुस्तक वाचल्यानंतर ते परत वाचू वाटत नाही. अशी पुस्तक ठेवण्यास जागा उपलब्ध नसणे किंवा त्यांची निगा राखणे शक्य नसल्यामुळे शक्यतो वाचक पुस्तकांचा संग्रह करून ठेवणे पसंत करीत नाहीत.

४.३ खालीलपैकी कोणत्या प्रकारचे साहित्य जास्त प्रमाणात आवडते.

**तक्ता क्र. १२**

कोणत्या प्रकारचे साहित्य जास्त आवडते


| महाविद्यालयाचे नाव | कथासंग्रह | कादंबरी | काव्यसंग्रह | वाङमय | आध्यात्मिक | स्पर्धात्मक साहित्य | चरित्रे/ आत्मचरित्रे | प्रवासवर्णन | नकाशासंग्रह |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **SVCP** | √ | √ | × | × | √ | × | × | × | × |
| **SIOM** | × | √ | √ | × | × | √ | √ | × | √ |
| **SCOE** | × | √ | × | √ | √ | √ | × | × | √ |
| **SCOA** | × | √ | × | × | √ | × | × | × | × |
| **SCOP** | × | √ | × | × | × | × | √ | × | × |
| **SKNCOE** | × | × | × | × | √ | × | × | × | × |
| **SCOS** | √ | √ | × | × | × | × | √ | × | × |
| **SLC** | √ | √ | × | × | × | √ | × | × | × |
| **SDCH** | √ | √ | × | × | × | √ | × | × | × |
| **SKNSSBM** | √ | √ | × | × | × | × | √ | √ | × |
| **NBN** | × | × | × | × | × | √ | √ | × | × |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नियतकालिके | × | √ | √ | √ | × | √ | × | × | × | × | × |
| वृत्तपत्रे | √ | × | √ | √ | √ | × | × | √ | √ | × | √ |
| कात्रण प्रकल्प | × | × | × | × | × | × | × | × | × | × | × |
| इतर भाषांतील | × | × | × | × | × | × | × | × | × | × | × |
| शब्दकोश | × | √ | × | × | × | × | × | × | × | × | × |
| विश्वकोश | × | √ | × | × | × | × | × | × | × | × | × |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी कथासंग्रह हा प्रकार ५ ग्रंथपालांना आवडतो. कादंबरी हा प्रकार ९ ग्रंथपालांना आवडतो. आध्यात्मिक हा प्रकार ४ ग्रंथपालांना आवडतो. स्पर्धात्मक साहित्य हा प्रकार ५ ग्रंथपालांना आवडतो. चरित्रे/आत्मचरित्रे हा प्रकार ५ ग्रंथपालांना आवडतो. नकाशासंग्रह हा प्रकार २ ग्रंथपालांना आवडतो. नियतकालिके हा प्रकार ४ ग्रंथपालांना आवडतो. वृत्तपत्रे हा प्रकार ७ ग्रंथपालांना आवडतो. काव्यसंग्रह, वाङ्मय, प्रवासवर्णन, शब्दकोश, विश्वकोश हे साहित्य प्रत्येकी एका ग्रंथपालांना आवडते. कात्रण प्रकल्प आणि इतर भाषेतील या साहित्य प्रकाराला कोणत्याही ग्रंथपालांकडून प्रतिसाद मिळाला नाही.

**चार्ट क्र. ५**

आवडता साहित्य प्रकार




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, कथासंग्रह हा प्रकार ४५% ग्रंथपालांना आवडतो. कादंबरी हा प्रकार ८१% ग्रंथपालांना आवडतो. आध्यात्मिक हा प्रकार ३६% ग्रंथपालांना आवडतो. स्पर्धात्मक साहित्य हा प्रकार ४५% ग्रंथपालांना आवडतो. चरित्रे/आत्मचरित्रे हा प्रकार ४५% ग्रंथपालांना आवडतो. नकाशासंग्रह हा प्रकार १८% ग्रंथपालांना आवडतो. नियतकालिके हा प्रकार ३६% ग्रंथपालांना आवडतो. वृत्तपत्रे हा प्रकार ६४% ग्रंथपालांना आवडतो. काव्यसंग्रह, वाङमय, प्रवासवर्णन, शब्दकोश, विश्वकोश हे साहित्य प्रत्येकी १% ग्रंथपालांना आवडते. कात्रण प्रकल्प आणि इतर भाषेतील या साहित्य प्रकाराला कोणत्याही ग्रंथपालांकडून प्रतिसाद मिळाला नाही.

४.४ गेल्या तीन महिन्यात तुम्ही किती अवांतर पुस्तके वाचली आहेत असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. १३**

तीन महिन्यात अवांतर पुस्तके वाचल्याची संख्या

| अ.न. | महाविद्यालय | प्रतिसाद |
|---|---|---|
| १ | SVCP | ३ ते ५ |
| २ | SIOM | **७ पेक्षा जास्त** |
| ३ | SCOE | **७ पेक्षा जास्त** |
| ४ | SCOA | ३ ते ५ |
| ५ | SCOP | ३ ते ५ |
| ६ | SKNCOE | **५ ते ७** |
| ७ | SCOS | ३ ते ५ |
| ८ | SLC | ३ ते ५ |
| ९ | SDCH | ३ ते ५ |
| १० | SKNSSBM | ३ ते ५ |
| ११ | NBN | ३ ते ५ |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी **SIOM, SCOE** आणि **SKNCOE** या ग्रंथपालांनी ५ ते ७ आणि ७ पेक्षाही जास्त अवांतर पुस्तक वाचली आहेत. ३ ते ५ अवांतर पुस्तक वाचणा-यांची संख्या ८ म्हणजेच एकुण ग्रंथपालांच्या ७३% इतकी आहे.

प्रत्येक ग्रंथपालांनी कमीत कमी ३ ते ५ अवांतर पुस्तक वाचली आहेत. मनोरंजन म्हणून किंवा अधिक माहिती मिळविण्याच्या उद्देशाने पुस्तकांचे वाचन केले जाते. सध्याच्या धावपळीच्या काळात पुस्तक वाचण्यासाठी वेळ दिला जातो हीच गोष्ट जास्त महत्वपूर्ण आहे असे संशोधकास वाटते.

४.५ आठवडयातील किती दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवता असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. १४**

आठवडयातील अवांतर वाचनासाठीचे दिवस


| अ.न. | महाविद्यालय | प्रतिसाद |
|---|---|---|
| १ | SVCP | १ दिवस |
| २ | SIOM | **२ दिवस** |
| ३ | SCOE | **२ दिवस** |
| ४ | SCOA | १ दिवस |
| ५ | SCOP | १ दिवस |
| ६ | SKNCOE | १ दिवस |
| ७ | SCOS | १ दिवस |
| ८ | SLC | १ दिवस |
| ९ | SDCH | १ दिवस |
| १० | SKNSSBM | १ दिवस |
| ११ | NBN | १ दिवस |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालपैकी १८% ग्रंथपाल आठवडयातील २ दिवस अवांतर वाचनासाठी राखुन ठेवतात. तर ८१% ग्रंथपाल आठवडयातील १ दिवस अवांतर वाचनासाठी राखुन ठेवतात असे दिसून आले.

सध्याचे जीवन हे फारच धावपळीचे असते. प्रत्येक माणसाला कोणत्यातरी गोष्टीचा छंद हा असतोच परंतु या धावपळीच्या जीवनामुळे छंद जोपासणे कठीण झाले आहे. वाचन हा सुध्दा एक छंदच आहे. हा छंद जोपासण्यासाठी ग्रंथपाल आठवडयातील १ किंवा २ दिवस राखून ठेवतात ही बाब चांगली आहे.

## चार्ट क्र. ६

प्रत्यक्ष वाचन आणि आवश्यक वाचन




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, प्रत्येक ग्रंथालयातील ग्रंथपालांच्या मते ते आठवडयातील १ ते २ दिवस राखून ठेवतात. असे असून सुध्दा त्यांनी मागील ३ महिन्यात ३ ते ५ आणि ५ ते ७ तर काहींनी ७ पेक्षा जास्त पुस्तके वाचली आहेत असे सांगितले. परंतु आठवडयातील १ दिवस राखुन ठेवत असतील तर महिन्यातून ४ दिवस मिळतात. ३ महिन्याचे १२ दिवस याप्रमाणे ३ महिन्यात अनुक्रमे ९, २१ आणि ३५ अशी पुस्तके वाचली गेली पाहिजेत असे संशोधकास वाटते.

४.६ अवांतर वाचनसाहित्यातील नवीन पुस्तकांची माहिती तुम्ही कोठून मिळविता असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. १५

नवीन पुस्तकांची माहिती मिळविण्याचे माध्यम


| अ.न. | महाविद्यालय | ग्रंथालय | इंटरनेट | मित्र |
|---|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | √ | × |
| २ | SIOM | √ | √ | × |
| ३ | SCOE | √ | √ | × |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | SCOA | √ | √ | √ |
| ५ | SCOP | √ | × | √ |
| ६ | SKNCOE | √ | √ | √ |
| ७ | SCOS | √ | √ | × |
| ८ | SLC | √ | √ | × |
| ९ | SDCH | √ | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | √ | × |
| ११ | NBN | √ | √ | × |
| | टक्केवारी | १००% | ८२% | २७% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी १० ग्रंथपाल नवीन पुस्तकांची माहिती ग्रंथालयातून मिळवितात. तसेच इंटरनेटवरून माहिती मिळविणा-या ग्रंथपालांची संख्या ९ आहे. मित्रांकडून माहिती मिळविणा-या ग्रंथपालांची संख्या ३ आहे असे दिसून आले. ग्रंथालयातून माहिती मिळविण्या-यांची संख्या सर्वात जास्त आहे.

**चार्ट क्र. ७**

नवीन पुस्तकांविषयी माहिती मिळविण्याचे माध्यम




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण ग्रंथपालांपैकी ९१% ग्रंथपाल नवीन पुस्तकांची माहिती ग्रंथालयातून मिळवितात. तसेच इंटरनेटवरून माहिती

मिळविणा-या ग्रंथपालांची संख्या ८२% आहे. मित्रांकडून माहिती मिळविणा-या ग्रंथपालांची संख्या २७% आहे असे दिसून आले.

सध्याचा जमाना इंटरनेटचा असला तरीसुध्दा नवीन पुस्तकांची माहिती मिळविण्यासाठी जास्तीत जास्त लोकांकडून ग्रंथालयाचा वापर होतो. ग्रंथालय हेच विविध विषयावरील तसेच वेगवेगळी पुस्तक मिळण्याचे एकमेव माध्यम आहे असे यावरून निदर्शनास येते.

४.७ कोणत्या माध्यमातील पुस्तके वाचायला आवडतात असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. १६**

पुस्तकांचे आवडणारे माध्यम

| अ.न. | महाविद्यालय | छापील | ई-बुक्स |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | √ |
| २ | SIOM | √ | √ |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | √ |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | √ |
| ७ | SCOS | √ | √ |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | √ |
| १0 | SKNSSBM | √ | √ |
| ११ | NBN | √ | √ |
| | **टक्केवारी** | **१00%** | **७३%** |


वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथपालांना म्हणजे ११ ग्रंथपालांना छापील माध्यमातील पुस्तके वाचायला आवडतात. तसेच

ई-बुक्स माध्यमातील पुस्तके आवडणा-यांची संख्या ८ इतकी आहे. यावरून असे दिसून येते की, इलेक्ट्रॉनिक जमान्यातही छापील माध्यमातील पुस्तकांना अधिक महत्व दिले जाते.

सध्याचे युग हे इंटरनेटचे युग असून जास्तीत जास्त माहिती इंटरनेटच्या माध्यमातून तसेच ई-स्वरूपात मिळत असूनसुध्दा वाचकांकडून ग्रंथालयातील छापील पुस्तकांनाच सर्वात जास्त पसंती दिली जाते ही ग्रंथालयांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

**चार्ट क्र. ८**

पुस्तकाचे माध्यम




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, १००% ग्रंथपालांना छापील माध्यमातील पुस्तके वाचायला आवडतात. तसेच ई-बुक्स माध्यमातील पुस्तके आवडणा-यांची संख्या ७३% इतकी आहे.

४.८ प्रवासवर्णन वाचनसाहित्याचा वापर केला आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. १७**

प्रवासवर्णन वाचनसाहित्याचा वापर


| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | × | √ |
| | टक्केवारी | १००% | ७३% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी फक्त ३ ग्रंथपालांनी प्रवासवर्णन वाचनसाहित्याचा वापर केला आहे. परंतु ८ ग्रंथपालांनी प्रवासवर्णन वाचनसाहित्याचा वापर केलेला नाही.

**चार्ट क्र. ९**

प्रवासवर्णन साहित्याचा वापर



वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण ग्रंथपालांपैकी २७% ग्रंथपालांनी प्रवासवर्णन वाचनसाहित्याचा वापर केला आहे. तर ७३% ग्रंथपालांनी प्रवासवर्णन वाचनसाहित्याचा वापर केलेला नाही.

सध्या दळणवळणाची साधने आणि पैसा सर्वांकडे उपलब्ध असल्याकारणाने आपल्याला जे ठिकाण पाहायचे आहे त्याठिकाणी आपण जाऊ शकतो. स्वत:ला मिळणारा आनंद प्रवासवर्णन साहित्यावाचनातून मिळत नाही. म्हणून असे साहित्य वाचण्यापैक्षा प्रत्यक्ष त्या ठिकाणाचा अनुभव घेणे जास्त पसंत केले जाते.

४.९ संशोधनावरील वाचनसाहित्याचा वापर केला आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. १८**


संशोधनावरील वाचनसाहित्याचा वापर

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १0 | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | ८१% | १९% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी ९ ग्रंथपालांनी संशोधनावरील वाचनसाहित्याचा वापर केला आहे. परंतु एकुण ग्रंथपालांपैकी ३ ग्रंथपाल संशोधनावरील वाचनसाहित्याचा वापर करीत नाहीत असे दिसून आले. जास्तीत जास्त ग्रंथपाल संशोधनावरील वाचनसाहित्याचा वापर करतात ही ग्रंथालय तसेच वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

**चार्ट क्र. १०**

संशोधनपर साहित्याचा वापर




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, संशोधनपर साहित्याचा वापर करणा-या ग्रंथपालांची ८१% संख्या आहे. तर वापर न करण्या-या ग्रंथपालांची संख्या १९% आहे.

संशोधनपर वाचनसाहित्यात संशोधन क्षेत्रात घडणा-या घटना-घडामोडींची माहिती दिलेली असते. नवीन संशोधन करणा-या नवसंशोधकांना अशी माहिती मिळण्याचे संशोधनपर साहित्य हे एकमेव साहित्य असून त्यामधून नवसंशोधकांना संशोधनास आवश्यक असलेली माहिती मिळत असते.

४.१० स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. १९

स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील साहित्य आवड

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | १००% | ००% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथपालांना म्हणजे १००% ग्रंथपालांना स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड आहे. ही ग्रंथालय तसेच वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

सध्याच्या विद्यार्थीदशेचा विचार करता सर्वच क्षेत्रात स्पर्धा निर्माण झालेली आहे. त्यामुळे स्वत:ला या स्पर्धेत टिकवून ठेवण्यासाठी स्पर्धात्मक साहित्याची अत्यंत आवश्यकता निर्माण होत आहे. या कारणामुळे स्पर्धात्मक साहित्याचा जास्तीत जास्त वापर होताना दिसून येतो. तसेच चालू घडामोडीविषयी आपल्याला ज्ञान असणे आवश्यक असल्यामुळे स्पर्धात्मक साहित्याचे वाचन केले जाते. सध्याच्या स्पर्धात्मक युगाचा विचार करता प्रत्येक ग्रंथालयात स्पर्धात्मक तसेच चालू घटनाघडामोडीवरील वाचनसाहित्य उपलब्ध असणे ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने चांगली गोष्ट आहे.

४.११ काव्यसंग्रहाचे वाचन करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २०**

काव्यसंग्रहाचे वाचन


| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | × | √ |
| | टक्केवारी | २७% | ७३% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी ३ ग्रंथपाल काव्यसंग्रहाचे वाचन करतात. परंतु ८ ग्रंथपाल काव्यसंग्रहाचे वाचन करीत नाहीत असे दिसून आले.

कवितांची आवड असलेल्या लोकांकडूनच काव्यसंग्रहाचे वाचन केले जाते. शक्यतो काव्यसंग्रह हा प्रकार मनोरंजनाचा नाही असा वाचकांचा गैरसमज आहे. त्यामुळे काव्यसंग्रहाचे वाचन कमी प्रमाणात होत असावे असे संशोधकास वाटते.

**चार्ट क्र. ११**

काव्य संग्रहाचे वाचन




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण ग्रंथपालांपैकी २७% ग्रंथपाल काव्यसंग्रहाचे वाचन करतात. तर ७३% ग्रंथपाल काव्यसंग्रहाचे वाचन करीत नाहीत.

४.१२ आध्यात्मिक साहित्याचे वाचन करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २१**

आध्यात्मिक साहित्याचे वाचन

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |


| | | | |
|---|---|---|---|
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | ५५% | ४५% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी ६ ग्रंथपाल आध्यात्मिक साहित्याचे वाचन करतात. परंतु ५ ग्रंथपाल आध्यात्मिक साहित्याचे वाचन करीत नाहीत असे दिसून आले.

आध्यात्मिक वाचनसाहित्याचे वाचन करण्यासाठी आध्यात्माची आवड असणे सर्वात महत्वाचे आहे. प्रत्येक व्यक्ती हा आध्यात्मिक वाचनसाहित्याचे वाचन करीलच असे नाही.

**चार्ट क्र. १२**

आध्यात्मिक साहित्याचे वाचन




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, ५५% ग्रंथपाल आध्यात्मिक साहित्याचे वाचन करतात. परंतु ४५% ग्रंथपाल आध्यात्मिक साहित्याचे वाचन करीत नाहीत.

## ५. वाचनसाहित्य खरेदी :

५.१ ग्रंथ खरेदी करताना कोणत्या प्रकारचे ग्रंथ जास्त खरेदी केले जातात असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २२**

कोणत्या प्रकारचे ग्रंथ खरेदी केले जातात

| **अ.न.** | **महाविद्यालय** | **अभ्यासक्रमावर आधारित** | **अवांतर वाचनसाहित्य** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | √ |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | √ |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **१८%** |


वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये अभ्यासक्रमावर आधारितच पुस्तके खरेदी केली जातात. परंतु आणि **SIOM** आणि **SCOP** या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात मात्र काही प्रमाणात अवांतर वाचनसाहित्याची खरेदी केली जाते.

शैक्षणिक जीवनात अभ्यासक्रमाला अधिक महत्व दिल्यामुळे फक्त अभ्यास याच गोष्टीकडे जास्तीत जास्त लक्ष दिले जाते. ग्रंथालयात ग्रंथ खरेदी करतानाही याच गोष्टीला जास्त महत्व दिल्यामुळे अवांतर वाचनसाहित्य खरेदीकडेही दुर्लक्ष होते असावे असे

संशोधकास वाटते. त्याचबरोबर अभ्यासातून अवांतर वाचनासाठी वेळ मिळत नाही ही सबब वाचकांकडून सांगितली जाते.

**चार्ट क्र. १३**

कोणत्या प्रकारची ग्रंथखरेदी




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, १००% ग्रंथालयात अभ्यासक्रमावर आधारित ग्रंथखरेदी केली जाते. तर १८% ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्याची खरेदी केली जाते.

५.२ नवीन खरेदी केलेल्या ग्रंथाची यादी सुचना फलकावर चिटकवली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २३**

नवीन ग्रंथाची यादी सुचना फलकावर चिटकविली जाते

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये म्हणजे १००% ग्रंथालयात नवीन खरेदी केलेल्या ग्रंथाची यादी सुचना फलकावर चिटकवली जाते.

प्रत्येक ग्रंथालयात नवीन ग्रंथसाहित्य खरेदी केल्यानंतर त्या साहित्याचे सोपस्कार केल्यानंतरच ते साहित्य वाचकांना वाचनासाठी उपलब्ध करून दिले जाते. ग्रंथालयात कोणकोणते नवीन ग्रंथ आलेले आहेत त्यांची माहिती वाचकांना व्हावी यासाठी नवीन ग्रंथांची यादी सुचनाफलकावर चिटकविली जाते. तसेच काही ग्रंथ देवघेव विभागामध्ये दर्शनी भागात ठेवलेले असतात.

५.३ अवांतर वाचनसाहित्य खरेदी करावे असे समिती किंवा व्यवस्थापन सुचविते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २४**

अवांतर वाचनसाहित्य खरेदीविषयी समिती किंवा व्यवस्थापनाची सुचना


| **अ.न.** | **महाविद्यालय** | **सुचविते** | **सुचवित नाही** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | √ | × |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | ४५% | ५५% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयांपैकी ५ ग्रंथालयांना अवांतर वाचनसाहित्य खरेदी करावे असे समिती किंवा व्यवस्थापन सुचविते. तसेच ६ ग्रंथालयांना अवांतर वाचनसाहित्य खरेदी करावे असे समिती किंवा व्यवस्थापन सुचवित नाही.

**चार्ट क्र. १४**

अवांतर वाचनसाहित्य खरेदी समिती व व्यवस्थापन सुचविते




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, ४५% ग्रंथालयांना अवांतर वाचनसाहित्य खरेदी करावे असे समिती किंवा व्यवस्थापन सुचविते. तर ५५% ग्रंथालयांना अवांतर वाचनसाहित्य खरेदी करावे असे समिती किंवा व्यवस्थापन सुचवित नाही.

प्रत्येक ग्रंथालयातील समीतीमध्ये विविध विभागातील एक याप्रमाणे सभासद असतात. त्यापैकी काहींना अवांतर वाचनाविषयी आवड असू शकते. तसेच वाचकांचा विचार करून समीती सभासद किंवा व्यवस्थापनातील काही मंडळी अवांतर वाचनसाहित्य खरेदीला मान्यता देऊ शकतात. तर अभ्यासक्रमाला प्राध्यान्य देणारी व्यक्ती अवांतर वाचनसाहित्य खरेदी करण्यास नकार देऊ शकते. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना इतरही पुस्तक वाचण्याची सवय लागण्यासाठी समिती तसेच व्यवस्थापनाकडून जास्तीत जास्त अवांतर वाचनसाहित्य खरेदीसाठी मंजूरी मिळविण्याचा ग्रंथपालांनी प्रयत्न करावा.

५.४ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य कोणत्या पध्दतीने संकलन केले जाते असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २५**


अवांतर वाचनसाहित्य संकलन पध्दत

| **अ.न.** | **महाविद्यालय** | **खरेदी** | **देणगी** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | √ |
| ७ | SCOS | √ | √ |
| ८ | SLC | √ | √ |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | √ |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **३६%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे ११ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य खरेदी पध्दतीने संकलन केले जाते. परंतु ४ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य देणगी पध्दतीने संकलन केले जाते.

**चार्ट क्र. १५**

अवांतर वाचनसाहित्य संकलन पध्दत




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, १००% ग्रंथालयांना अवांतर वाचनसाहित्य खरेदी पध्दतीने संकलित केले जाते. तर ३६% ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य देणगी पध्दतीने संकलन केले जाते.

सर्वसाधारणत: सर्वच ग्रंथालयात ग्रंथांचे संकलन खरेदीच्या माध्यामातूनच केले जाते. परंतु काही देणगीदार ग्रंथालयास भेट म्हणून आपल्याकडील ग्रंथसंग्रह ग्रंथालयास भेट देत असतात. असा ग्रंथसंग्रहही ग्रंथालयात ठेवणे भाग पडते. त्यामुळे ग्रंथ खरेदीबरोबरच देणगी स्वरूपात मिळालेल्या ग्रंथसंग्रहाचे सुध्दा ग्रंथालयात संकलन केले जाऊ शकते.

५.५ अवांतर वाचनसाहित्याच्या जास्तीत जास्त किती प्रती विकत घेतल्या जातात असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. २६

अवांतर वाचनसाहित्याच्या किती प्रती घेतल्या जातात


| अ.न. | महाविद्यालय | विद्यार्थी संख्येनुसार | मागणीनुसार |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | २७% | ७३% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयांपैकी ३ ग्रंथालयांत विद्यार्थीसंख्येनुसार अवांतर वाचनसाहित्याच्या प्रती विकत घेतल्या जातात. तर ८ ग्रंथालयांत मागणीनुसार अवांतर वाचनसाहित्याच्या प्रती विकत घेतल्या जातात असे दिसून आले.

प्रत्येक ग्रंथालयात विद्यार्थी संख्येच्या ठरविक प्रमाणात ग्रंथसंग्रहाच्या प्रती विकत घेतल्या जातात. परंतु विशिष्ट विषयावरील किंवा विशिष्ट लेखकांच्या ग्रंथांची वाचकांकडून मागणी जास्त प्रमाणात होत असल्यास त्यानुसार ग्रंथसंग्रहामध्ये वाढ केली जाते.

**चार्ट क्र. १६**

अवांतर वाचनसाहित्याच्या किती प्रती घेतल्या जातात




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, २७% ग्रंथालयात विद्यार्थी संख्येनुसार अवांतर वाचनसाहित्याच्या प्रती विकत घेतल्या जातात. तर ७३% ग्रंथालयात मागणीनुसार अवांतर वाचनसाहित्याच्या प्रती विकत घेतल्या जातात.

५.६ मागील २०१२ ते २०१४ या प्रत्येक वर्षी किती अवांतर वाचनसाहित्य खरेदी केले असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २७**

२०१२ ते २०१४ अवांतर वाचनसाहित्य खरेदीचा तपशिल

| अ.न. | महाविद्यालय | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|
| १ | SVCP | ०२ | ०३ |
| २ | SIOM | ०४ | ०२ |
| ३ | SCOE | ०५ | ०३ |
| ४ | SCOA | ०२ | ०४ |
| ५ | SCOP | ०३ | ०५ |
| ६ | SKNCOE | ०४ | ०२ |


| | | | |
|---|---|---|---|
| ७ | SCOS | ०६ | ०३ |
| ८ | SLC | ०१ | ०२ |
| ९ | SDCH | ०३ | ०४ |
| १० | SKNSSBM | ०५ | ०३ |
| ११ | NBN | ०४ | ०२ |
| | एकुण संख्या | ३९ | ३३ |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयात २०१२-१३ ते २०१३-१४ या वर्षात प्रत्येक ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य खरेदी ही सरासरी ०१ ते १० या संख्येत आहे. सर्व ग्रंथालयांची मिळून २०१२-१३ मधील अवांतर वाचनसाहित्य खरेदी संख्या ३९ इतकी आहे. तर २०१३-१४ मधील अवांतर वाचनसाहित्य खरेदी संख्या ३३ इतकी आहे.

प्रत्येक ग्रंथालयामध्ये अंदाजे वार्षीक ग्रंथवाढ ही साधारणत: १०० ते ७५० आहे. यातुलनेत अवांतर वाचनसाहित्याची ग्रंथवाढ ही त्यामानाने अगदीच थोडकी आहे. यागोष्टीचा विचार करता ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य खरेदीचे प्रमाण वाढविले पाहिजे असे संशोधकास वाटते.

**चार्ट क्र. १७**

२०१२ ते २०१४ अवांतर वाचनसाहित्य खरेदी संख्या



वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, मागील दोन वर्षात सर्वच महाविद्यालयातील ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्याची खरेदी ही **अंदाजे ग्रंथवाढीच्या तुलनेत** २०१२-१३ मध्ये **०४%** आहे. तर २०१३-१४ मध्ये **०३%** आहे.

५.७ ग्रंथालयात दिवाळी अंकांची खरेदी केली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २८**

दिवाळी अंकांची खरेदी

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **००%** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, संशोधनास घेतलेल्या कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात दिवाळी अंकांची खरेदी केली जात नाही असे दिसून आले.

शैक्षणिक ग्रंथालयात शैक्षणिक साहित्याला जास्त महत्व दिले जात असल्यामुळे दिवाळी अंकासारख्या वाचनसाहित्याला महत्व दिले जात नाही. त्यामुळे शैक्षणिक ग्रंथालयात दिवाळी अंकाची खरेदी केली जात नसावी असे संशोधकास वाटते.

५.८ भविष्यात अधिक प्रमाणात अवांतर वाचनसाहित्य खरेदी करण्याचा विचार आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. २९**

भविष्यात अवांतर वाचनसाहित्य खरेदी


| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | ८२% | १८% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयापैकी ९ ग्रंथालयातून भविष्यात अवांतर वाचनसाहित्य खरेदीचा विचार आहे असा प्रतिसाद मिळाला. परंतु २ ग्रंथालयातून भविष्यात अवांतर वाचनसाहित्य खरेदीचा विचार नाही असा प्रतिसाद मिळाला.

सध्यस्थितीला ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्याची कमतरता असली तरी भविष्यात अवांतर वाचनसाहित्याची खरेदी करण्याचा जास्तीत जास्त ग्रंथालयांचा विचार आहे. ही ग्रंथालय तसेच वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

**चार्ट क्र. १८**

अवांतर वाचनसाहित्य खरेदीचा मानस




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण महाविद्यालयातील ८२% ग्रंथालयात भविष्यात अवांतर वाचनसाहित्य खरेदीचा विचार आहे. तर १८% ग्रंथालयातून भविष्यात अवांतर वाचनसाहित्य खरेदीचा विचार नाही.

**६. अवांतर वाचन साहित्याच्या प्रसारासाठी उपक्रम :**

६.१ एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३०**

भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, १००% महाविद्यालयाच्या ग्रंथपालांना एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य आहे असे वाटते. ही संकल्पना अत्यंत चांगली असून सर्वांनी ती अमलात आणावी असे संशोधकास वाटते.

एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे ही पारंपारिक गोष्टींना छेद देणारी तसेच वाचनसंकृती वाढविण्याच्या दृष्टीने चांगली बाब आहे. समाजात अशा नवीन गोष्टी समाविष्ट करण्याची अनेकांची इच्छा असते. या गोष्टींना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे तरच पुस्तकांबद्दल समाजात जनजागृती होऊ शकते.

६.२ एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट दिले का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३१**

भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट दिले


| **अ.न.** | **महाविद्यालय** | **पुस्तक भेट दिले** | **पुस्तक भेट दिले नाही** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | ६४% | ३६% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथपालांपैकी ७ ग्रंथपालांनी म्हणजे ६४% ग्रंथपालांनी एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट दिले आहे. परंतु ४ ग्रंथपालांनी ३६% ग्रंथपालांनी एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट दिले नाही.

**चार्ट क्र. १९**

भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे आणि प्रत्यक्ष कृती




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, सर्वच महाविद्यालयांच्या ग्रंथपालांना म्हणजे १००% ग्रंथपालांना एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटते. परंतु ६४% ग्रंथपालांनी भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट दिले. परंतु ३६% ग्रंथपालांनी भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट दिले नाही.

६.३ महाविद्यालयातील किंवा स्वत:च्या मुलांना अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती देता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३२**

मुलांना अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १0 | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१00%** | **00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाचे ग्रंथपाल म्हणजे १00% ग्रंथपाल महाविद्यालयातील किंवा स्वत:च्या मुलांना अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती देतात. ही ग्रंथालयातील विद्यार्थी आणि ग्रंथपालांच्या स्वत:च्या मुलांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

६.४ महाविद्यालयातील किंवा स्वत:च्या मुलाने चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे यासाठी प्रोत्साहन देता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३३**

चांगले वाचक, साहित्यिक, लेखक यासाठी प्रोत्साहन

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | १००% | ००% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथपाल म्हणजे १००% ग्रंथपाल महाविद्यालयातील किंवा स्वत:ची मुले चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे यासाठी प्रोत्साहन दिले जाते. ही ग्रंथालयातील विद्यार्थी आणि ग्रंथपालांच्या स्वत:च्या मुलांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

प्रत्येक महाविद्यालयाचे संस्थापक आणि शिक्षक आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपेक्षा चांगल्या पध्दतीने शिक्षण तसेच विविध सेवा-सुविधा देण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. त्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.

प्रत्येक पालक आपल्या मुलाला समाजातील इतर मुलांपेक्षा वेगळे बनविण्याचा प्रयत्न करीत असतात. इतरांपेक्षा त्यांने काहीतरी वेगळे बनावे किंवा वेगळे काहीतरी करून

दाखवावे यासाठी प्रोत्साहन देत असतात. ग्रंथपाल स्वत:च्या मुलाने चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे यासाठी प्रोत्साहन देतात ही बाब चांगली आहे.

६.५ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याचे लेखन किंवा काव्य प्रकाशित झाले आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३४**

लेखन किंवा काव्य प्रकाशन

| **अ.न.** | **महाविद्यालय** | **होय** | **नाही** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १0 | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **0९%** | **९१%** |


वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील विद्यार्थ्यांपैकी फक्त **SIOM** या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे लेखन आणि काव्य प्रकाशित झालेले आहे. ९१% महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे लेखन किंवा काव्य प्रकाशित झालेले नाही.

महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे लेखन किंवा काव्य प्रकाशित झाले पाहिजे यासाठी महाविद्यालयातील शिक्षक तसेच ग्रंथपाल यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले

पाहिजे. त्याचबरोबर त्यासाठी आवश्यक ते वाचनसाहित्य ग्रंथालयात उपलब्ध करून दिले पाहिजे असे संशोधकास वाटते.

**चार्ट क्र. २०**

लेखन किंवा काव्य प्रकाशन




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांपैकी ९% महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या लेखन किंवा काव्य प्रकाशित झाले आहे. तर ९१% महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या लेखन किंवा काव्य प्रकाशित झालेले नाही.

महाविद्यालयाचे वार्षीक निघते त्यामध्ये काही विद्यार्थ्यांचे लेख तसेच काव्य प्रकाशित होत असते. परंतु राज्यस्तरावर किंवा राष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांनी आपले नाव कमवावे यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लेख किंवा काव्य लिहीण्यासाठी साहित्य उपलब्ध करून द्यावे. तसेच ते साहित्य प्रकाशित करण्यासाठी महाविद्यालय किंवा ग्रंथालय यांनी प्रोत्साहन आणि सहकार्य करावे असे संशोधकास वाटते.

६.६ ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शन भरविले जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. ३५

ग्रंथप्रदर्शनाविषयी


| अ.न. | महाविद्यालय | नियमित | कधीतरी | कधीच नाही |
|---|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ | × |
| २ | SIOM | √ | × | × |
| ३ | SCOE | × | √ | × |
| ४ | SCOA | × | √ | × |
| ५ | SCOP | × | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × | × |
| ७ | SCOS | × | × | √ |
| ८ | SLC | × | √ | × |
| ९ | SDCH | × | √ | × |
| १० | SKNSSBM | × | √ | × |
| ११ | NBN | × | × | √ |
| | टक्केवारी | १८% | ६४% | १८% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयापैकी २ ग्रंथालयामध्ये नियमित ग्रंथप्रदर्शन भरविले जाते. ७ ग्रंथालयामध्ये कधीतरी ग्रंथप्रदर्शन भरविले जाते. २ ग्रंथालयामध्ये कधीच ग्रंथप्रदर्शन भरविले जात नाही.

ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शन भरविल्यामुळे वाचकांना नवनवीन ग्रंथाची माहिती मिळते. बाजारात आलेल्या नवनवीन ग्रंथांची वाचकांना ओळख होते. त्यामधून वाचकाला हवे असलेले वाचनसाहित्य वाचक खरेदी करू शकतो. तसेच ग्रंथालयात असे वाचनसाहित्य असावे अशी शिफारस करू शकतो. त्यामुळे ग्रंथप्रदर्शन भरविणे ही ग्रंथालय आणि वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब असते. म्हणून प्रत्येक ग्रंथालयात नियमित ग्रंथप्रदर्शन भरविले पाहिजे असे संशोधकास वाटते.

**चार्ट क्र. २१**

ग्रंथप्रदर्शन




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी १८% ग्रंथालयात नियमित ग्रंथप्रदर्शन भरविले जाते. तर ६४% ग्रंथालयात कधीतरी प्रदर्शन भरविले जाते. तसेच १८% ग्रंथालयात कधीच ग्रंथप्रदर्शन भरविले जात नाही.

६.७ ग्रंथालयात अवांतर साहित्य वाचनासाठी ग्रंथपेढीची सुविधा आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३६**

ग्रंथपेढीची सुविधा

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **00%** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये म्हणजे १00% अवांतर वाचनसाहित्य वाचनासाठी ग्रंथपेढीची सुविधा उपलब्ध नाही. सर्वच ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य वाचनासाठी ग्रंथपेढीची सोय करावी असे संशोधकास वाटते.

ग्रंथालयात ग्रंथपेढीची सुविधा असणे ही वाचकांसाठी अवांतर वाचनसाहित्य मिळण्याचे हक्काचे ठिकाण असते. ग्रंथालयात ग्रंथपेढीची सुविधा उपलब्ध करून दिली जात असल्यास त्यासाठी आवश्यक फर्निचर साहित्य तसेच ग्रंथसंग्रहाला शासनाकडून निधी मिळू शकतो. अशा शासकीय निधीचा ग्रंथालयांनी उपयोग करून घेऊन ग्रंथालयाचा संग्रह वाढविल्यास त्याचा ग्रंथालयाला तसेच वाचकांनाही फायदा होऊ शकतो.

६.८ अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवा दिली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३७**

आंतरग्रंथालय देवघेव सेवा


| **अ.न.** | **महाविद्यालय** | **होय** | **नाही** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये म्हणजे १००% ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवा दिली जाते.

कोणतेही ग्रंथालय हे परिपूर्ण असू शकत नाही. त्यास इतर ग्रंथालयाचा आधार घ्यावा लागतो. आंतरग्रंथालय देवघेव सेवा असल्यामुळे आपल्या ग्रंथालयात उपलब्ध नसलेल्या ग्रंथांची इतर ग्रंथालयातून देवघेव करता येते. तसेच विविध ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहाचा फायदा मिळविता येतो. आपल्या ग्रंथालयात आलेला कोणताही वाचक त्याला वाचनसाहित्य मिळाले नाही म्हणून परत जाऊ शकत नाही. यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवा ग्रंथालयात असणे ही ग्रंथालय आणि वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

**चार्ट क्र. २२**



वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १00% ग्रंथालयात आंतरग्रंथालय देवघेव सेवा उपलब्ध आहे. परंतु कोणत्याही ग्रंथालयात म्हणजे १00% ग्रंथालयात ग्रंथपेढीची सुविधा उपलब्ध नाही.

६.९ अवांतर वाचन सुधारण्यासाठी ग्रंथालयामार्फत काही उपक्रम राबविले जातात का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३८**


ग्रंथालयामार्फत उपक्रम

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १0 | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **२७%** | **७३%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयांपैकी ३ ग्रंथालयात अवांतर वाचन सुधारण्यासाठी ग्रंथालयामार्फत काही उपक्रम राबविले जातात. परंतु ८ ग्रंथालयात अवांतर वाचन सुधारण्यासाठी ग्रंथालयामार्फत कोणतेही उपक्रम राबविले जात नाहीत.

ग्रंथालयात अवांतर वाचन सुधारण्यासाठी ग्रंथालयात कोणताही उपक्रम राबविणे ही गोष्ट वाचकांच्या दृष्टीने चांगली असते. प्रत्येक ग्रंथालयात कोणत्या ना कोणत्या प्रकारचे जे ग्रंथालयाचा वाचकवर्ग वाढवतील असे उपक्रम राबविले गेले पाहिजेत. यामध्ये हुशार विद्यार्थ्यांना अधिक पुस्तके घरी वाचण्यासाठी देणे, स्पर्धापरीक्षेसाठी लागणारी पुस्तकं तसेच नियतकालिके उपलब्ध करून देणे, इत्यादी उपक्रम ग्रंथालयात राबविले पाहिजेत असे संशोधकास वाटते.

**चार्ट क्र. २३**




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण महाविद्यालयाच्या ग्रंथालयापैकी २७% ग्रंथालयात अवांतर वाचन सुधारण्यासाठी ग्रंथालयामार्फत काही उपक्रम राबविले जातात. परंतु ७३% ग्रंथालयात अवांतर वाचन सुधारण्यासाठी ग्रंथालयामार्फत काहीही उपक्रम राबविले जात नाहीत.

प्रत्येक ग्रंथालयात आंतरग्रंथालय अवांतर वाचनसाहित्य सेवा हा ऐकमेव उपक्रम २७% ग्रंथालयात राबविला जातो.

६.१० सांघिक पुस्तक वाचन उपक्रम राबविला जातो का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ३९**

सांघिक पुस्तक वाचन उपक्रम

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **00%** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १00% ग्रंथालयात सांघिक पुस्तक वाचन उपक्रम राबविला जात नाही. ग्रंथालयात सांघिक पुस्तक वाचन उपक्रम राबविला गेला पाहिजे असे संशोधकास वाटते.

ग्रंथालयात सांघिक पुस्तक वाचन उपक्रम राबविणे हे वाचनसंस्कृती वाढविण्याच्या दृष्टीने चांगले असते. शक्यतो आध्यात्मिक वाचनसाहित्याचे वाचन सांघिक वाचन उपक्रमाच्या माध्यमातून केले जाते.

६.११ वृत्तपत्रे किंवा इतर माध्यमाव्दारे नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणा-या माहितीची साठवणूक केली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. ४०

नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहिती साठवणूक

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | १००% | ००% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयात वृत्तपत्रे किंवा इतर माध्यमाव्दारे नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणा-या माहितीची साठवणूक केली जाते. ही ग्रंथालय तसेच वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

वृत्तपत्रे किंवा इतर माध्यमाव्दारे नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणा-या माहितीची साठवणूक केल्यामुळे वाचकांना कोणकोणत्या प्रकाराची, विषयाची, लेखकांची, प्रकाशनांची पुस्तके बाजारात आली आहेत यांची माहिती मिळण्यास मदत होते. तसेच अशी प्रकाशित माहिती विषयवार कात्रण स्वरूपात ठेवली जात असल्यास त्याचा पर्यायी ग्रंथ म्हणून ग्रंथालयास उपयोग होऊ शकतो.

६.१२ होय असल्यास कोणत्या स्वरूपात ती विद्यार्थी किंवा वाचकांपर्यंत पोहोचविता असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४१**

नवीन पुस्तकांबद्दल माहिती साठवणूक स्वरूप

| अ.न. | महाविद्यालय | कात्रण | यादी |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयात वृत्तपत्रे किंवा इतर माध्यमाव्दारे नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणा-या माहितीची साठवणूक कात्रण स्वरूपात केली जाते. कोणत्याही ग्रंथालयात यादीच्या स्वरूपात माहितीची साठवणूक केली जात नाही.

वृत्तपत्र कात्रणांपासून तयार केलेला संग्रह हा कात्रणप्रकल्प म्हणून ओळखला जातो. कात्रणप्रकल्प हे ग्रंथालयातील पर्यायी ग्रंथ असतात. वाचकांना नवीन तसेच अधिक माहितीसाठी या पर्यायी ग्रंथांचा चांगला उपयोग होतो. असे कात्रणप्रकल्प ग्रंथालय आणि माहिती शास्त्राच्या अभ्यासक्रमाचा एक भाग आहेत.

## ७. सेवा-सुविधा :

७.१ अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना घरी वाचनासाठी दिले जाते का? आणि किती मुदतीसाठी दिले जाते असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४२**

पुस्तक संख्या आणि मुदत

| अ.न. | महाविद्यालय | पुस्तक संख्या | मुदत |
|---|---|---|---|
| १ | SVCP | १ | १५ दिवस |
| २ | SIOM | १ | १५ दिवस |
| ३ | SCOE | १ | १५ दिवस |
| ४ | SCOA | १ | १५ दिवस |
| ५ | SCOP | १ | १५ दिवस |
| ६ | SKNCOE | १ | १५ दिवस |
| ७ | SCOS | १ | १५ दिवस |
| ८ | SLC | १ | १५ दिवस |
| ९ | SDCH | १ | १५ दिवस |
| १0 | SKNSSBM | १ | १५ दिवस |
| ११ | NBN | १ | १५ दिवस |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना अवांतर वाचनसाहित्याचे १ पुस्तक १५ दिवसासांठी घरी वाचनासाठी दिले जाते.

अभ्यासक्रमावर आधारित ४ ते ५ पुस्तकं १५ दिवस घरी वाचण्यासाठी दिली जातात. ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना घरी वाचण्यासाठी अवांतर वाचनसाहित्याचे १ पुस्तक १५ दिवसांसाठी दिले जाते. अवांतर वाचनसाहित्य संग्रह संख्येचा विचार करता ही बाब योग्य आहे असे वाटते. परंतु अवांतर वाचनसाहित्य संग्रहामध्ये वाढ करून १ पेक्षा अधिक पुस्तक देण्याची सोय करावी असे संशोधकास वाटते.

७.२ वाचकाना विलंबशुल्क आकारले जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४३**

विलंब शुल्क आकारणी

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १0 | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१00%** | **00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १00% ग्रंथालयात पुस्तक देण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क आकारले जाते.

वाचकांनी ग्रंथालयातून घेतलेले पुस्तक वेळेत परत करावे तसेच दुस-या वाचकांना पुस्तक वेळेत मिळावे हा दृष्टीकोन ठेऊन वाचकांना शिस्त लावण्यासाठी केलेला विलंब शुल्क हा नियम योग्य आहे.

७.३ वाचकांना ग्रंथसंग्रहात प्रवेश कोणत्या प्रकारे दिला जातो असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४४**

ग्रंथसंग्रहात प्रवेश

| अ.न. | महाविद्यालय | मुक्त प्रवेश | बंदिस्त |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयात वाचकांना मुक्त प्रवेश दिला जातो. ही बाब वाचकांच्या दृष्टीने चांगली आहे.

वाचकांना स्वत:ला हवे असलेले पुस्तक स्वत: शोधून घेण्यासाठी तसेच वाचकांना आवश्यक असलेल्या इतर ग्रंथांची माहिती होण्याच्या दृष्टीने वाचकांना ग्रंथसंग्रहात मुक्त प्रेवश देणेच योग्य आहे.

७.४ ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती वाचकांना कशाप्रकारे उपलब्ध करून दिली जाते असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. ४५

अवांतर आणि अध्ययन साहित्याची माहिती


| अ.न. | महाविद्यालय | तालिके मार्फत | ग्रंथप्रदर्शन | ग्रंथालय कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × | √ |
| २ | SIOM | √ | √ | × |
| ३ | SCOE | √ | × | √ |
| ४ | SCOA | × | × | √ |
| ५ | SCOP | √ | × | √ |
| ६ | SKNCOE | √ | × | √ |
| ७ | SCOS | × | × | √ |
| ८ | SLC | × | × | √ |
| ९ | SDCH | √ | × | √ |
| १० | SKNSSBM | √ | × | √ |
| ११ | NBN | √ | × | √ |
| | टक्केवारी | ७३% | ०९% | ९१% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात तालिकेमार्फत, ग्रंथप्रदर्शन, ग्रंथालय कर्मचारी यामाध्यमातून वाचकांना अवांतर आणि अध्ययन वाचनसाहित्याची माहिती दिली जाते. परंतु एकुण ग्रंथालयांच्या तुलनेत ८ ग्रंथालयात तालिकेमार्फत माहिती दिली जाते. तर १ ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनातून माहिती दिली जाते. १० ग्रंथालयात ग्रंथालय कर्मचा-यांमार्फत माहिती दिली जाते.

ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती विद्यार्थी वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तालिका, ग्रंथप्रदर्शन, ग्रंथालय कर्मचारी याचबरोबर इतरही माध्यमांचा वापर करावा. यासाठी विविध उपक्रम राबवून त्याच्या माध्यमातून ग्रंथालयातील वाचनसाहित्याची माहिती वाचकांपर्यंत पोहोचविले जाऊ शकते असे संशोधकास वाटते.

**चार्ट क्र. २४**

अवांतर आणि अध्ययन साहित्याची माहिती




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण ग्रंथालयांच्या तुलनेत ८ ग्रंथालयात म्हणजे ७३% ग्रंथालयात तालिकेमार्फत माहिती दिली जाते. तर १ ग्रंथालयात म्हणजे ९% ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनातून माहिती दिली जाते. १० ग्रंथालयात म्हणजे ९१% ग्रंथालयात ग्रंथालय कर्मचा-यांमार्फत माहिती दिली जाते.

सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयांत वाचकांना अवांतर आणि अध्ययन वाचनसाहित्याची जास्तीत जास्त माहिती ग्रंथालय कर्मचारी आणि तालिके यामार्फतच दिली जाते. ग्रंथप्रदर्शनामार्फत माहिती देण्याचे प्रमाण अगदीच थोडके आहे.

७.५ ग्रंथालयातील वाचकवर्गाकडून अवांतर वाचनसाहित्याची मागणी होते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. ४६

अवांतर वाचनसाहित्याची मागणी

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १0 | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | १00% | 00% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १00% ग्रंथालयात वाचकवर्गाकडून अवांतर वाचनसाहित्याची मागणी होते. ही बाब ग्रंथालयामध्ये अवांतर वाचनसाहित्य वाढविण्याच्या दृष्टीने विचार करायला लावणारी आहे.

ग्रंथालयाचा कोणताही प्रकार असला तरी त्यामध्ये येणारा वाचकवर्ग हा वेगवेगळा असतो. वाचकाला हवे असणारे वाचनसाहित्य सर्वच ग्रंथालयात उपलब्ध असते असे नाही. वाचकवर्ग हा त्याला हवे असलेल्या तसेच त्याला आवडणा-या वाचनसाहित्याची मागणी करीत असतो. वाचकांच्या सततच्या मागणीचा विचार करून ग्रंथालयांनी त्याप्रकारचा वाचनसंग्रह ग्रंथालयात ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे संशोधकास वाटते.

७.६ ठराविक वाचनसाहित्याविषयी वाचकवर्गाकडून शिफारस केली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४७**

ठराविक वाचनसाहित्याची शिफारस

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १0 | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | १00% | 00% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १00% वाचकवर्गाकडून ठराविक वाचनसाहित्याविषयी शिफारस केली जाते. ही ग्रंथालयातील अवांतर तसेच इतर वाचनसाहित्यामध्ये भर घालणारी असून ग्रंथालय तसेच वाचकांसाठी चांगली बाब आहे.

प्रत्येक वाचकाच्या शिफारशीनुसार वाचनसाहित्य ग्रंथालयात घेणे शक्य नसते. परंतु वाचकाच्या शिफारशीनुसार वाचनसाहित्य घेण्याचे ठरविल्यास ग्रंथालयात विविध प्रकारचा वाचनसाहित्य संग्रह निर्माण होऊ शकतो.

## ८. ग्रंथालय अदांजपत्रक :

८.१ ग्रंथालय अंदाजपत्रकात अवांतर वाचनसाहित्यासाठी खास निधी राखून ठेवला जातो का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४८**

अवांतर वाचनसाहित्यासाठी निधी

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **००%** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील म्हणजे १००% ग्रंथालयातील अंदाजपत्रकात अवांतर वाचनसाहित्यासाठी खास निधी राखून ठेवला जात नाही.

प्रत्येक ग्रंथालयाच्या अंदाजपत्रकात अवांतर वाचनसाहित्यासाठी खास निधी राखून ठेवला गेला पाहिजे असे संशोधकास वाटते.

## ९. ग्रंथालय इंटरनेट :

९.१ ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ४९**

इंटरनेट सेवा

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | १००% | ००% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविली जाते.

सध्याच्या संगणकाच्या युगात प्रत्येक ग्रंथालयात इंटरनेट असणे आवश्यक झालेले आहे. इंटरनेटच्या साहाय्यामुळे ग्रंथांलयीन कामकाजाला हातभार लावण्यास मदत होऊ शकते. तसेच ग्रंथालयात नवीन आलेल्या ग्रंथसंग्रहाबद्दल वाचकांना ई-मेलच्या माध्यमातून माहिती देण्यासाठी इंटरनेटचा वापर करता येतो.

९.२ ग्रंथालय / महाविद्यालय परीसरात Wi- Fi सुविधा आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ५०**

वाय-फाय सेवा

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | टक्केवारी | १००% | ००% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयात वाय-फाय सेवा पुरविली जाते.

अलिकडच्या काळात विद्यार्थ्यांकडे लॅपटॉप तसेच विविध ॲप्स असलेले मोबाईल असतात. यावर इंटरनेट चालविता येत असल्यामुळे त्यांना वाय-फाय सुविधेची आवश्यकता असते. वाय-फाय सुविधेमुळे विद्यार्थी महाविद्यालय किंवा ग्रंथालयाच्या परिसरात बसून इंटरनेटचा वापर करू शकतो.

९.३ ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ५१**

इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **००%** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध नाही.

सध्याच्या संगणकाच्या युगात प्रत्येक ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्याचा संग्रह असतोच. परंतु अवांतर वाचनसाहित्याच्या कित्येक प्रकारांमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात माहिती प्रकाशित केली जात नाही. त्यामुळे ग्रंथालयांत असा संग्रह असणे बहुतांश संभव नसावे.

९.४ इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्याची देवघेव केली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ५२**

इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्याची देवघेव

| **अ.न.** | **महाविद्यालय** | **होय** | **नाही** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **00%** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १00% ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्याची देवघेव केली जात नाही.

संशोधनासाठी घेतलेल्या कोणत्याही ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध नसल्यामुळे अशा प्रकारच्या साहित्याची देवघेव केली जात नाही.

९.५ ग्रंथालयाचे संकेतस्थळ आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

## तक्ता क्र. ५३

ग्रंथालयाचे संकेतस्थळ

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | टक्केवारी | ००% | १००% |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयाचे स्वत:चे असे संकेतस्थळ उपलब्ध नाही.

अभ्यासाकरिता घेतलेली सर्वच ग्रंथालये महाविद्यालय तसेच मातृसंस्थेच्या संकेतस्थळाचा वापर करत असल्याचे दिसून आले. ग्रंथालयांचे स्वत:चे असे संकेतस्थळ उपलब्ध नसल्यामुळे वाचकांना हवे असलेल्या पुस्तकाविषयी माहिती ग्रंथालयात न येता मिळविता येत नाही. त्यास ग्रंथालयात जाऊनच पुस्तकांविषयी माहिती मिळवावी लागते. त्यामुळे प्रत्येक ग्रंथालयाने स्वत:चे संकेतस्थळ निर्माण करून त्याचा ग्रंथालयात असलेल्या ग्रंथसंग्रहाची वाचकांना माहिती देण्यासाठी वापर करावा असे संशोधकास वाटते.

९.६ होय असल्यास उपलब्ध अवांतर वाचनसाहित्याची माहिती संकेतस्थळावरून दिली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ५४**

संकेतस्थळावरून अवांतर वाचनसाहित्याची माहिती

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १0 | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **00%** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचे म्हणजे १00% ग्रंथालयांचे स्वत:चे असे संकेतस्थळ उपलब्ध नाही. त्यामुळे अवांतर वाचनसाहित्याची माहिती संकेतस्थळावरून दिली जात नाही.

प्रत्येक महाविद्यालयाच्या ग्रंथालयांने स्वत:चे संकेतस्थळ निर्माण करून ग्रंथालयात असलेल्या ग्रंथसंग्रहाची माहिती संकेतस्थळावर देण्याची व्यवस्था करावी असे संशोधकास वाटते.

९.७ ग्रंथालयात उपलब्ध असलेले वाचनसाहित्य ग्रंथालयाच्या संकेतस्थळावरून शोधता येते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ५५**

संकेतस्थळावरून वाचनसाहित्याचा शोध

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **००%** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयात संकेतस्थळ उपलब्ध नसल्यामुळे ग्रंथालयात उपलब्ध असलेले वाचनसाहित्य ग्रंथालयाच्या संकेतस्थळावरून शोधता येत नाही.

९.८ ग्रंथालयाचा कॅटलॉग सर्वांसाठी उपलब्ध आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ५६**

ग्रंथालयाचा कॅटलॉग

| अ.न. | महाविद्यालय | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | SVCP | √ | × |
| २ | SIOM | √ | × |
| ३ | SCOE | √ | × |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | SCOA | √ | × |
| ५ | SCOP | √ | × |
| ६ | SKNCOE | √ | × |
| ७ | SCOS | √ | × |
| ८ | SLC | √ | × |
| ९ | SDCH | √ | × |
| १० | SKNSSBM | √ | × |
| ११ | NBN | √ | × |
| | **टक्केवारी** | **१००%** | **००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, सर्वच महाविद्यालयाच्या ग्रंथालयात म्हणजे १००% ग्रंथालयात ग्रंथसंग्रहाची माहिती कॅटलॉग स्वरूपात उपलब्ध आहे. ग्रंथालयाचा कॅटलॉग सर्वांसाठी उपलब्ध करून दिलेला आहे.

९.९ अवांतर वाचनसाहित्य जास्त प्रमाणात वापरले जावे याकरिता कोणत्या सोशल मिडियाचा वापर केला जातो असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

**तक्ता क्र. ५७**

सोशल मिडियाचा वापर

| **अ.न.** | **महाविद्यालय** | **होय** | **नाही** |
|---|---|---|---|
| १ | SVCP | × | √ |
| २ | SIOM | × | √ |
| ३ | SCOE | × | √ |
| ४ | SCOA | × | √ |
| ५ | SCOP | × | √ |
| ६ | SKNCOE | × | √ |
| ७ | SCOS | × | √ |
| ८ | SLC | × | √ |
| ९ | SDCH | × | √ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | SKNSSBM | × | √ |
| ११ | NBN | × | √ |
| | **टक्केवारी** | **00%** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, कोणत्याही महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून म्हणजे १00% ग्रंथालयातून या प्रश्नाला प्रतिसाद मिळाला नाही. यावरून असे लक्षात येते की, कोणत्याही ग्रंथालयात सोशल मिडियाचा वापर केला जात नाही.

सध्याच्या काळात सोशल मिडिया हा प्रत्येक क्षेत्रात तसेच आपल्या खाजगी जीवनातही अविभाज्य घटक बनत चालला आहे. असे असूनसुध्दा कोणतेही ग्रंथालय सोशल मिडियाचा वापर करत नाही.

संशोधकाने संशोधनासाठी घेतलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयातून प्रश्नावलीच्या माध्यमातून डाटा स्वरूपात मिळविलेल्या माहितीचे तक्ते आणि चार्टच्या आधारे विश्लेषण केलेले आहे. तसेच आवश्यकतेनुसार विशिष्ट तक्त्यांमध्ये टक्केवारी दर्शविली आहे.

## ४.२ वाचक प्रश्नावलीचे विश्लेषण आणि सादरीकरण

**प्रस्तावना :**

"सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास" या विषयावर संशोधन करण्याकरिता संशोधकाने वाचकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी प्रश्नावली या माध्यमाचा वापर करून त्याव्दारे वाचकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

सदर संशोधनासाठी घेतलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयाचा वाचकवर्ग हा मोठया प्रमाणात असल्यामुळे संशोधकाने नमुनादाखल प्रत्येक महाविद्यालयातील १0 विद्यार्थ्यांना याप्रमाणे ११0 प्रश्नावलीचे वितरण केले त्यास १00% प्रतिसाद मिळाला.

संकलित केलेली माहिती डेटा स्वरूपात उपलब्ध झाली. त्या माहितीचे सादरीकरण करण्यासाठी माहितीची योग्य चिकित्सा करून साचेबध्द तपशिलाच्या स्वरूपात विश्लेषण आणि सादरीकरण केलेले आहे.

१. आपणास अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १**


अवांतर वाचनसाहित्याची आवड

| **अ.नं.** | **तपशिल** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ८९ | ८१% |
| २ | नाही | २१ | १९% |
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे असे सांगणा-या विद्यार्थ्यांची संख्या ८१% आहे. तर अवांतर वाचनसाहित्याची आवड नाही असे सांगणा-या विद्यार्थ्यांची संख्या १९% आहे.

**चार्ट क्र. १**

अवांतर वाचनसाहित्याची आवड




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण विद्यार्थ्यांपैकी अवांतर वाचनसाहित्याची आवड असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. तर अवांतर वाचनसाहित्याची आवड नसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे असे यावरून दिसून येते.

१.२ आपला स्वत:चा वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २**

वैयक्तिक अवांतर साहित्य संग्रह

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १७ | १५% |
| २ | नाही | ९३ | ८५% |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी स्वत:चा वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १५% आहे. तर स्वत:चा वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह नसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ८५% आहे.

१.३ आपल्या शिकत असलेल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे काय असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ३**

ग्रंथालयात अवांतर साहित्य आहे का


| **अ.नं.** | **तपशिल** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ४७ | ४३% |
| २ | नाही | २४ | २२% |
| ३ | माहीत नाही | ३९ | ३५% |
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी महाविद्यालयांच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे असे सांगितलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४७ आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य नाही असे सांगितलेल्या विद्यार्थ्यांची संख्या २४ आहे. तर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे किंवा नाही हेच माहित नसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३९ आहे.

ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे किंवा नाही हे माहीत नसलेल्या विद्यार्थ्यांनी एकतर ग्रंथालयाचा वापर केलेला नसावा किंवा त्यांनी ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य मिळते किंवा नाही याविषयी माहिती घेतलेली नाही.

**चार्ट क्र. २**

ग्रंथालयात अवांतर साहित्य




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे असे सांगितलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४३% आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य नाही असे सांगितलेल्या विद्यार्थ्यांची संख्या २२% आहे. तर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे किंवा नाही हेच माहित नसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३५% आहे.

१.४ आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे वाटते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ४**

ग्रंथालयात अवांतर साहित्य असावे

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११0 | १00% |
| २ | नाही | - | - |
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे सर्वच म्हणजे १००% विद्यार्थ्यांना वाटते.

१.५ आपणास हवे असलेले अवांतर वाचनसाहित्य आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात मिळते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ५**


हवे असलेले साहित्य मिळते

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३२ | २९% |
| २ | नाही | ७८ | ७१% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात त्यांना हवे असलेले अवांतर वाचनसाहित्य मिळते असे २९% विद्यार्थ्यांचे मत आहे. त्यांना हवे असलेले अवांतर वाचनसाहित्य मिळत नाही असे ७१% विद्यार्थ्यांचे मत आहे.

**चार्ट क्र. ३**

हवे असलेले साहित्य मिळते



वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून की, ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य संग्रह पुरेशा प्रमाणात उपलब्ध असला तरी विविध प्रकारचा आणि मुबलक प्रमाणात नाही.

१.६ कोणत्या भाषेतील अवांतर वाचनसाहित्य वाचण्यास आवडते असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ६**


भाषेतील साहित्य वाचण्यास आवडते

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठी | ५६ | ५१% |
| २ | हिंदी | १२ | ११% |
| ३ | इंग्रजी | ४२ | ३८% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी मराठी भाषेतील वाचनसाहित्याची आवड असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ५६ आहे. हिंदी भाषेतील वाचनसाहित्याची आवड असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १२ आहे. तर इंग्रजी भाषेतील वाचनसाहित्याची आवड असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४२ आहे.

**चार्ट क्र. ४**

भाषेतील साहित्य वाचण्यास आवडते



वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ५१% विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य वाचण्यास आवडते. ११% विद्यार्थ्यांना हिंदी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य वाचण्यास आवडते. तर ३८% विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य वाचण्यास आवडते.

१.७ खालीलपैकी कोणत्या प्रकारचे वाचनसाहित्य जास्त प्रमाणात आवडते असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ७**

कोणते वाचनसाहित्य जास्त आवडते


| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कथासंग्रह | २९ | २६% |
| २ | कादंबरी | ६३ | ५७% |
| ३ | काव्यसंग्रह | १९ | १७% |
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थ्यांना कथासंग्रह हा वाचनसाहित्य प्रकार जास्त आवडतो. कादंबरी हा वाचनसाहित्य प्रकार आवडणा-यांची संख्या ६३ आहे. तर काव्यसंग्रह हा वाचनसाहित्य प्रकार १९ विद्यार्थ्यांना जास्त आवडतो.

प्रत्येकाची आवड वेगवेगळी असू शकते. मोकळा असलेला वेळ घालविण्यासाठी किंवा मनोरंजन म्हणून माणुस जेव्हा पुस्तक हाती घेतो त्यावेळी त्याच्या हातात एखादी कादंबरी किंवा एखादा कथासंग्रह पाहायला मिळतो. शक्यतो काव्यसंग्रहाचे वाचन करीत असलेल्या व्यक्ती फारच कमी प्रमाणात दिसून येतात.

**चार्ट क्र.५**

जास्त आवडणारा साहित्य प्रकार




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून येते की, एकुण विद्यार्थ्यांपैकी २६% विद्यार्थ्यांना कथासंग्रह हा वाचनसाहित्य प्रकार जास्त आवडतो. कादंबरी हा वाचनसाहित्य प्रकार आवडणा-यांची संख्या ५७% आहे. तर काव्यसंग्रह हा वाचनसाहित्य प्रकार १७% विद्यार्थ्यांना जास्त आवडतो.

१.८ आदर्श असलेल्या व्यक्तींची चरित्रे किंवा आत्मचिरित्रे वाचली आहेत का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ८**

चरित्रे / आत्मचरित्रे वाचली

| **अ.नं.** | **तपशिल** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ११ | १०% |
| २ | नाही | ९९ | ९०% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी १०% विद्यार्थ्यांनी आदर्श असलेल्या व्यक्तींची चरित्र किंवा आत्मचरित्रे वाचली आहेत. तर ९०% विद्यार्थ्यांनी आदर्श असलेल्या व्यक्तींची चरित्र किंवा आत्मचरित्रे वाचलेली नाहीत.

१.९ संशोधनपर वाचनसाहित्याचा वापर केला आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ९**

संशोधनपर साहित्याचा वापर

| **अ.नं.** | **तपशिल** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | ११% |
| २ | नाही | ९८ | ८९% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ११% विद्यार्थ्यांनी संशोधनपर साहित्याचा वापर केला आहे. तर ८९% विद्यार्थ्यांनी संशोधनपर साहित्याचा वापर केला नाही.

१.१० स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १०**

स्पर्धात्मक किंवा चालू घडामोडीवरील साहित्याची आवड

| **अ.नं.** | **तपशिल** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ९२ | ८४% |
| २ | नाही | १८ | १८% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ८४% विद्यार्थ्यांना स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड आहे. तर १८% विद्यार्थ्यांना स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड नाही.

१.११ काव्यसंग्रहाचे वाचन करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ११**

काव्यसंग्रहाचे वाचन

| **अ.नं.** | **तपशिल** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | २३ | २१% |
| २ | नाही | ८७ | ७९% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी २१% विद्यार्थ्यांनी काव्यसंग्रहाचे वाचन केले आहे. तर ७९% विद्यार्थ्यांनी काव्यसंग्रहाचे वाचन केलेले नाही.

१.१२ आध्यात्मिक साहित्याचे वाचन करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १२**

आध्यात्मिक साहित्य वाचन

| **अ.नं.** | **तपशिल** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | ०७ | ०६% |
| २ | नाही | १०३ | ९४% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ०६% विद्यार्थ्यी आध्यात्मिक साहित्याचे वाचन करतात. तर ९४% विद्यार्थ्यी आध्यात्मिक साहित्याचे वाचन करीत नाहीत.

१.१३ अवांतर वाचनसाहित्य खरेदी करून वाचता का ग्रंथालयातून घेऊन वाचता असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १३**

वाचनसाहित्य खरेदी करून/ग्रंथालयातून घेऊन वाचता


| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | खरेदी करून | १७ | १५% |
| २ | ग्रंथालयातून घेऊन | ९३ | ८५% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्य खरेदी करून वाचतात. तर ९३ विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून घेऊन वाचतात.

सध्याच्या काळात पुस्तकांच्या किमती फारच वाढलेल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना आपली वाचनाची आवड जोपासण्यासाठी किंवा मनोरंजनासाठी म्हणून पुस्तक विकत घेऊन वाचणे परवडत नाही. त्यासाठी ग्रंथालय हाच पर्याय उपलब्ध असल्यामुळे वाचक पुस्तक विकत घेऊन वाचण्यापेक्षा ग्रंथालयातून घेणे जास्त पसंत करतात.

**चार्ट क्र. ६**

वाचनसाहित्य खरेदी करून/ग्रंथालयातून घेऊन वाचता




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी १५% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्य खरेदी करून वाचतात. तर ८५% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून घेऊन वाचतात.

१.१४ एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १४**

भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १०७ | ९७% |
| २ | नाही | ०३ | ०३% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ९७% विद्यार्थ्यांना एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटते. तर ०३% विद्यार्थ्यांना एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटत नाही.

१.१५ अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती कशी मिळविता असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १५**


अवांतर वाचनसाहित्याची माहिती कशी मिळविता

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रंथालय | ६४ | ५८% |
| २ | मित्राकडून | ०८ | ०७% |
| ३ | इंटरनेट | ३९ | ३५% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती ग्रंथालयातून मिळविणा-यां विद्यार्थ्यांची संख्या ६४ आहे. मित्राकडून माहिती मिळवित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ०८ आहे. तर इंटरनेट वरून माहिती मिळवित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३९ आहे.

**चार्ट क्र. ७**

अवांतर वाचनसाहित्याची माहिती कशी मिळविता



वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ५८% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती ग्रंथालयातून मिळवितात. ०७% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती मित्राकडून मिळवितात. तर ३५% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती इंटरनेट वरून मिळवितात.

१.१६ स्वत: चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे असे वाटते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १६**

वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे असे वाटते

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११० | १००% |
| २ | नाही | - | - |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी १००% विद्यार्थ्यांना स्वत: चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे असे वाटते.

१.१७ स्वत:चा एखादा लेख किंवा काव्य प्रकाशित झाले आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १७**

लेख किंवा काव्य प्रकाशित

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ०९ | ०८% |
| २ | नाही | १०१ | ९२% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ०८% विद्यार्थ्यांचा स्वत:चा एखादा लेख किंवा काव्य प्रकाशित झाला आहे. तर ९२% विद्यार्थ्यांचा स्वत:चा एखादा लेख किंवा काव्य प्रकाशित झाला नाही.

१.१८ अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून घरी वाचनासाठी मिळते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १८**

अवांतर वाचनसाहित्य घरी वाचनासाठी मिळते का

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १०७ | ९७% |
| २ | नाही | ०३ | ०३% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ९७% विद्यार्थ्यांच्या मते अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून घरी वाचनासाठी मिळते. तर ०३% विद्यार्थ्यांच्या मते अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून घरी वाचनासाठी मिळत नाही.

१.१९ ग्रंथ देण्यास विलंब झाल्यास विलंबशुल्क आकारले जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. १९**

विलंबशुल्क आकारले जाते का

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११० | १०० |
| २ | नाही | - | - |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी १००% विद्यार्थ्यांच्या मते ग्रंथ देण्यास विलंब झाल्यास विलंबशुल्क आकारले जाते.

१.२० आपणास ग्रंथसंग्रहात मुक्त प्रवेश दिला जातो का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २०**

ग्रंथसंग्रहात प्रवेश

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११० | १००% |
| २ | नाही | - | - |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी १००% विद्यार्थ्यांच्या मते ग्रंथसंग्रहात मुक्त प्रवेश दिला जातो.

१.२१ ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती आपणास कशाप्रकारे उपलब्ध करून दिली जाते असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २१**


अवांतर किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तालिकेमार्फत | २७ | २५% |
| २ | ग्रंथप्रदर्शन | ०९ | ०८% |
| ३ | ग्रंथालय कर्मचारी | ७४ | ६७% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी २७ विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती तालिकेमार्फत मिळते. ९ विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती ग्रंथप्रदर्शनातून मिळते. तर ७४ विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती ग्रंथालय कर्मचा-यांकडून मिळते.

**चार्ट क्र. ८**

अवांतर किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी २५% विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती तालिकेमार्फत मिळते. ०८% विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती ग्रंथप्रदर्शनातून मिळते. तर ६७% विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती ग्रंथालय कर्मचा-यांकडून मिळते.

१.२२ ग्रंथालयास वाचनसाहित्याची शिफारस करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २२**

वाचनसाहित्याची शिफारस

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९९ | ९0% |
| २ | नाही | ११ | १0% |
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ९0% विद्यार्थ्यी वाचनसाहित्याची शिफारस करतात. तर १0% विद्यार्थ्यी वाचनसाहित्याची शिफारस करीत नाहीत.

१.२३ अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवेचा वापर करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २३**

आंतरग्रंथालय देवघेव सेवेचा वापर

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १0५ | ९५% |
| २ | नाही | 0५ | 0५% |
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ९५% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवेचा वापर करतात. तर 0५% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवेचा वापर करीत नाहीत.

१.२४ वृत्तपत्रांमध्ये नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहिती जतन करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २४**

वृत्तपत्रांमधील पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहितीचे जतन

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | ११% |
| २ | नाही | ९८ | ८९% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ११% विद्यार्थ्यी वृत्तपत्रांमध्ये नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहिती जतन करतात. तर ८९% विद्यार्थ्यी वृत्तपत्रांमध्ये नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहिती जतन करीत नाहीत.

१.२५ वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द होणा-या लेखांचे किंवा काव्यसंग्रहांचे जतन करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २५**

लेखांचे किंवा काव्यसंग्रहांचे जतन

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २९ | २६% |
| २ | नाही | ८१ | ७४% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी २६% विद्यार्थ्यी वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द होणा-या लेखांचे किंवा काव्यसंग्रहांचे जतन करतात. तर

७४% विद्यार्थ्यी वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द होणा-या लेखांचे किंवा काव्यसंग्रहांचे जतन करीत नाहीत.

१.२६ ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविली जाते का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २६**

इंटरनेट सेवा

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११0 | १00% |
| २ | नाही | - | - |
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी १00% विद्यार्थ्यांच्या मते ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविली जाते.

१.२७ ग्रंथालय / महाविद्यालय परीसरात Wi- Fi सुविधा आहे का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २७**

Wi- Fi सुविधा

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ११0 | १00% |
| २ | नाही | - | - |
| | **एकुण** | **११0** | **१00%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी १००%
विद्यार्थ्यांच्या मते ग्रंथालय / महाविद्यालय परीसरात Wi- Fi सुविधा आहे.

१.२८ सोशल मिडियाचा वापर अवांतर वाचनसाहित्याची माहिती मिळविण्यासाठी करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २८**

सोशल मिडियाचा वापर

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १०३ | ९४% |
| २ | नाही | ०७ | ०६% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ९४% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्याची माहिती मिळविण्यासाठी सोशल मिडियाचा वापर करतात. तर ०६% विद्यार्थी अवांतर वाचनसाहित्याची माहिती मिळविण्यासाठी सोशल मिडियाचा वापर करीत नाहीत.

१.२९ मागील तीन महिन्यात तुम्ही किती अवांतर पुस्तके वाचली आहेत असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. २९**


मागील तीन महिन्यात किती अवांतर पुस्तके वाचली

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १० पुस्तकं | ९१ | ८३% |
| २ | १५ पुस्तकं | १४ | १३% |
| ३ | २० पुस्तकं | ०५ | ०४% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ९१ विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यात १० अवांतर पुस्तके वाचली आहेत. १४ विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यात १५ अवांतर पुस्तके वाचली आहेत. तर ०५ विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यात २० अवांतर पुस्तके वाचली आहेत.

**चार्ट क्र. ९**

मागील तीन महिन्यात किती अवांतर पुस्तके वाचली




वरील कोष्टकाचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ८३% विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यात १० अवांतर पुस्तके वाचली आहेत. १३% विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यात १५ अवांतर पुस्तके वाचली आहेत. तर ०४% विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यात २० अवांतर पुस्तके वाचली आहेत.

१.३० आठवडयातील किती दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवता असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ३०**

आठवडयातील किती दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवता

| अ.नं. | तपशिल | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ दिवस | १०४ | ९५% |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | २ दिवस | ०६ | ०५% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ९५% विद्यार्थ्यी आठवडयातील १ दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवतात. तर ०५% विद्यार्थ्यी आठवडयातील २ दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवतात.

१.३१ अवांतर वाचनासाठी ऑनलाईन ई-बुक्सचा वापर करता का असा प्रश्न विचारला असता पुढीलप्रमाणे प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ३१**

ऑनलाईन ई-बुक्सचा वापर

| **अ.नं.** | **तपशिल** | **प्रतिसाद** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | होय | १०० | ९१% |
| २ | नाही | १० | ०९% |
| | **एकुण** | **११०** | **१००%** |

वरील तक्त्याचा अभ्यास करता असे दिसून आले की, एकुण विद्यार्थ्यांपैकी ९१% विद्यार्थ्यी अवांतर वाचनासाठी ऑनलाईन ई-बुक्सचा वापर करतात. तर ०९% विद्यार्थ्यी अवांतर वाचनासाठी ऑनलाईन ई-बुक्सचा वापर करीत नाहीत.

ग्रंथालयात स्वतंत्र अशी ई-बुक्स लायब्ररी उपलब्ध नाही. परंतु विद्यार्थी इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन ई-बुक्सचा वापर करतात.

### ४.३ वाचकांच्या प्रतिक्रिया :

१. अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे परंतु अभ्यासामुळे वेळ मिळत नाही.

२. वेळ असेल त्यावेळी आपल्या आवडीचे पुस्तक ग्रंथालयात मिळेलच असे नाही त्यामुळे अवांतर वाचनाकडे दुर्लक्ष होते.

३. सध्याच्या धावपळीच्या जीवनात पुस्तक घेऊन तासंतास बसण्यासाठी वेळ मिळत नाही.

४. इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्य उपलब्ध असल्यामुळे छापील साहित्य सांभाळणे अवघड वाटते.

५. मराठी भाषेतील इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्य थोडयाच प्रमाणात उपलब्ध आहे.

६. इंटरनेट पुस्तक मिळत असल्यामुळे ग्रंथालयात जाऊन पुस्तक घेणे नकोसे वाटते.

७. नावाजलेल्या लेखकांची पुस्तके सहजासहजी मिळत नाहीत.

८. पुस्तकांच्या किमती वाढल्यामुळे विकत घेऊन वाचणे परवडत नाही.

९. मनोरंजनासाठी टिव्ही, इंटरनेट, मोबाईल असल्यामुळे पुस्तक वाचण्याकडे दुर्लक्ष होते.

१0. प्रवासात वेळ जाण्यासाठी पुस्तक वाचणे आवडते.

११. बहुतेक कादंब-यांमध्ये ठराविक साच्यातील आशय दिलेला असतो.

१२. स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना अवांतर वाचनसाहित्याचा लाभ होतो.

# प्रकरण ५ वे

# निष्कर्ष आणि शिफारशी

## ५.१ ग्रंथपाल प्रश्नावलीतील निष्कर्ष :

"सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास" या विषयावर संशोधन करण्याकरिता संशोधकाने प्रश्नावली या माध्यमाचा वापर करून त्याव्दारे **ग्रंथपालांच्या** प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

सदर संशोधनासाठी संशोधकाने ११ महाविद्यालयाच्या ग्रंथपालांना प्रश्नावलीचे वितरण केले त्यास १००% प्रतिसाद मिळाला. त्यावरून केलेल्या विश्लेषणातून पुढील निष्कर्ष काढून आवश्यकतेनुसार शिफारशी केलेल्या आहेत.

१. शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ ग्रंथालयांत ग्रंथालय कर्मचारी संख्या कामकाजाच्या दृष्टीने पुरेशी आहे.

२. १००% ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध आहे.

३. ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे १००% ग्रंथपालांना वाटते.

४. ११ पैकी ८ ग्रंथालयात मराठी आणि इंग्रजी या भाषा प्रकारातील अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध आहे. तसेच ३ ग्रंथालयात मराठी, इंग्रजी आणि हिंदी या भाषा प्रकारातील अंवातर वाचनसाहित्य उपलब्ध आहे.

५. १००% ग्रंथालयात इंग्रजी साहित्य जास्त प्रमाणात वाचले जाते. परंतु परदेशी साहित्यापेक्षा भारतीय साहित्याचा वापर जास्त प्रमाणात केला जातो.

६. १००% ग्रंथपालांना अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे. परंतु ११ पैकी एकाच ग्रंथपालाकडे वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह आहे.

७. कांदबरी हा प्रकार १००% ग्रंथपालांना जास्त प्रमाणात आवडतो.

८. १००% ग्रंथपाल अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती ग्रंथालय आणि इंटरनेटच्या माध्यमातून मिळवितात. परंतु ई-बुक्स पेक्षा छापील पुस्तक अधिक आवडतात.

९. एकुण अभ्यासात असे दिसून आले की, ग्रंथपाल प्रवासवर्णन, काव्यसंग्रह आणि आध्यात्मिक वाचनसाहित्याचा वापर करीत नाहीत.

१०. ८१% ग्रंथपालांनी संशोधनपर वाचनसाहित्याचा वापर केला आहे.

११. १००% ग्रंथपालांना स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड आहे.

१२. ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्यापेक्षा अभ्यासक्रमावर आधारित वाचनसाहित्य जास्त प्रमाणात खरेदी केले जाते.

१३. १००% ग्रंथालयात नवीन आलेल्या ग्रंथसंग्रहाची माहिती सुचना फलकावर चिटकविली जाते.

१४. ५५% ग्रंथालयाची समिती किंवा व्यवस्थापन अवांतर वाचनसाहित्य खरेदी करावे असे सुचवित नाही. ग्रंथालयात विद्यार्थी वाचकांकडून मागणी केली जाते. तसेच अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना मनोरंजनासाठी किंवा विद्यार्थ्यांचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने विचार करता ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे. या गोष्टी ग्रंथपालांनी समिती किंवा व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून द्यावे असे संशोधकास वाटते.

१५. १००% ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य खरेदी स्वरूपात संकलीत केले जाते.

१६. ग्रंथालयात वाचकांच्या मागणीनुसारच अवांतर वाचनसाहित्याच्या प्रती घेतल्या जातात.

१७. मागील दोन वर्षातील अवांतर वाचनसाहित्य खरेदी संख्या सरासरी १ ते ०९ च्या पटीत आहे.

१८. १००% ग्रंथालयात दिवाळी अंकाची खरेदी केली जात नाही.

१९. १००% ग्रंथालयातील ग्रंथपालांनी असे सांगितले आहे की, भविष्यात अवांतर वाचनसाहित्याची खरेदी करणार आहे.

२०. १००% ग्रंथपालांना एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटते.

२१. ग्रंथालयांतून विद्यार्थ्यांना १ पुस्तक १५ दिवसांसाठी घरी वाचायला दिले जाते.

२२. १००% ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती वाचकांना तालिका आणि ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून दिली जाते.

२३. १००% ग्रंथालयांत अवांतर वाचनसाहित्याची वाचकांकडून मागणी किंवा शिफारस केली जाते.

२४. एकुण महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी १८% ग्रंथालयात नियमित ग्रंथप्रदर्शन भरविले जाते. तर ६४% ग्रंथालयात कधीतरी प्रदर्शन भरविले जाते. तसेच १८% ग्रंथालयात कधीच ग्रंथप्रदर्शन भरविले जात नाही.

२५. १००% ग्रंथालयात ग्रंथपेढीची सुविधा उपलब्ध नाही.

२६. १००% ग्रंथालयात आंतरग्रंथालय देवघेव सेवा दिली जाते ही वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

२७. अवांतर वाचन सुधारण्यासाठी ग्रंथालयामार्फत आंतर ग्रंथालय सेवा हा उपक्रम राबविला जातो. परंतु सांघिक पुस्तकवाचन किंवा पुस्तकपेढी यासारखे उपक्रम राबविले जात नाहीत. हुशार विद्यार्थ्यांना अधिक पुस्तके घरी वाचण्यासाठी देणे, स्पर्धापरीक्षेसाठी लागणारी पुस्तकं तसेच नियतकालिके उपलब्ध करून देणे, इत्यादी उपक्रम ग्रंथालयात राबविले पाहिजेत असे संशोधकास वाटते.

२८. १००% ग्रंथालयात वृत्तपत्रे किंवा इतर माध्यमाव्दारे नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणा-या माहितीची साठवणूक कात्रण स्वरूपात केली जाते.

२९. १००% ग्रंथालयातील अंदाजपत्रकात अवांतर वाचनसाहित्यासाठी खास निधी राखून ठेवला जात नाही. परंतु वाचकांची मागणी किंवा शिफारस यांचा विचार करून ग्रंथपाल आवश्यकतेनुसार ग्रंथालयाच्या एकुण निधीपैकी काही निधीतून अवांतर वाचनसाहित्याची खरेदी करतात.

ग्रंथालयात विद्यार्थी वाचकांकडून अवांतर वाचनसाहित्याची मागणी केली जाते. तसेच अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना मनोरंजनासाठी किंवा विद्यार्थ्यांचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने विचार करता ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे. या गोष्टी समिती किंवा व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून अवांतर वाचनसाहित्य खरेदीसाठी वेगळा निधी मिळविण्याचा प्रयत्न करावा असे संशोधकास वाटते.

३०. १००% ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविली जाते. तसेच ग्रंथालय / महाविद्यालय परीसरात Wi- Fi सुविधा उपलब्ध आहे.

३१. १००% ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य अजून उपलब्ध नाही. शक्यतो प्रत्येक ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्याचा संग्रह असतोच. परंतु अवांतर वाचनसाहित्याच्या कित्येक प्रकारांमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात माहिती प्रकाशित केली जात नाही. त्यामुळे ग्रंथालयांत असा संग्रह असणे बहुतांश संभव नसावे.

३२. कोणत्याही ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्याची देवघेव केली जात नाही. ज्या अवांतर वाचनसाहित्य प्रकारातील माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असेल असे साहित्य उपलब्ध करून ग्रंथालयात ठेवून त्याची देवाणघेवाण करावी असे संशोधकास वाटते.

३३. ग्रंथालयांचे स्वत:चे असे संकेतस्थळ उपलब्ध नाही. अभ्यासाकरिता घेतलेली १००% ग्रंथालये महाविद्यालय तसेच मातृसंस्थेच्या संकेतस्थळाचा वापर करत असल्याचे दिसून आले. ग्रंथालयांचे स्वत:चे असे संकेतस्थळ उपलब्ध नसल्यामुळे वाचकांना हवे असलेल्या पुस्तकाविषयी माहिती ग्रंथालयात न येता मिळविता येत नाही. त्यास ग्रंथालयात जाऊनच पुस्तकांविषयी माहिती मिळवावी लागते. त्यामुळे प्रत्येक ग्रंथालयांने स्वत:चे

संकेतस्थळ निर्माण करून त्याचा ग्रंथालयात असलेल्या ग्रंथसंग्रहाची वाचकांना माहिती देण्यासाठी वापर करावा असे संशोधकास वाटते.

३४. १00% ग्रंथालयाचा कॅटलॉग सुविधा सर्वांसाठी उपलब्ध आहे. ग्रंथालयात आल्यानंतर वाचकास हवे असलेले पुस्तक ग्रंथालयात आहे किंवा नाही याची माहिती कॅटलॉगच्या माध्यमातून मिळविता येते.

३५. अभ्यासाकरिता घेतलेल्या कोणत्याही ग्रंथालयामध्ये अवांतर वाचनसाहित्य जास्त प्रमाणात वापरले जावे याकरिता सोशल मिडियाचा वापर केला जात नाही.

## ५.२ ग्रंथपाल प्रश्नावलीतील शिफारशी :

१. हिंदी अवांतर वाचनसाहित्याचे प्रमाण खुपच कमी आहे त्यामध्ये वाढ करावी.

२. वाचक हिंदी भाषेतील वाचनसाहित्याचा वापर करावेत यासाठी प्रयत्न करावा.

३. सर्वच ग्रंथालायांनी वाचकांनी परेदशी साहित्याचा वापर करावा यासाठी प्रयत्न करावा.

४. ग्रंथपालांनी वैयक्तिक वाचनसाहित्य संग्रहाची साठवणूक करावी.

५. ग्रंथपालांनी कादंबरी, कथासंग्रहाऐवजी इतर अवांतर वाचनसाहित्याचेही वाचन करावे.

६. सर्वच ग्रंथपालांनी अवांतर वाचनसाहित्याचे वाचन वाढवावे.

७. ग्रंथपालांनी ई-बुक्स माध्यमातील अवांतर वाचनसाहित्याचेही वाचन करावे.

८. ग्रंथपालांनी प्रवासवर्णन, काव्यसंग्रह, आध्यात्मिक साहित्याचा वापर करावा.

९. ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्याची खरेदी जास्त प्रमाणात करावी.

१0. ग्रंथालय समिती किंवा व्यवस्थापनाकडून अवांतर वाचनसाहित्य खरेदी करण्यास मान्यता घेण्याचा प्रयत्न करावा.

११. जास्तीत जास्त ग्रंथालयांनी देणगी स्वरूपात अवांतर वाचनसाहित्य मिळविण्याचा प्रयत्न करावा.

१२. प्रत्येक ग्रंथालयात विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात अवांतर वाचनसाहित्याच्या प्रती घेण्याचा प्रयत्न करावा.

१३. प्रत्येक वर्षी अवांतर वाचनसाहित्य खरेदी संख्येमध्ये वाढ करावी.

१४. सर्वांनीची एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देण्याचा प्रयत्न करावा.

१५. महाविद्यालयातील शिक्षक आणि ग्रंथापाल यांनी विद्यार्थ्यांना लेख किंवा काव्य प्रकाशनासाठी मदत करावी.

१६. घरी वाचायला दिल्या जाणा-या पुस्तक संख्येमध्ये वाढ करावी.

१७. वाचकांच्या सततच्या मागणीचा आणि शिफारसीचा विचार करून त्याप्रकारचा वाचनसंग्रह उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा.

१८. ग्रंथालयांमध्ये वेळोवेळी ग्रंथप्रदर्शन भरविण्यात यावे.

१९. ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य वाचनासाठी ग्रंथपेढीची सोय करावी असे संशोधकास वाटते.

२०. ग्रंथालयात अवांतर वाचन सुधारण्यासाठी तसेच ग्रंथालयात वाचकांचे येण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी ग्रंथालयामार्फत विविध उपक्रम राबविले पाहिजेत.

२१. वृत्तपत्रे किंवा इतर माध्यमाव्दारे नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणा-या माहितीची साठवणूक यादीच्या स्वरूपातही केली गेली पाहिजे.

२२. ग्रंथालयाच्या अंदाजपत्रकात अवांतर वाचनसाहित्यासाठी खास निधी राखून ठेवला गेला पाहिजे.

२३. ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य उपलब्ध करून त्याची देवाणघेवाण करण्याचा प्रयत्न करावा.

२४. ग्रंथालयात ई-बुक्सची साठवणूक करून ई-बुक्स लायब्ररीची निर्मिती करावी असे संशोधकास वाटते.

२५. प्रत्येक ग्रंथालयाचे स्वत:चे असे संकेतस्थळ उपलब्ध निर्माण करून त्याव्दारे वाचकांना ग्रंथालयात असलेल्या वाचनसंग्रहाची माहिती संकेतस्थळाव्दारे देण्याचा प्रयत्न करावा असे संशोधकास वाटते.

२६. अवांतर वाचनसाहित्य जास्त प्रमाणात वापरले जावे याकरिता सोशल मिडियाचा वापर केला पाहिजे.

## ५ . ३ वाचक प्रश्नावलीतील निष्कर्ष :

"सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास" या विषयावर संशोधन करण्याकरिता संशोधकाने प्रश्नावली या माध्यमाचा वापर करून त्याव्दारे **वाचकांच्या** प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला .

सदर संशोधनासाठी संशोधकाने प्रत्येक महाविद्यालयातील १0 विद्यार्थ्यांना याप्रमाणे ११0 प्रश्नावलीचे वितरण केले त्यास १00% प्रतिसाद मिळाला . त्यावरून केलेल्या विश्लेषणातून पुढील निष्कर्ष काढून आवश्यकतेनुसार शिफारशी केलेल्या आहेत .

१ . ११0 पैकी ८१% विद्यार्थ्यांना अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे .

२ . वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १५% आहे .

३ . १00% विद्यार्थ्यांना ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे वाटते .

४ . ७१% विद्यार्थ्यांच्या मते त्यांना हवे असलेले अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयात मिळत नाही .

५ . ११0 विद्यार्थ्यांपैकी ५१% विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य वाचण्यास आवडते . ११% विद्यार्थ्यांना हिंदी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य वाचण्यास आवडते . तर ३८% विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील अवांतर वाचनसाहित्य वाचण्यास आवडते .

६ . ११0 विद्यार्थ्यांपैकी २६% विद्यार्थ्यांना कथासंग्रह हा वाचनसाहित्य प्रकार जास्त आवडतो . कादंबरी हा वाचनसाहित्य प्रकार आवडणा-यांची संख्या ५७% आहे . तर काव्यसंग्रह हा वाचनसाहित्य प्रकार १७% विद्यार्थ्यांना जास्त आवडतो .

७. ११० विद्यार्थ्यांपैकी १०% विद्यार्थ्यांनी आदर्श असलेल्या व्यक्तींची चरित्र किंवा आत्मचरित्रे वाचली आहेत. तर ९०% विद्यार्थ्यांनी आदर्श असलेल्या व्यक्तींची चरित्र किंवा आत्मचरित्रे वाचलेली नाहीत.

८. ११० विद्यार्थ्यांपैकी ११% विद्यार्थ्यांनी संशोधनपर साहित्याचा वापर केला आहे. तर ८९% विद्यार्थ्यांनी संशोधनपर साहित्याचा वापर केला नाही.

९. ११० विद्यार्थ्यांपैकी ८४% विद्यार्थ्यांना स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड आहे.

१०. काव्यसंग्रहाचे वाचन करणारे विद्यार्थी २१% आहेत.

११. ९४% विद्यार्थी आध्यात्मिक वाचनसाहित्याचा वापर करीत नाहीत.

१२. ८५% विद्यार्थी अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून घेऊन वाचतात. तर खरेदी करून वाचणारांची संख्या १५% आहे.

१३. ९७% विद्यार्थ्यांना एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटते.

१४. स्वत: चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे असे १००% विद्यार्थ्यांना वाटते.

१५. स्वत:चे लेख किंवा काव्य प्रकाशित न झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ९२% आहे.

१६. ९७% विद्यार्थ्यांना अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून घरी वाचनासाठी मिळते.

१७. ग्रंथालयास वाचनसाहित्याची शिफारस करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९०% आहे.

१८. ९५% विद्यार्थी अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवेचा वापर करतात.

१९. वृत्तपत्रांमध्ये नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहिती जतन करणा-या विद्यार्थ्यांची संख्या ११% आहे. लेखांचे किंवा काव्यसंग्रहांचे जतन करणा-या विद्यार्थ्यांची संख्या २६% आहे.

२०. १००% ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविली जाते तसेच ग्रंथालय / महाविद्यालय परीसरात Wi- Fi सुविधा उपलब्ध आहे.

२१. अवांतर वाचनसाहित्याची माहिती मिळविण्यासाठी सोशल मिडियाचा वापर करणा-या विद्यार्थ्यांची संख्या ९४% आहे.

२२. मागील तीन महिन्यात १० अवांतर पुस्तके वाचलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ८३% आहे. १५ अवांतर पुस्तके वाचलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १३% आहे. तर २० अवांतर पुस्तके वाचलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ०४% आहे.

२३. अवांतर वाचनासाठी आठवडयातील १ दिवस राखून ठेवणा-या विद्यार्थ्यांची संख्या ९५% आहे. तर २ दिवस राखून ठेवणा-या विद्यार्थ्यांची संख्या ०५% आहे.

२४. अवांतर वाचनासाठी ऑनलाईन ई-बुक्स वापर करत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ९१% आहे. ग्रंथालयात स्वतंत्र अशी ई-बुक्स लायब्ररी उपलब्ध नाही. परंतु विद्यार्थी इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन ई-बुक्सचा वापर करतात.

## ५.४ वाचक प्रश्नावलीतील शिफारशी :

१. विद्यार्थ्यांनी अवांतर वाचनसाहित्याचा वैयक्तिक संग्रह करण्याचा प्रयत्न करावा.

२. ग्रंथालयात असलेल्या अवांतर वाचनसाहित्याची विद्यार्थ्यांनी माहीती करून घ्यावी. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना हवे असलेले अवांतर वाचनसाहित्य मिळवून देण्याचा ग्रंथपालांनी प्रयत्न करावा.

३. आदर्श व्यक्तींची चरित्रे किंवा आत्मचिरित्रे, संशोधनपर आणि आध्यात्मिक साहित्य विद्यार्थ्यांनी वाचली पाहिजेत असे संशोधकास वाटते.

४. बाजारात नवीन आलेले अवांतर वाचनसाहित्य विद्यार्थ्यांनी खरेदी करून वाचण्याचा प्रयत्न करावा.

५. विद्यार्थ्यांनी स्वत:चे लेख किंवा काव्य प्रकाशित व्हावे यासाठी प्रयत्न करावा असे संशोधकास वाटते.

६. अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवेचा वापर १00% विद्यार्थ्यांनी करावा असे संशोधकास वाटते.

७. विद्यार्थ्यांनी वृत्तपत्रांमध्ये नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहिती तसेच लेखांचे किंवा काव्यसंग्रहांचे जतन केले पाहिजे असे संशोधकास वाटते.

## ५.५ महत्वाचे निष्कर्ष आणि शिफारशी :

१. संशोधकाने संशोधनास घेतलेल्या प्रत्येक ग्रंथालयात असलेली एकुण ग्रंथसंग्रह संख्या आणि अवांतर वाचनसाहित्य संख्या यामधील टक्केवारी प्रत्येक ग्रंथालयानुसार दाखविले आहे.

| अ.न. | महाविद्यालय | एकुण ग्रंथसंख्या | अवांतर वाचनसाहित्य संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | SVCP | १८३५३ | ८१ | ०.४४% |
| २ | SIOM | ४५१३८ | १७० | ०.३७% |
| ३ | SCOE | ५५४४० | १९० | ०.३४% |
| ४ | SCOA | ६०३४ | ६५ | १.०७% |
| ५ | SCOP | ११८६२ | ९० | ०.७६% |
| ६ | SKNCOE | ३३११० | ६० | ०.१८% |
| ७ | SCOS | ८६०७ | १८० | २.०९% |
| ८ | SLC | ४४२६ | १० | ०.२२% |
| ९ | SDCH | ५००० | २५ | ०.५% |
| १० | SKNSSBM | ५९४२ | ४५ | ०.७६% |
| ११ | NBN | १४६७० | ५५ | ०.३७% |

वरील तक्त्यामध्ये निघालेल्या टक्केवारीवरून असे दिसून येते की, ग्रंथालयामध्ये असलेल्या **एकुण ग्रंथसंख्येच्या तुलनेत अवांतर वाचनसाहित्य संख्या अगदीच कमी आहे.** अवांतर वाचनसाहित्य संख्येमध्ये वाढ करावी असे संशोधकास वाटते.

२. संशोधकाने संशोधनास घेतलेल्या प्रत्येक ग्रंथालयातील वार्षीक अंदाजे ग्रंथवाढीचे प्रमाण आणि २०१२-१३ आणि २०१३-१४ या वर्षात अवांतर वाचनसाहित्य खरेदीचे तुलनात्मक प्रमाण खालीलप्रमाणे **वार्षीक अंदाजे ग्रंथवाढ, अवांतर साहित्य खरेदी संख्या** आणि टक्केवारी प्रत्येक ग्रंथालयानुसार दाखविले आहे.

| अ.न. | महाविद्यालय | वार्षीक अंदाजे ग्रंथवाढ | अवांतर साहित्य खरेदी | | टक्केवारी २०१२-१३ | टक्केवारी २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१२-१३ | २०१३-१४ | | |
| १ | SVCP | २५० | ०२ | ०३ | ०.८% | १.२% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | SIOM | ५०० | ०४ | ०२ | ०.८% | ०.४% |
| ३ | SCOE | ७५० | ०५ | ०३ | ०.६६% | ०.४% |
| ४ | SCOA | २०० | ०२ | ०४ | १% | २% |
| ५ | SCOP | २०० | ०३ | ०५ | १.५% | २.५% |
| ६ | SKNCOE | ३०० | ०४ | ०२ | १.३३% | ०.६६% |
| ७ | SCOS | २५० | ०६ | ०३ | २.४% | १.२% |
| ८ | SLC | ७५ | ०१ | ०२ | १.३३% | २.६६% |
| ९ | SDCH | १५० | ०३ | ०४ | २% | २.६६% |
| १० | SKNSSBM | ३०० | ०५ | ०३ | १.६६% | १% |
| ११ | NBN | ४०० | ०४ | ०२ | १% | ०.५% |

वरील तक्त्यामध्ये निघालेल्या टक्केवारीवरून असे दिसून येते की, ग्रंथालयामधील वार्षीक अंदाजे ग्रंथवाढीच्या तुलनेत २०१२-१३ आणि २०१३-१४ या वर्षातील अवांतर वाचनसाहित्य खरेदी किंवा वाढ ही अगदीच कमी आहे. या गोष्टीचा विचार करता ग्रंथालयात प्रत्येक वर्षी अवांतर वाचनसाहित्य खरेदीचे प्रमाण वाढविले पाहिजे असे संशोधकास वाटते.

३. **१००% ग्रंथालयातील अंदाजपत्रकात अवांतर वाचनसाहित्यासाठी खास निधी राखून ठेवला जात नाही.** परंतु वाचकांची मागणी किंवा शिफारस यांचा विचार करून ग्रंथपाल आवश्यकतेनुसार ग्रंथालयाच्या एकुण निधीपैकी काही निधीतून अवांतर वाचनसाहित्याची खरेदी करतात. परंतु अवांतर वाचनसाहित्य किती आवश्यक आहे तसेच त्याचा होणारा वापर या गोष्टींचा विचार करता अवांतर वाचनसाहित्य खरेदीसाठी वेगळा निधी राखून ठेवणे किती आवश्यक आहे हे समजते. त्यामुळे **प्रत्येक ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य खरेदीसाठी वेगळा निधी राखुन ठेवला गेला पाहिजे** असे संशोधकास वाटते.

४. **ग्रंथालयाची समिती किंवा व्यवस्थापन अवांतर वाचनसाहित्य खरेदी करावे असे ग्रंथालयास सुचवित नाही.** ग्रंथालयात विद्यार्थी वाचकांकडून मागणी केली जाते. तसेच अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना मनोरंजनासाठी किंवा विद्यार्थ्यांचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने विचार करता ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे. या गोष्टी ग्रंथपालांनी समिती किंवा व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून द्यावे असे संशोधकास वाटते.

५. **ग्रंथालयाचा नोटीस बोर्ड हा ग्रंथालयामध्ये होत असलेल्या बदलांचा आरसा असतो.** नोटीसबोर्डमुळे ग्रंथालयातील घडामोडींची माहिती विद्यार्थीवाचकांना मिळत असते. ग्रंथालयात आलेल्या नवीन पुस्तकांची यादी नोटीसबोर्डवर लावल्यास ग्रंथालयात कोणकोणते नवीन वाचनसाहित्य आले आहे याची माहिती विद्यार्थ्यांना मिळते. अवांतर वाचनसाहित्याची यादी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने लावल्यास वाचकांचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण वाढेल. त्याचबरोबर वाचकांची मागणी वाढल्यामुळे ग्रंथालयात जास्तीत जास्त अवांतर वाचनसाहित्य खरेदी केले जाऊ शकते असे संशोधकास एकुण अभ्यास केल्यानंतर वाटते.

६. महाविद्यालयातील मुलांनी चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी किंवा अवांतर वाचन सुधारण्यासाठी संशोधनासाठी घेतलेल्या ग्रंथालयात **कोणतेही उपक्रम राबविले जात नाहीत किंवा अधिकची सेवासुविधा दिली जात नाही** असे दिसून आले. सांघिक पुस्तकवाचन किंवा पुस्तकपेढी यासारखे उपक्रम किंवा सुविधा ग्रंथालयात नाहीत.

हुशार विद्यार्थ्यांना अधिक पुस्तके घरी वाचण्यासाठी देणे, स्पर्धापरीक्षेसाठी लागणारी पुस्तकं तसेच नियतकालिके उपलब्ध करून देणे, इत्यादी उपक्रम ग्रंथालयात राबविले पाहिजेत असे संशोधकास वाटते.

७. संशोधनास घेतलेल्या १00% ग्रंथालयात **आंतरग्रंथालय देवघेव सेवा दिली जाते.** यासेवेमुळे विविध ग्रंथालयात असलेल्या वाचनसाहित्याचा वाचकांना फायदा घेता येतो. ग्रंथालयात अधिकचे वाचनसाहित्य खरेदी करण्याचा खर्च वाचला जातो. ग्रंथालयात उपलब्ध नसलेले साहित्य इतर ग्रंथालयातून मिळविता येते. तसेच आंतर ग्रंथालय सेवेचा प्रत्येक ग्रंथालयातील विद्यार्थी वाचकांना लाभ घेता येतो. त्यामुळे आंतरग्रंथालय देवघेव सेवा ही वाचकांच्या दृष्टीने अतिशय सर्वोत्तम सेवा ठरते. ही वाचकांच्या दृष्टीने चांगली बाब आहे.

८. अमेरिकेत वाचक घडविण्याच्या दृष्टीने अनेक उपक्रम राबविले जातात. नुकतच वाचायला शिकलेल्या मुलांनी २० पुस्तके वाचली की त्यांचे पालक त्याचा तपशील ग्रंथालयास सादर करतात. मग त्या मुलाला ग्रंथालयातर्फे **चषक आणि प्रमाणपत्र** मिळते. त्या प्रमाणपत्रावर ग्रंथपालाच्या सहीबरोबरच टेक्सासच्या गव्हर्नरची सही आणि राज्य ग्रंथपालांचीही सही असते. अधिक मोठया मुलांसाठी हा चषक व प्रमाणपत्र मिळवण्यासाठी २० तास वाचनाची अट असते. परंतु हे **अमेरिकेत शक्य आहे आपल्याकडे नाही असे म्हणण्यापेक्षा आपल्या देशात असे प्रयत्न होणे गरजेचे आहे.**

आपल्याकडेही ग्रंथालयामार्फत विविध नवनविन उपक्रम राबविणे हे सध्याच्या वातावरणात अत्यंत गरजेचे आहे. ज्या योगे विद्यार्थी अवांतर वाचनसाहित्याकडे जास्तीत जास्त उध्युक्त होतील. त्याचबरोबर ग्रंथालयाचे वाचक वाढविणे तसेच अवांतर वाचनसाहित्यास चांगले दिवस येण्यास त्यामुळे हाताभार लागू शकतो असे संशोधकास वाटते.

९. एकुण महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपैकी १८% ग्रंथालयात नियमित ग्रंथप्रदर्शन भरविले जाते. तर ६४% ग्रंथालयात कधीतरी प्रदर्शन भरविले जाते. तसेच १८% ग्रंथालयात कधीच ग्रंथप्रदर्शन भरविले जात नाही. ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शन भरविल्यामुळे वाचकांना ग्रंथालयात असलेल्या विविध वाचनसाहित्य प्रकाराची ओळख होते. ग्रंथालयात असलेले दुर्मिळ ग्रंथ पाहायला मिळतात. कुतुहल म्हणून वेगवेगळे ग्रंथ हाताळले जातात. तसेच ब-याच कालावधीपासून वापरात नसलेले ग्रंथ वापरात येऊ शकतात. यासारख्या बाबींचा विचार करता **प्रत्येक ग्रंथालयात नियमितपणे ग्रंथप्रदर्शन भरविले पाहिजे** असे संशोधकास वाटते.

१०. १००% ग्रंथालयात **इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य अद्याप उपलब्ध नाही.** शक्यतो प्रत्येक ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्याचा संग्रह असतोच. परंतु अवांतर वाचनसाहित्याच्या कित्येक प्रकारांमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात माहिती प्रकाशित केली जात नाही. त्यामुळे ग्रंथालयांत असा संग्रह असणे बहुतांश संभव नसावे. ज्या अवांतर वाचनसाहित्य प्रकारातील माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असेल असे साहित्य उपलब्ध करून ग्रंथालयात ठेवले गेले पाहिजे असे संशोधकास वाटते.

११. संशोधनास घेतलेल्या कोणत्याही ग्रंथालयात **इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्याची देवघेव केली जात नाही.** इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचनसाहित्याचा वाढता वापर लक्षात घेता, ज्या अवांतर वाचनसाहित्य प्रकारातील माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असेल असे साहित्य मिळवून ग्रंथालयात ठेवून त्याची देवाणघेवाण करावी असे संशोधकास वाटते.

१२. संशोधनास घेतलेल्या **ग्रंथालयांचे स्वत:चे असे संकेतस्थळ अद्याप उपलब्ध नाही.** अभ्यासाकरिता घेतलेली १००% ग्रंथालये महाविद्यालय तसेच मातृसंस्थेच्या संकेतस्थळाचा वापर करत असल्याचे दिसून आले. ग्रंथालयांचे स्वत:चे असे संकेतस्थळ उपलब्ध नसल्यामुळे वाचकांना हवे असलेल्या पुस्तकाविषयी माहिती ग्रंथालयात न येता मिळविता येत नाही. त्यास ग्रंथालयात जाऊनच पुस्तकांविषयी माहिती मिळवावी लागते. त्यामुळे प्रत्येक ग्रंथालयांने स्वत:चे संकेतस्थळ निर्माण करून त्याचा ग्रंथालयात असलेल्या ग्रंथसंग्रहाची वाचकांना माहिती देण्यासाठी वापर करावा असे संशोधकास वाटते.

१३. ११० विद्यार्थ्यांपैकी ९५% विद्यार्थ्यी आठवडयातील १ दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवतात. तर ०५% विद्यार्थ्यी आठवडयातील २ दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवतात. ११ ग्रंथपालांपैकी १८% ग्रंथपाल आठवडयातील २ दिवस अवांतर वाचनासाठी राखुन ठेवतात. तर ८१% ग्रंथपाल आठवडयातील १ दिवस अवांतर वाचनासाठी राखुन ठेवतात. सध्याच्या धावपळीच्या काळात पुस्तक वाचण्यासाठी वेळ दिला जातो हीच गोष्ट जास्त महत्वपूर्ण आहे असे संशोधकास वाटते.

१४. ११० विद्यार्थ्यांपैकी ९१ विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यात १० अवांतर पुस्तके वाचली आहेत. १४ विद्यार्थ्यांनी १५ अवांतर पुस्तके वाचली आहेत. तर ०५ विद्यार्थ्यांनी २० अवांतर पुस्तके वाचली आहेत. मागील तीन महिन्यात ११ ग्रंथपालांपैकी ३ ग्रंथपालांनी ५ ते ७ आणि ७ पेक्षाही जास्त अवांतर पुस्तक वाचली आहेत. ३ ते ५ अवांतर पुस्तक वाचणा-यांची संख्या ८ आहे.

१५. ११० विद्यार्थ्यांपैकी ९४% विद्यार्थ्यी अवांतर वाचनसाहित्याची माहिती मिळविण्यासाठी सोशल मिडियाचा वापर करतात. परंतु अभ्यासाकरिता घेतलेल्या १००%

**ग्रंथालयांमध्ये** अवांतर वाचनसाहित्य जास्त प्रमाणात वापरले जावे याकरिता **सोशल मिडियाचा वापर केला जात नाही.**

१६. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर **वाचनसाहित्य असावे** असे १००% वाटते. परंतु हवे असलेले अवांतर वाचनसाहित्य **ग्रंथालयात मिळत नाही** असे ७१% विद्यार्थ्यांचे मत आहे. यावरून ग्रंथालयात पुरेशा प्रमाणात अवांतर वाचनसाहित्य खरेदी केले जात नसावे असे अभ्यासावरून निदर्शनास येते.

१७. एकुण विद्यार्थ्यांपैकी ५७% विद्यार्थ्यांना कादंबरी हा प्रकार जास्त आवडतो. परंतु ग्रंथालयात कादंबरी या प्रकारचे वाचनसाहित्य जास्त प्रमाणात उपलब्ध नाही असे एकुण अभ्यासावरून दिसून येते. तरी कादंबरी प्रकारचे वाचनसाहित्य जास्त प्रमाणात खरेदी करावे असे संशोधकास वाटते.

१८. एकुण विद्यार्थ्यांपैकी ३५% विद्यार्थी हे अवांतर वाचनसाहित्याची माहिती इंटरनेटच्या माध्यमातून मिळवितात. पण १००% विद्यार्थ्यांना अवांतर वाचनसाहित्याची माहिती ग्रंथालयातून मिळविता आली पाहिजे ही ग्रंथपालांची जबाबदारी आहे असे संशोधकास वाटते.

१९. एकुण विद्यार्थ्यांपैकी ९०% विद्यार्थी ग्रंथालयास अवांतर वाचनसाहित्याची शिफारस करतात. परंतु त्या प्रमाणात अवांतर वाचनसाहित्याची खरेदी केली जात नाही असे संशोधकास वाटते.

२०. पाश्चिमात्य देशांत ग्रंथालयाचा विषय अभ्यासक्रमात सामावूनच घेतलेला असतो असे आपल्या देशात कधी होईल सांगता येत नाही. किमानपक्षी 'संगीत विद्यालय' 'क्रिकेट कोचिंग' याप्रमाणे एक तरी **'वाचन विद्यालय'** निर्माण व्हायला हवे. आपल्या देशातील ग्रंथपालांनी असा प्रयोग करायला काय हरकत आहे असे संशोधकास वाटते.

२१. प्रत्येक शैक्षणिक संस्थेने अवांतर वाचनसाहित्य आपल्या ग्रंथालयात ठेवणे आवश्यक आहे. अवांतर वाचनसाहित्याचा वापर वाढावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्याचा प्रसार करावा. त्यासाठी ठराविक अशी **नियमावली** तयार करावी असे संशोधकास वाटते.

**समारोप :**

प्रस्तुत अभ्यासक्रमात संशोधकाने अवांतर वाचनसाहित्याची महाविद्यालयीन ग्रंथालयात असणारी गरज या विषयावर संशोधन केले आहे. प्रत्येक ग्रंथालयात मग ते कोणत्या प्रकारचे ग्रंथालय असो; अवांतर वाचनसाहित्य असणे हे सध्याच्या काळात अत्यंत गरजेचे आहे.

परंतु संशोधकाने संशोधनास घेतलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या संशोधनातून असे दिसून आले की ग्रंथपालांची तसेच ग्रंथालय व्यवस्थापनाची अवांतर वाचनसाहित्याविषयी फारशी आत्मियता दिसून येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही अवांतर वाचनसाहित्य वाचनाविषयी गोडी दिसून येत नाही. सदर महाविद्यालयांमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात अवांतर वाचनसाहित्य असावे असे संशोधकास वाटते.

अभ्यासाअंतर्गत असेही दिसून आले की परदेशातील ग्रंथालयात **लिटरेचर रिडींग** या साहित्याला जास्त प्राधान्य दिले जाते. आपल्या देशातील प्रत्येक महाविद्यालयीन ग्रंथालयात अशा प्रकारचे साहित्य जास्तीत जास्त प्रमाणात ठेवल्यास जास्तीत जास्त विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर करू शकतील. ग्रंथालयाचा वापर वाढेल त्याचबरोबर अवांतर वाचनसाहित्याचा प्रचार आणि प्रसार होण्यास मदत होऊ शकेल असे संशोधकास वाटते.

"सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास"

**ग्रंथपाल प्रश्नावली**

योग्य जागी ☑अशी खुण करा

**१. ग्रंथालय सर्वसाधारण माहिती :**

१.१ ग्रंथालय स्थापना वर्ष :

१.२ ग्रंथपाल नाव :

१.३ कर्मचारी संख्या :

१.४ विद्यार्थी संख्या :

१.५ शिक्षक संख्या :

१.६ अभ्यासक्रम कोणते :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पदवी | | | | |
| पदव्युत्तर | | | | |

**२. ग्रंथविषयक माहिती :**

२.१ एकुण ग्रंथसंख्या :

२.२ संदर्भग्रंथ संख्या :

२.३ वार्षीक ग्रंथवाढ अंदाजे :

**३. अवांतर वाचनसाहित्याविषयी :**

३.१ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे काय?

होय □ नाही □

३.२ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे वाटते का?

होय □ नाही □

३.३ ग्रंथालयात कोणकोणत्या प्रकारातील अवांतर वाचनसाहित्य आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कथासंग्रह | □ | कादंबरी | □ | काव्यसंग्रह | □ |
| वाङमय | □ | आध्यात्मिक | □ | स्पर्धात्मक साहित्य | □ |
| चरित्रे/आत्मचरित्रे | □ | प्रवासवर्णन | □ | नकाशासंग्रह | □ |
| नियतकालिके | □ | वृत्तपत्रे | □ | कात्रण प्रकल्प | □ |
| इतर भाषांतील | □ | शब्दकोश | □ | विश्वकोश | □ |

३.४ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य कोणकोणत्या भाषेतील आहे.

मराठी □ हिंदी □ इंग्रजी □ इतर भाषीय □

३.५ ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्याची संख्या किती आहे.

मराठी ☐

हिंदी ☐

इंग्रजी ☐

३.६ कोणत्या भाषेतील साहित्य जास्त प्रमाणात वाचले जाते.

मराठी □ हिंदी □ इंग्रजी □ इतर भाषीय □

३.७ कोणत्या प्रकाशनांचे वाचन साहित्य वाचक जास्त प्रमाणात वाचतात.

भारतीय □ परदेशी □

**४. ग्रंथपालांची अवांतर वाचन साहित्याच्या आवडीविषयक माहिती :**

४.१ आपणास अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे का?

होय □ नाही □

४.२ आपला स्वत:चा वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह आहे का?

होय □ नाही □

४.३ खालीलपैकी कोणत्या प्रकारचे साहित्य जास्त प्रमाणात आवडते.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कथासंग्रह | □ | कादंबरी | □ | काव्यसंग्रह | □ |
| वाङमय | □ | आध्यात्मिक | □ | स्पर्धात्मक साहित्य | □ |
| चरित्रे/आत्मचरित्रे | □ | प्रवासवर्णन | □ | नकाशासंग्रह | □ |
| नियतकालिके | □ | वृत्तपत्रे | □ | कात्रण प्रकल्प | □ |
| इतर भाषांतील | □ | शब्दकोश | □ | विश्वकोश | □ |

४.४ गेल्या तीन महिन्यात तुम्ही किती अवांतर पुस्तके वाचली आहेत.

३ ते ५ □ ५ ते ७ □ पेक्षा जास्त □

४.५ आठवडयातील किती दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवता.

१ दिवस □ २ दिवस □

४.६ अवांतर वाचनसाहित्यातील नवीन पुस्तकांची माहिती तुम्ही कोठून मिळविता.

ग्रंथालय □ इंटरनेट □ मित्रांकडून □

४.७ कोणत्या माध्यमातील पुस्तके वाचायला आवडतात.

छापील पुस्तके □ ई-बुक्स □

४.८ प्रवासवर्णन वाचनसाहित्याचा वापर केला आहे का?

होय □ नाही □

४.९ संशोधनावरील वाचनसाहित्याचा वापर केला आहे का?

होय □ नाही □

४.१0 स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड आहे का?

होय □ नाही □

४.११ काव्यसंग्रहाचे वाचन करता का?

होय □ नाही □

४.१२ आध्यात्मिक साहित्याचे वाचन करता का?

होय □ नाही □

**५. वाचनसाहित्य खरेदी :**

५.१ ग्रंथ खरेदी करताना कोणत्या प्रकारचे ग्रंथ खरेदी केले जातात?

अभ्यासक्रमावर आधारित □ अवांतर वाचनसाहित्य □

५.२ नवीन खरेदी केलेल्या ग्रंथाची यादी सुचना फलकावर चिटकवली जाते का?

होय □ नाही □

५.३ अवांतर वाचनसाहित्य खरेदी करावे असे समिती किंवा व्यवस्थापन सुचविते का?

होय □ नाही □

५.४ ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य कोणत्या पध्दतीने संकलन केले जाते.

खरेदी □ देणगी □

५.५ अवांतर वाचनसाहित्याच्या जास्तीत जास्त किती प्रती विकत घेतल्या जातात?

विद्यार्थी संख्येनुसार □ मागणीनुसार □

५.६ मागील २०१२ ते २०१४ या प्रत्येक वर्षी किती अवांतर वाचनसाहित्य खरेदी केले.

| वर्ष | वाचनसाहित्य संख्या |
|---|---|
| २०१२-१३ | |
| २०१३-१४ | |

५.७ ग्रंथालयात दिवाळी अंकांची खरेदी केली जाते का?

होय □ नाही □

५.८ भविष्यात अधिक प्रमाणात अवांतर वाचनसाहित्य खरेदी करण्याचा विचार आहे का?

होय □ नाही □

**६. अवांतर वाचन साहित्याच्या प्रसारासाठी उपक्रम :**

६.१ एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटते का?

होय □ नाही □

६.२ एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट दिले का?

होय □ नाही □

६.३ महाविद्यालयातील किंवा स्वत:च्या मुलांना अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती देता का?

होय □ नाही □

६.४ महाविद्यालयातील किंवा स्वत:च्या मुलाने चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे यासाठी प्रोत्साहन देता का?

होय □ नाही □

६.५ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याचे लेखन किंवा काव्य प्रकाशित झाले आहे का?

होय □ नाही □

६.६ ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शन भरविले जाते का?

नियमितपणे □ कधीतरी □ कधीच नाही □

६.७ ग्रंथालयात अवांतर साहित्य वाचनासाठी ग्रंथपेढीची सुविधा आहे का?

होय □ नाही □

६.८ अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवा दिली जाते का?

होय □ नाही □

६.९ अवांतर वाचन सुधारण्यासाठी ग्रंथालयामार्फत काही उपक्रम राबविले जातात का?

होय ☐ नाही ☐

६.१० सांघिक पुस्तक वाचन उपक्रम राबविला जातो का?

होय ☐ नाही ☐

६.११ वृत्तपत्रे किंवा इतर माध्यमाव्दारे नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणा-या माहितीची साठवणूक केली जाते का?

होय ☐ नाही ☐

६.१२ होय असल्यास कोणत्या स्वरूपात ती विद्यार्थी किंवा वाचकांपर्यंत पोहोचविता.

कात्रण स्वरूपात ☐ यादीच्या स्वरूपात ☐

**७. सेवा-सुविधा :**

७.१ अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना घरी वाचनासाठी दिले जाते का? आणि किती मुदतीसाठी दिले जाते.

| **ग्रंथसंख्या** | **मुदत** |
|---|---|
| | |

७.२ वाचकाना विलंबशुल्क आकारले जाते का?

होय ☐ नाही ☐

७.३ वाचकांना ग्रंथसंग्रहात प्रवेश कोणत्या प्रकारे दिला जातो?

मुक्त ☐ बंदिस्त ☐

७.४ ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती वाचकांना कशाप्रकारे उपलब्ध करून दिली जाते?

तालिकेमार्फत ☐ ग्रंथप्रदर्शन ☐ ग्रंथालय कर्मचारी ☐

७.५ ग्रंथालयातील वाचकवर्गाकडून अवांतर वाचनसाहित्याची मागणी होते का?

होय ☐ नाही ☐

७.६ ठराविक वाचनसाहित्याविषयी वाचकवर्गाकडून शिफारस केली जाते का?

होय □ नाही □

**८. ग्रंथालय अदांजपत्रक :**

८.१ ग्रंथालय अंदाजपत्रकात अवांतर वाचनसाहित्यासाठी खास निधी राखून ठेवला जातो का?

होय □ नाही □

८.२ होय असल्यास किती ठेवला जातो.

रूपये □

**९. ग्रंथालय इंटरनेट :**

९.१ ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविली जाते का?

होय □ नाही □

९.२ ग्रंथालय / महाविद्यालय परीसरात Wi- Fi सुविधा आहे का?

होय □ नाही □

९.३ ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्य आहे का?

होय □ नाही □

९.४ इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील अवांतर वाचनसाहित्याची देवघेव केली जाते का?

होय □ नाही □

९.५ ग्रंथालयाचे संकेतस्थळ आहे का?

होय □ नाही □

९.६ होय असल्यास उपलब्ध अवांतर वाचनसाहित्याची माहिती संकेतस्थळावरून दिली जाते का?

होय □ नाही □

९.७ ग्रंथालयात उपलब्ध असलेले वाचनसाहित्य ग्रंथालयाच्या संकेतस्थळावरून शोधता येते का?

होय □ नाही □

९.८ ग्रंथालयाचा कॅटलॉग सर्वांसाठी उपलब्ध आहे का?

होय □ नाही □

९.९ अवांतर वाचनसाहित्य जास्त प्रमाणात वापरले जावे याकरिता कोणत्या सोशल मिडियाचा वापर केला जातो.

ब्लॉग □ फेसबुक □ ट्विटर □ इतर □

ग्रंथपाल सही शिक्का

"सिंहगड शैक्षणिक संस्थेच्या वडगाव (बु||) आणि आंबेगाव (बु||) शाखांमध्ये असलेल्या ११ महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये अवांतर वाचनसाहित्याची गरज : एक अभ्यास"

**वाचक प्रश्नावली**

योग्य जागी ☑अशी खुण करा

**वाचक सर्वसाधाण माहिती :**

नाव :

अभ्यासक्रम :

वर्ष :

**१. अवांतर वाचनसाहित्याविषयी :**

१.१ आपणास अवांतर वाचनसाहित्याची आवड आहे का?

होय □ नाही □

१.२ आपला स्वत:चा वैयक्तिक अवांतर वाचनसाहित्य संग्रह आहे का?

होय □ नाही □

१.३ आपल्या शिकत असलेल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य आहे काय?

होय □ नाही □ माहित नाही □

१.४ आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात अवांतर वाचनसाहित्य असावे असे वाटते का?

होय □ नाही □

१.५ आपणास हवे असलेले अवांतर वाचनसाहित्य आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात मिळते का?

होय □ नाही □

१.६ कोणत्या भाषेतील अवांतर वाचनसाहित्य वाचण्यास आवडते.

मराठी □ हिंदी □ इंग्रजी □

१.७ खालीलपैकी कोणत्या प्रकारचे वाचनसाहित्य जास्त प्रमाणात आवडते.

कथासंग्रह □ कादंबरी □ काव्यसंग्रह □

१.८ आदर्श असलेल्या व्यक्तींची चरित्रे किंवा आत्मचिरित्रे वाचली आहेत का?

होय □ नाही □

१.९ संशोधनपर वाचनसाहित्याचा वापर केला आहे का?

होय □ नाही □

१.१0 स्पर्धात्मकसाहित्य किंवा चालू घडामोडीवरील वाचनसाहित्याची आवड आहे का?

होय □ नाही □

१.११ काव्यसंग्रहाचे वाचन करता का?

होय □ नाही □

१.१२ आध्यात्मिक साहित्याचे वाचन करता का?

होय □ नाही □

१.१३ अवांतर वाचनसाहित्य खरेदी करून वाचता का ग्रंथालयातून घेऊन वाचता.

खरेदी करून □ ग्रंथालयातून घेऊन □

१.१४ एखाद्या समारंभात भेटवस्तु ऐवजी पुस्तक भेट देणे योग्य वाटते का?

होय □ नाही □

१.१५ अवांतर वाचनसाहित्याविषयी माहिती कशी मिळविता.

ग्रंथालय □ मित्राकडून □ इंटरनेट □

१.१६ स्वत: चांगले वाचक, साहित्यिक, लेखक व्हावे असे वाटते का?

होय □ नाही □

१.१७ स्वत:चा एखादा लेख किंवा काव्य प्रकाशित झाले आहे का?

होय □ नाही □

१.१८ अवांतर वाचनसाहित्य ग्रंथालयातून घरी वाचनासाठी मिळते का?

होय □ नाही □

१.१९ ग्रंथ देण्यास विलंब झाल्यास विलंबशुल्क आकारले जाते का?

होय □ नाही □

१.२0 आपणास ग्रंथसंग्रहात मुक्त प्रवेश दिला जातो का?

होय □ नाही □

१.२१ ग्रंथालयातील अवांतर वाचनसाहित्य किंवा अध्ययन साहित्याविषयी माहिती आपणास कशाप्रकारे उपलब्ध करून दिली जाते?

१. तालिकेमार्फत □ २. ग्रंथप्रदर्शन □

३. ग्रंथालय कर्मचारी ☐

१.२२ ग्रंथालयास वाचनसाहित्याविषयी शिफारस करता का?

होय ☐ नाही ☐

१.२३ अवांतर वाचनसाहित्य घेण्यासाठी आंतरग्रंथालय देवघेव सेवेचा वापर करता का?

होय ☐ नाही ☐

१.२४ वृत्तपत्रांमध्ये नवीन पुस्तकांबद्दल प्रसिध्द होणारी माहिती जतन करता का?

होय ☐ नाही ☐

१.२५ वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द होणा-या लेखांचे किंवा काव्यसंग्रहांचे जतन करता का?

होय ☐ नाही ☐

१.२६ ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविली जाते का?

होय ☐ नाही ☐

१.२७ ग्रंथालय / महाविद्यालय परीसरात Wi- Fi सुविधा आहे का?

होय ☐ नाही ☐

१.२८ सोशल मिडियाचा वापर अवांतर वाचनसाहित्याची माहिती मिळविण्यासाठी करता का?

होय ☐ नाही ☐

१.२९ गेल्या तीन महिन्यात तुम्ही किती अवांतर पुस्तके वाचली आहेत.

१० ☐ १५ ☐ २० ☐

१.३० आठवडयातील किती दिवस अवांतर वाचनासाठी राखून ठेवता.

१ दिवस ☐ २ दिवस ☐

१.३१ अवांतर वाचनासाठी ऑनलाईन ई-बुक्सचा वापर करता का?

होय ☐ नाही ☐

विद्यार्थी सही

**संदर्भ सूची :**

१. अमेय, ई-बुक्स आणि पुस्तके. (१५ फेब्रुवारी २०१३) Retrieved from http://www.maayboli.com (accessed on 12.07.2014)

२. आगलावे, प्रदिप. (२000). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन. पृ. १७.

३. कणेकर, प्रतिभा. (रविवार १४ सप्टेंबर २०१४). उद्याचे वाचक घडविण्यासाठी अमेरिकेतील प्रयत्न. लोकमत. लोकरंग. पृ. २.

४. क-हाडे, बी.एस. (२०११). शास्त्रीय संशोधन पध्दती. नागपूर: पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स. पृ. १२.

५. कुंभार, राजेंद्र. (२००९). वाचनसाहित्य संग्रहाचा विकास. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १४.

६. गायकवाड, नानासाहेब. (२१ एप्रिल २०१३). वाचन संस्कृती. Retrieved from http://www.palakneeti.org (accessed on 12.07.2014)

७. चिपळुणकर, विष्णुशास्त्री. (डिसेंबर २००४ ते फेब्रुवारी २००५). वाचन विद्यालय : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९.

८. टिळेकर, अरूण. (n. d.). पुणे शहर, पुणे शहरातील शिक्षणसंस्था. पुणे: निळूभाऊ लिमये फाऊंडेशन. पृ.२०९.

९. देशपांडे, ए. व्ही., (२००९). ग्रंथालयाचा विकास आणि त्यांचे समाजातील कार्य. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.७.

१०. देशपांडे, ए. व्ही., (२००९). ग्रंथालयाचे विविध प्रकार व त्यांची कार्ये. नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. ३९,६३.

११. पिसे, अजय. (२००९-१०). सिंहगड व्यवस्थापन महाविद्यालय लोणावळा येथील विद्यार्थ्यांच्या वाचनसवयीचा अभ्यास. एम. फिल. संशोधन प्रकल्प. पुणे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.

१२. बोराटे, योगेश. विविध महाविद्यालयातील ग्रंथपालांची निरिक्षणे. (३० सप्टेंबर २०१३). पुणे, दै. महाराष्ट्र टाइम्स Retrieved from http://maharashtratimes.indiatimes.com (accessed on 13.07.2014)

१३. मीराताई,(११ सप्टेंबर २०१३). विस्मरणशक्ती. Retrieved from http://www.misalpav.com (accessed on 13.07.2014)

१४. म्हात्रे, महेश. (२२ एप्रिल २०१२). विश्व पुस्तकांचे. Retrieved from http://maheshmhatre.blogspot.in (accessed on 12.07.2014)

१५. रसाळ, सुधीर. (२८ फेब्रुवारी २०१२). अवांतर वाचनसाहित्य अभ्यासक्रमाचा भाग झाला तरच नवी पिढी वाचेल. Retrieved from http://divyamarathi.bhaskar.com (accessed on 12.07.2014)

१६. राक्षे, भूषण. वर्तमानपत्रांव्दारे मुलांचा भाषा विकास. Retrieved from http://pune.thebeehive.org (accessed on 12.07.2014)

१७. रिसवाडकर, म. रा., (२००९). संशोधन व्याख्या आणि पध्दती. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. १-३.

१८. रिसवाडकर, म. रा., (२००९). माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ. ५.

१९. सावे, वसंत. (२००९). शालेय ग्रंथालये. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन. पृ.२९,४.

२०. सावंत, ऋतुजा. (२८ एप्रिल २०१०). महाविद्यालयातील मराठी. Retrieved from http://sakalmaayboli.blogspot.in (accessed on 12.07.2014)

२१. हेडावू, मुरलीधर. (३ जून २००९). शालेय शिक्षणात ग्रंथालयाचा वापर. Retrieved from http://www.loksatta.com (accessed on 12.07.2014)

२२. संपादकीय. (२००५). ग्रंथवाचन एक विशेष उपदेश : ई-प्रकाशने. ज्ञानगंगोत्री. Retrieved from http://www.ycmou.com मार्च-एप्रिल-मे पृ. ४.

२३. अवांतर वाचनसाहित्य हिच शिदोरी. (०२ ऑगस्ट २००८). Retrieved from In http://www.manatala.wordpress.com (accessed on 13.07.2014)

२४. तरूणाई करतेय वाचनाचा सगजतेने विचार. (२१ जानेवारी २०११). Retrieved from In http://epaper.esakal.com/esakal (accessed on 12.07.2014)

२५. आम्हालाही साहित्यविश्वात रस.... (३ जून २०१४). दै. महाराष्ट्र टाइम्स, पृ. ५.

२६. पुस्तक परिचय. (रविवार, १९ ऑक्टोबर २०१४). दै. महाराष्ट्र टाइम्स, संवाद, पृ. ७.

२७. पुस्तकांशी मैत्री तुटतेय.... (२३ एप्रिल २०१४). Retrieved from In http://marathi.yahoo.com (accessed on 12.07.2014)

२८. स्पर्धा परीक्षा आणि चालू घडामोडी.... (१ जून २०१३). Retrieved from In http://marathi.yahoo.com (accessed on 12.07.2014)

२९. साहित्य आणि समाज एकमेकाशिवाय अपुर्ण. (मंगळवार, ७ आक्टोबर २०१४). दै. लोकमत, हॅलो पुणे, पृ. ३.

३०. स्वागत दिवाळी अंकांचे. (गुरूवार, २३ ऑक्टोबर २०१४). दै. लोकमत, हॅलो पुणे, पृ. ८.

३१. शिक्षण नववीपर्यंतचे; लेखन तीन विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात. (मंगळवार, २१ मार्च २०१३). दै. लोकसत्ता, पृ. ५.

३२. आनंदाचा व्यापार. (शनिवार, ४ आक्टोबर २0१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

३३. कपडेखरेदीवर पुस्तकांची भेट. (शनिवार, ४ आक्टोबर २0१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ३.

३४. जगातील बुक कॅफे. (शनिवार, ४ आक्टोबर २0१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

३५. वाचनानंदांसाठी बुक कॅफे. (शनिवार, ४ आक्टोबर २0१४). दै. लोकसत्ता, पुणे वृत्तांत, पृ. ४.

३६. लाभले भाग्य आम्हा वाचतो मराठी. (१६ फेब्रुवारी २0१४). Retrieved from http://www.esakal.com (accessed on 12.07.2014)

३७. शंभर पदव्या, डझनभर पीएच.डी. (सोमवार, १५ जून २0१३). दै. सकाळ. पृ. ७.

३८. पुस्तकांतून उभारणार समाजासाठी निधी. (रविवार, ५ ऑक्टोबर २0१४). दै. सकाळ, सप्तरंग, पृ. २२.

३९. स्वागत नव्या पुस्तकांचे. (रविवार, ५ ऑक्टोबर २0१४). दै. सकाळ, सप्तरंग, पृ. २0.

४0. निवृत्ती बाबाजी नवले सिंहगड स्कुल ऑफ इंजिनिअरिंग Retrieved from http://www.nbnssoe.sinhgad.edu (accessed on 07.11.2014)

४१. सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर Retrieved from http://www.scoa.sinhgad.edu (accessed on 07.11.2014)

४२. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग Retrieved from http://www.scoe.sinhgad.edu (accessed on 08.11.2014)

४३. सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी Retrieved from http://www.scop.sinhgad.edu (accessed on 08.11.2014)

४४ . सिंहगड कॉलेज ऑफ सायन्स Retrieved from http://www.scos.sinhgad.edu (accessed on 10.11.2014)

४५ . सिंहगड डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल Retrieved from http://www.sdch.sinhgad.edu (accessed on 10.11.2014)

४६ . सिंहगड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट Retrieved from http://www.siom.sinhgad.edu (accessed on 11.11.2014)

४७ . श्रीमती काशिवाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग Retrieved from http://www.skncoe.sinhgad.edu (accessed on 11.11.2014)

४८ . श्रीमती काशीबाई नवले सिंहगड स्कुल ऑफ बिजनेस मॅनेजमेंट Retrieved from http://www.sknssbm.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)

४९ . सिंहगड लॉ कॉलेज Retrieved from http://www.slc.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)

५0 . सौ . वेणूताई चव्हाण पॉलिटेक्निक Retrieved from http://www.svcp.sinhgad.edu (accessed on 12.11.2014)